म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय : ....................
दा. क्र. :

IRBK-0119927

UL 2001

0 JAN 2004

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १०९२७ नों. दि. ६.१२.७५
वि. नाटक



वाचनालय
नाटक
१९९२७
घा१०।८३

# देणाराचे हात हजार

बाळ कोल्हटकर

मूल्य : बारा रुपये

जोशी ब्रदर्स
बुकसेलर्स ॲण्ड पब्लिशर्स, पुणे २

IRBK-0119927
IRBK-0119927

## महत्त्वाची जाणीव—

या नाटकाच्या या आवृत्तीचे प्रकाशनाखेरीज सर्व अधिकार सौ. शीला कोल्हटकर, ५१ बी / १३८१, आदर्श नगर, वरळी, मुंबई २५, यांचे स्वाधीन आहेत. प्रयोग करणारांनी अगोदर परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

—बाळ कोल्हटकर

मुखपृष्ठ : मंगेश कुलकर्णी
फोटो : भालचंद्र पिळणकर

प्रथमावृत्ती : १९८०

प्रकाशक : केशव वामन जोशी ★ २५ बुधवार पेठ ★ अप्पा बळवंत चौक ★ पुणे २.

मुद्रक : शशिकान्त महादेव देव ★ सुलभ मुद्रणालय ★ २९१ शनिवार पेठ ★ पुणे ३०.

संगीत रंगभूमीच्या जन्मशताब्दीला

हा एक गद्य

नज़राणा

**बाळ कोल्हटकर**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. ...९९९२७ नों. दि. ६.१२.०.६३
वि. ... नाटक ... क्र. ..................

प्रिय बाळ कोल्हटकर,

शिष्टाचारास धरून आरंभीच्या मायन्यात तुम्हाला ‘ बाळासाहेब ’ म्हणून या पत्राची सुरुवात करायला हवी. पण बाळासाहेब म्हटलेले तुम्हालाही आवडणार नाही, अशी माझी समजूत आहे. म्हणून बाळ.

—काही दिवसांपूर्वी ‘ देणाराचे हात हजार ! ’ या तुमच्या नव्या नाटकाचा खेळ बघण्याचा योग आला. ‘ सोबत ’मधील नाट्यविषयक लेखन थांबल्यापासून मी नव्या नाटकांचे प्रयोग बघण्याचेही थांबवले आहे. पण तुम्ही माझे पुरातन काळापासूनचे दोस्त. दोस्तान्यात तात्कालिक मतभेदाचाही अंतर्भाव असतो. तुमचे काम नाटक लिहिण्याचे. माझे काम त्या नाटकावर टीका करण्याचे. क्वचित केव्हा तुमच्या नाटकांवर कठोर टीका करण्याचे प्रसंगही आले; पण तुम्ही माझी टीका फारशी मनाला लावून घेतली नाही. आणि आपल्यातील सौहार्दाचे तारू मतभेदाच्या खडकावर आदळून कधी फुटले नाही. तुमची माझी मैत्री कसला म्हणून तडा न जाता अभंग राहिली. म्हणून तुमच्या या नव्या नाटकाच्या खेळाला तुम्ही मला स्नेहभावाने आग्रहपूर्वक बोलावले. मी आलो. तुमच्या या नव्या नाटकाचा प्रयोग पाहून खूष झालो. या वेळी तुमच्या या नाटकाची संहिता छापली जात होती. माझी खुषी पाहून तुम्ही एका बेसावध क्षणी मला ‘ प्रस्तावना लिहिणार का ? ’ म्हणून विचारले. मी ‘ होय ’ म्हटले.

—‘ होय ’ म्हटले खरे. पण मागाहून मनात विचार आला की, तुमच्या या नव्या नाटकासाठी कोणाच्या प्रस्तावनेचे प्रयोजनच काय ? प्रस्तावना स्वतः लेखकच लिहिणार असेल, तर डॉ. माधवराव पटवर्धन म्हणतात त्याप्रमाणे ‘ प्रस्तावना म्हणजे ग्रंथाची इतिश्रीच होय.’ आता ‘ ग्रंथाची इतिश्री ’च करायची तर ग्रंथाची प्रस्तावना तुम्हीच लिहायला हवी. तर आता तुम्हीच मला प्रस्तावने-साठी आग्रह चालवला आहे.

लेखकाव्यतिरिक्त अन्य कोणाच्या प्रस्तावनेचे प्रयोजन काय असते ? तर प्रस्तावित ग्रंथाचा परिचय करून देण्याचे. पण तुमचा ग्रंथ नाट्यरूप आहे. नाट्य हे दृश्य काव्य. नाटक दृश्य झाल्याशिवाय त्याचे सार्थक होत नाही. आता जे दृश्य, ते डोळ्यांनी बघूनच अनुभव घ्यायला हवा. श्रीखंडाची चव जाणून घ्यायची, तर जिभेनेच श्रीखंडाचा आस्वाद घ्यायला हवा; ज्याचा त्याने. या ज्याच्या त्याच्या व्यक्तिगत आस्वादासाठी अन्य कोणाचे माध्यम कशाला ? हा प्रश्न एकदा का विचारला की प्रस्तावनेची वाट लागते.

—दुसरे असे की, प्रस्तावनेचा उपचार हा अपरिचिताच्या परिचयासाठी असतो. तुम्ही— आणि अपरिचित ? म्हणजे हे फारच झाले. गेली कित्येक दशके तुमची कित्येक नाटके मराठी रंगभूमीवर गाजत आहेत. त्यांपैकी काही पराकाष्ठेची लोकप्रिय ठरली आहेत. प्रेक्षकांचा तुमच्यावर व तुमच्या नाटकांवर मनस्वी लोभ आहे. प्रेक्षकांचा तुमच्याशी दीर्घ काळापासूनचा दृढ परिचय आहे. त्यांनी तुमची नाटके डोक्यावर घेतलेली आहेत. अशा परिस्थितीत परिचय कोण कोणाचा करून देणार ? ‘ दुरितांचे तिमिर जावो, वाहतो ही दूर्वांची जुडी, देव दीनाघरी धावला ’ आणि ‘ लहानपण दे गा देवा ’ या नाटकांप्रमाणेच या तुमच्या नव्या नाटकाचा प्रयोगही दृष्ट लागण्यासारखा होतो. प्रयोगाला प्रेक्षकांच्या पसंतीची पावती आहे. मग प्रस्तावनेची गरज ती काय ?

—आणि आता हा शेवटचाच प्रश्न : तुम्ही माझ्याकडे प्रस्तावना मागितली, ती काही विचारपूर्वक नव्हे. रंगपटात गाठ पडली, ‘ तुमचा खेळ आवडला ’,— म्हणून मी म्हटले. लगेच ‘ प्रस्तावना देणार का ? ’— अशी विचारणा तुम्ही केली. आणि तुमच्याच उत्साहाला साथ देऊन ‘ हो हो, अवश्य. प्रस्तावना जरूर देतो, ’—म्हणून मी म्हटले. तेव्हा उभय पक्षी एक जाणीव अशी पक्की होती की, प्रस्तावना म्हणजे टीका नव्हे. तेव्हा टीकेने प्रस्तावनेची जागा घेणे

अगदी गैर आहे. प्रस्तावना ही एक वेगळी वस्तू आहे. टीका ही एक वेगळी वस्तू आहे.

—तुमचे एक ज्येष्ठ पूर्वज श्रीपाद कृष्ण हे एक श्रेष्ठ नाटककार होते. दुसरे ज्येष्ठ पूर्वज चिंतामणराव हे एक श्रेष्ठ नट होते. तुम्ही कोल्हटकरकुलोत्पन्न दोन्ही—म्हणजे नाटककार व नट आहात. पूर्वजांच्या संचितात वंशजाने मोलाची भर घातली आहे. 'देणाराचे हात हजार!' असले, तरी दोन हात भरभरून त्याने तुम्हाला पुष्कळ काही दिले आहे. आणि तुम्ही दोन्ही हातांची ओंजळ भरभरून ते घेतले आहे. अशा सुदैवसंकेतित परिस्थितीत नवी नवी नाटके लिहिण्यासाठी व त्यांच्या प्रयोगांत उचित त्या भूमिका करण्यासाठी त्या हजार हातवाल्या दात्याने तुम्हाला दीर्घायुष्य व बळ द्यावे, याभरते माझ्यासारख्या नाटकवेड्याचे त्या नटराजाकडे मागणे ते काय असणार? — असो.

—आता प्रस्तावनेचे म्हणाल, तर हे असे आहे. 'प्रस्तावनेऐवजी हे पत्रच छापणार का?'— या प्रश्नाचे उत्तर मी तुमच्यावरच सोपवतो.

कळावे.

शुभाशीर्वादपूर्वक

शिवाजीपार्क रस्ता ३
मुंबई २८.
दि. १–९–'८०

तुमचा,
**माधव मनोहर**

॥ जय देवी श्रीसरस्वती ॥

नाटकाचे ५० च्या वर प्रयोग झाल्यानंतर प्रस्तावना लिहायची म्हणजे कठीण काम ! प्रयोगापूर्वी निदान आपल्या अपेक्षा आपण यात काय नवीन प्रयत्न करणार आहोत वगैरे किंवा क्रांतिकारक असा रंगभूमीवर कुणीही न केलेला प्रयोग आम्ही या नाटकातून केला आहे वगैरे– प्रेक्षकांनी ठरवण्याआधी स्वतःचं भविष्य लिहिणं सोपं– पण आतां प्रेक्षकांनी हे नाटक आपलं म्हटल्यानंतर पुन्हा आपण काही लिहिणं हे आत्मगौरव केल्यासारखं होतं, आणि माझ्यासारख्या बुजऱ्या माणसाला तर अधिकच संकोचल्यासारखं होतं ! म्हणून मी या नाटकाची प्रस्तावना श्री. माधव मनोहर या टीकाक्षेत्रातल्या जाणकार अशा व्यक्तीला लिहायला सांगितली. त्यांनी लिहिली ! प्रस्तावनेत नाटकावर टीका असतानासुद्धा ती मी छापायला सांगितली ! ते 'नको' म्हणत होते ! 'एक प्रशस्तिपत्र देतो ते छापा' असं म्हणाले ! मी म्हटलं तेही छापतो ! टीका शेवटी छापतो ! आता स्वतःच्याच पुस्तकात स्वतःवरच टीका छापणं हे धाडसाचं आहे का नाही, मुळीच नाही. प्रकाशात लोकांच्या समोर उभं राहून जे करायचं ते नाटक ! मग कुंभाराच्या सुनेला कितीही देखणी असली, तरी केव्हा तरी उवड्यावर यावं लागणारच ! मग हातचं राखून कशाला ? ती प्रस्तावना छापण्यात हेतू दोन : एक सुधारण्यासारख्या चुका असल्या तर त्या पुढच्या नाटकात सुधारता येतील आणि त्यांना प्रस्तावना लिहिता येते की नाही तेही बघता येईल !

आमच्या चुका ते नेहमीच काढतात. त्यांच्या चुका काढायची या निमित्तानं आपल्याला संधी मिळेल, प्रथम त्यांचे आभार मानतो आणि त्यांनी लिहिलेल्या प्रस्तावनेपैकी एकाच विधानाचं उत्तर देण्याचा प्रयत्न करतो !

श्री. वसंत कानेटकर यांच्या 'गोष्ट जन्मान्तरीची' या नाटकाचा प्रयोग मी अद्याप पाह्यलेला नाही. तेव्हा त्यावरून हे नाटक मला सुचण्याचा प्रश्नच येत नाही. दुसरं, कुठल्याशा इंग्रजी नाटकावरून ( नाव मला आठवत नाही; कारण त्यांची प्रस्तावना छापखान्यात आहे! ) मला हे कथानक सुचलं असावं असं त्यांचं म्हणणं! आता सांगतो, मला जे इंग्रजी येतं त्या पद्धतीनं जर मी भाषांतर वा रूपांतर करायचं ठरवलं, तर मी अनुभवावरून सांगतो– एका एका वाचलेल्या इंग्रजी गोष्टीचा सारांश मी माझ्या मित्राला सांगितला तेव्हा तो म्हणाला होतो, "अरे बाळ, हे कथानक ते नव्हे. ते वेगळंच आहे." तेव्हा माझ्या इंग्रजीच्या ज्ञाना( ? )ची खात्री पटून तो प्रयत्न मी शाळा सोडली किंवा शाळेनं मला सोडलं तेव्हापासून सोडून दिलेला आहे! त्यामुळं असा आरोप जेव्हा माझ्या-वर होतो तेव्हा आपणही काही कमी नाही असा एक आनंद माझ्या मनात खदखदत असतो. त्यामुळं अशा टीकेचा मला कधीच राग येत नाही! काही तरी वेगळं प्रेक्षकांना दाखवावं असं मला नेहमीच वाटत असतं! त्या दृष्टीनं या नाटकातलं Ghoast ( स्पेलिंग बरोबर ना माधवराव ? ) १९४९ साली माझ्या मनात घर करून बसलेलं आहे! त्याला मूर्त स्वरूप यायला १९८० साल उजाडलं येवढं मात्र खरं! आता ते मला कुठं बघायला मिळालं हे सांगतो; म्हणजे श्री. माधवरावांनाही बरं वाटेल! एक इंग्रजी चित्रपट मी पाहिला होता!, Cantervile Ghoast. मराठीत कॅन्टरव्हाइल किंवा कॅन्टरव्हिले घोस्ट– ते माधवरावंनी पाह्यलं नसेल तर मी त्यांच्यापेक्षा अधिक विद्वान ठरतो! असो! तर त्या चित्रपटात बघितलेलं भूत– चार्लस लॉटन का लॉफ्टस कुणास ठाऊक, या नटानं साकारलेलं होतं, तेव्हापासून या भुताला नाटकाची चौकट शोधत

होतो! ती सापडली आणि हे नाटक झालं! असो, बाकी त्यांच्या टीकेला उत्तर द्यायला मला वेळ नाही! नवीन नाटक लिहायचंय! ते त्यांचं काम, हे माझं काम!

नेहमीचे कलावंत बदलून नवीन मुलांना बरोबर घ्यावं असं बरेच दिवस आपल्या डोक्यात होतं! आम्ही म्हणजे मी आणि आमचे भागीदार श्री. मुकुंद निमकर. दोन भागीदार तेही नाटकातले याच वर्षाच्यानंतर १२ व्या वर्षात प्रवेश करीत आहोत! आम्ही एकमेकांचं ऐकतो म्हणूनच हे जमलं! तेव्हा त्या दृष्टीनं विचार करता मला दिग्दर्शक म्हणून चि. दिलीप कोल्हटकर (योगायोगानं हा माझा पुतण्या आहे!) याचं नाव निमकरांनी सुचवलं, मला पटलं! त्यानं आपल्या नव्या विचारातून हे नाटक साकार केलं! मात्र योजना त्याचीच. त्या दृष्टीनं नव्या स्कूलमधील मुलं त्यानं जमा केली, कु. 'पल्लवी जोशी' हे रत्न म्हणजे रंगभूमीवरचा एक १० वर्षाच्या वयाचा चमत्कार. सुषमा तेंडुलकर, जुइली देऊस्कर, मोहन गोखले, कमलाकर कुलकर्णी, रमेश भाटकर (काही काळ) या सर्व मित्रांनी आणि बाकीच्या कलाकारांनी उत्तम साथ दिली आणि नाटक— अश्लील उघडं-नागडं— 'वासना'मय नसूनसुद्धा यशस्वी झालं! दिलीपचं दिग्दर्शन हा मुद्दाम नमूद करण्यासारखा प्लस पॉइंट. संगीत पं. जितेंद्र अभिषेकी यांचं; — ज्ञानी माणूस!

आभार सर्वांचे; — आगदी प्रकाशक जोशी ब्रदर्स, पुणे, पासून सर्व नेहमीच्या परिचितांचे!

—बाळ कोल्हटकर

|| श्रीगजानन प्रसन्न ||

" दूर्वांची जुडी " मुंबई, या संस्थेने " देणाराचे हात हजार " हा नाट्यप्रयोग बुधवार, ९ जुलै १९८० रोजी शिवाजी मंदिर, मुंबई, येथे दुपारी ४ वाजता सादर केला.

श्रेयनामावली

| | |
|---|---|
| लेखक | बाळ कोल्हटकर |
| दिग्दर्शक | दिलीप कोल्हटकर |
| संगीत दिग्दर्शक | पं. जितेंद्र अभिषेकी |
| नेपथ्य | बापू लिमये |
| सजावट | पेन्टर जुन्नरकर |
| ध्वनिमुद्रण | प्रदीप देशपांडे |
| प्रकाश-योजना | तुकाराम हलसकर |
| | प्रकाश आंबेरकर |
| पार्श्वगायक | जितेंद्र अभिषेकी, |
| | अजित कडकडे, उषा पंडित |
| रंगभूषा | प्रशान्त टिपणीस |
| वेषभूषा | वसंत दुदवडकर |
| रंगमंच-व्यवस्था | गजानन, मामा आणि सहकारी |

# प्रवेशानुक्रमे पात्र-परिचय

| | |
|---|---|
| दिनकर | मोहन गोखले |
| रेणुका | सुषमा तेंडुलकर |
| भटजी | वसंत दुदवडकर |
| मनू | वेत्री पल्लवी |
| दिनकर देव | बाळ कोल्हटकर |
| तपकिरे | कमलाकर कुलकर्णी |
| गुलाबराव | विलास गुर्जर |
| शोभा | जुईली देउस्कर |
| भाऊ | विद्याधर निमकर |
| टेलिफोनवाला १ ला | प्रशान्त टिपणीस |
| टेलिफोनवाला २ रा | मंगेश कांबळी |

## सूत्रधार

बाळ कोल्हटकर, मुकुंद निमकर

# अंक पहिला

[ मंगलवाद्यं वाजत असताना, मंत्रोच्चार कानावर पडत असताना पडदा उघडतो ! जुना विकत घेतलेला वाडा नवीन करून घेतला आहे. असं एकूण बांधणीवरून दिसतं ! रेणुका – दिनकर, ही जोडी आणि पाठोपाठ भटजी प्रवेश करतात. रेणुका आत जाते ! ]

**भटजी :** शुभं भवतु ! ॐ शांतिः शांतिः शांतिः !

**दिनकर :** झाली ना तुमची शांती ?

**भटजी :** आमची झाली ! ग्रहांची व्हायची आहे !

**दिनकर :** करून टाका !

**भटजी :** अरे अरे अरे ! अहो, अशी सोवळ्यात सिगरेट ओढायची नसते !

**दिनकर :** पण ही उपासाची आहे !

**भटजी :** ते काही नाही ! आधी उत्तरपूजेचं तेवढं उरकून घेऊ ! चला !

( दोघं आत जातात. बाहेरून एक सहा–सात वर्षांची मुलगी प्रवेश करते. तिचं नाव ‘ मनू ’. )

**मनू :** आजोबा ऽऽ

**देव :** मने, का रडतेस ? ( मनूला जास्तच रडू येतं. )

**मनू :** ( रडतच ) आता तुम्ही आम्हांला भेटणार नाही ?

**देव :** असं कोण म्हणतं ? ( असं म्हणत एखाद्या मोठ्या कमानीच्या आकाराच्या कपाटाऐवजी दिसू लागतो. एरवी तिथं एक मोठं कपाट अलमारीवजा— गोल आहे. )

**मनू :** आज वास्तुशान्त झाली. ते आले ना दोघं राहायला.

**देव :** ठाऊक आहे ना मला. त्याचं नाव दिनकर देशपांडे आहे. त्याच्या बायकोचं नाव रेणुका आहे. नाव रेणुका उग्रप्रकृती वाटत असलं तरी तिची प्रकृती सौम्य आहे. मला ठाऊक आहे ना. अग, माझंच तर नाव त्याला दिलेलं आहे.

मनू : म्हणजे ?

देव : मी त्याचा पणजा नव्हे का ? तो नाटकात काम करतो. मीही नाटकातच काम करत होतो. मलाही त्याच्यासारखीच एक बायको होती— साध्वी— सद्‌गुणी— विचारवंत. ऐन उमेदीत होतो. मीसुद्धा त्याच्यासारखाच. त्या उमेदीतच संपलो म्हणून असा राहिलो. माझं दिसणारं वय आता काहीही असलं तरी माझं खरं वय आता विचारशील तर नव्व्याण्णव संपून शंभरावं लागायला मला आता तीन महिने उरलेले आहेत. आज माझा भाग्याचा दिवस उगवलाय पोरी. या दिनकर देशपांड्याच्या पावलांनी आज मला मुक्ती मिळणार आहे पोरी. माझ्या आयुष्यात याच दिवसापर्यंत आलो होतो मी. बायकोच्या सहकार्यानं, सगळं दारिद्र्य संपलेलं होतं. आम्ही दोघंही सुखाच्या शिखरावर होतो. माझ्या बायकोच्या पोटात याचा आजोबा होता. माझा मुलगा. आणि त्याच दिवशी माझ्या आयुष्यात एक प्रेयसी आली होती[ देव देत होता हजार हातांनी, आणि एवढंच सांगायला विसरत होता की, हाच घसरण्याचा क्षण असतो. देणाऱ्याला काय कमी आहे ? घेणाऱ्याला विचार राहात नाही. देणाराचे हात हजार। ते पापही देती— पुण्यही देती। तुला हवे ते स्वीकार। देणाराचे हात हजार ॥] तिथं चुकलो. तीच चूक आता सुधारणार. मला मुक्ती मिळणार. देणाराचे हात हजार— म्हणून दाखव ॥

मनू : देणाराचे हात हजार— ते पापही देती — पुण्यही देती। तुला हवे ते तू स्वीकार— देणाराला हात हजार ॥ झालं पाठ.

देव : झालं ना ? शाब्बास— !

मनू : पण आई घरी विचारते— हे तुला कोण शिकवतं ?

देव : मग ?

मनू : मी म्हटलं दिनकरचं भूत— तर हंसली.

देव : हसली ?

मनू : हो— तिला वाटलं आमच्या शाळेतला मुलांचा काही तरी नवीन शब्द दिसतोय. म्हणून हसली.

देव : चला, बरं झालं—

मनू : बरं काय झालं ? दोन-चार वेळेला मी असं काही तरी वेगळं बोलले तर म्हणाली, तुला ही सुभाषितं शिकवतं कोण ? तर मी म्हटलं— दिनकरचं भूत.

देव : मग ?

मनू : मग काय ? तिनं घातलान माझ्या पाठीत धपाटा– मला म्हणे, मला त्याच्याकडं घेऊन चल. पण काय हो, तुम्ही माझ्या आईला का नाही भेटत ?

देव : नाही भेटू शकत.

मनू : का ? पण का ?

देव : नाही गं मनू– तू निष्पाप आहेस– लहान आहेस ना म्हणून.

मनू : माझी आईसुद्धा निष्पाप आहे– तुमच्यापेक्षा तर नक्कीच लहान आहे. तुम्ही आता नाइन्टीनाइन पॉइन्ट सेव्हन्टीफाइव्ह ना ?

देव : काय ? काय–काय ?

मनू : नाइन्टीनाइन पॉइंट सेव्हन्टीफाइव्ह– म्हणजे शंभराला फक्त तीन महिने राहिले ना ?

देव : हो, आणि माझ्या मुक्तीलाही—

मनू : मग आई तर आता ओन्ली थर्टी टू–बत्तीस फक्त.

देव : तू जात्याच बुद्धिवान आहेस पोरी.

मनू : नो मस्का–परवा मला शाळेत पहिलं बक्षिस मिळालं– तुम्ही शिकवलेली कविता चांगली म्हटली म्हणून.

देव : है शाब्बास— !

मनू : है शाब्बास काय ? तिथं बसला पाठीत रट्टा– तुमचं नाव सांगितलं म्हणून. मग तुम्ही आईला भेटत का नाही ?

देव : नाही ग पोरी–नाही भेटू शकत. ना धड पिशाच्च–ना धड माणूस– अशा अवस्थेत मी इथं आहे मनू– या अवस्थेत फक्त तुझ्या वयाला आणि माझा कुणी वंशज असला तर त्याला मी भेटू शकतो–बोलू शकतो. तू एक माझं काम कर. तो आता काय करतोय ?

मनू : कोण ?

देव : तो दिनकर !

मनू : ते आता पूजेला बसले आहेत–सोवळ्यात.

देव : माझं एक काम कर. त्याच्याजवळ जा– आणि त्याच्या उजव्या खांद्यावर एक तुळशीचं पान असल्यासारखी खूण असली तर बघ. एवढं माझं काम कर. मला खात्री करून घ्यायचीय. तो माझा अंशज असला तर मी त्याचा वंशज आहे. माझ्या आयुष्यात एक अंशाची चूक झाली आणि मी या कोनात अडकून

पडलो. मला त्याचा अंश त्याला परत करायचाय. त्याचा वंश वाढविण्यासाठी. माझ्यापुरता वंश संपवायचाच— मला पंचतत्त्वांत विलीन व्हायचंय. तुला कळणार नाही—

मनू : तुम्हाला कसं कळलं ?

देव : मरणापूर्वी माझ्या ज्योतिष्यानं मला सांगितलं होतं— यशाच्या शिखरावर असताना तू घसरशील. आणि तुझ्या घराण्याच्या तिसऱ्या पिढीतला एक पुरुष तुझा उद्धार करील. तिथं घसरलो आणि तेव्हापासून आजपर्यंत इथं वाट बघत थांबलो. तू एवढं माझं काम कर. करशील ?

मनू : का नाही करणार ? तुमची माझी ओळख झाली आणि मला सगळी गणितं यायला लागली. मला सगळेजण हुषार म्हणायला लागले.

देव : असेल— कुठली तरी ज्योत कुठल्या तरी वातीला लागली.

मनू : पण नंतर मग तुम्ही मला भेटणार नाही ?

देव : ते नंतर सांगतो. तू पान बघून ये—

मनू : तुळशीचं पान—तुळशीचं पान— ( असं म्हणत पुढं जाते— वळून ) पण नंतर आजोबा आपल्याला रोज रोज भेटता नाही यायचं—घरात काम चालू होतं तिथपर्यंत ठीक झालं—

देव : अग, तुला कोण जवळ करणार नाही पोरी— त्या दिनकरशी ओळख काढ—याच्याशी वाढली तशी त्याच्याशी वाढेल. ( मनू तुळशीचं पान— तुळशीचं पान— असं म्हणत आत जात असतानाच दोन तरुण बाहेरून आत येतात— एकाच्या हातात बाटली आणि एकाच्या हातात पातळाचं पार्सल ) जा— कोणी तरी येतंय.

तपकिरे : कोण ग मुली तू ?

मनू : मी, दातार, मी मनू दातार ! शेजारच्या घरात राहते.

गुलाब : इथं काय आहे ?

मनू : का ? तुमच्या आधीपासून मी इथं येते— तुम्ही आज आला— हे आमचे शेजारीच नाहीत का ?

गुलाब : कोण ?

मनू : ( देवच्या बाजूला बघत ) दिनकर. त्यांच्याकडं यायला नको—

तपकिरे : तुझ्या ओळखीचे आहेत ?

मनू : हो— त्याशिवाय येते का इथं ?

तपकिरे : असं होय ? मग आमचं एक काम कर. आम्ही आलो आहेत असं सांग जाऊन दिनकरला.

मनू : त्या दिनकरला ?

तपकिरे : अं ? त्या म्हणजे ?

मनू : दिनकरला— तिकडेच चालले— पण आम्ही म्हणजे आम्ही कोण ?

तपकिरे : आम्ही म्हणजे आम्ही तपकिरे—

गुलाब : मी गुलाबराव.

मनू : ही रंगाची नावं आहेत का माणसांची नावं आहेत ?

तपकिरे : रंगभूमीवरच्या माणसांची नावं आहेत.

गुलाब : त्यांना नुसती नावं सांग— आमची त्यांना माहिती आहे. आम्ही त्यांच्याच संस्थेतली माणसं आहोत.

मनू : सांगते— तुळशीचं पान— तपकिरे— गुलाब— संस्थेतली माणसं—

(देव हसतो— ती तिकडं बघून नाकावर बोट ठेवून उभी राहते.)

देव : काळजी करू नको. त्यांना मी दिसणार नाही. आणि ऐकूही येणार नाही. पण तू असं नाकावर बोट ठेवून उभी राहिलीस तर तुला मात्र वेडी म्हणतील.

दोघेही : वेडीच आहे ही— असं काय करते—

मनू : वेडीच आहे म्हणतात. (असं म्हणत आत निघून जात असताना दोघेही भांबावलेल्या स्थितीत बघून) बसा तपकिरे, गुलाबराव, मी तुळशीचं पान बघून येते. [ती आत जाते. ]

(गुलाब बाटली टेबलावर ठेवतो).

तपकिरे : बाटली टेबलावर काय ठेवतो ? फुकट प्रदर्शन—

गुलाब : लेका, इंपोर्टेड आहे. समथिंग स्पेशल फॉर समवन स्पेशल. मुद्दाम पुढं ठेवण्याजोगी चीज आहे. दरिद्री पार्टी तुझी नाही आहे. वेलणकराकडची दही—मिसळ. दिनकरची पार्टी आहे. नट, नाटककार, निर्माता—दिग्दर्शक— दिनकर— तू नव्हे—

तपकिरे : पण बाटली मुद्दाम टेबलावर कशाला ठेवतोस ? उगीच वहिनींनी पाहिलीबिहिली तर ?

गुलाब : ठाऊक आहे मस्कामारू. जेव्हा बघावं तेव्हा बायकांच्यात काय असतं

रे तुझं ? पातळ कशाला घेऊन आलायस वहिनींना ? नाटकी लेकाचा.

तपकिरे : लग्न झालेलं नसलं तरी मी गृहस्थ आहे. आणि नाटकी असलो तरी, मुद्दाम सणाच्या दिवशी मित्राच्या घरी जाऊन दारू पिणं हे प्रेस्टिज लक्षण अजून नाही आम्ही करून ठेवलं.

गुलाब : थांब—आज तू व्यायची कबूल केलं आहेस ना दिनकरला ?

तपकिरे : तू लेका त्याला भरीला घातलंस मला जबरदस्ती करायला.

गुलाब : तू का पडलास बळी ?

तपकिरे : पोटासाठी लाचारी करावी लागते बाबा—तुला काय ? तू बसला आहेस मॅनेजर होऊन.

गुलाब : आदब सांभाळून बोल. मॅनेजिंग पार्टनर आहे. हे चालू नाटक मी त्याच्याकडून लिहून घेतलंय. आता ही शोभा आली. हे नाटक पुरं होऊ दे; अगदी प्रेक्षकांचा क्यू लागतो तसा पुढं कॉन्ट्रॅक्टर्सचा लागेल.

तपकिरे : अरे, पण नको ते व्यसन दुसऱ्याला लावून—आनंद काय मिळतो. तुम्हाला ? नको ते नाद लावून ठेवायचे. हे दिवस काय कायम राहणार आहेत ? आज पैसा आहे ठीक आहे. पुढचं भविष्य कुणी सांगितलंय ?

गुलाब : तुम्ही कर्मदरिद्री लेको. विमानाच्या तिकिटाचे पैसे खिशात असले तरी टॅक्सीनं जावं की काय असा विचार करीत उभे रहायचे बसच्या क्यूमध्ये ! दिनकर बघ आपल्यासारखाच होता. आज पोरी मरताहेत त्याच्यावर.

तपकिरे : तुम्ही झालाय ना एजंट ? त्याला नाद लावायला.

गुलाब : तुम्ही जळा लेको.

तपकिरे : आम्हाला माहिती आहे ना—आम्ही नाही त्या लायकीचे. पण आमची बायको स्वतःची घरी असती ना तर दुसऱ्या पोरीकडे नसतं लक्ष दिलं.

गुलाब : आली नाही संधी म्हणून तुम्ही बोलताय—आली की तुम्हीही फिराल.

तपकिरे : पण तुला हे नसते उद्योग सांगितलेत कुणी ?

गुलाब : तुला ते कळणार नाही. मी एक जातिवंत निर्माता, तो एक अभिजात नाटककार आहे. मला त्याचा उपयोग करून घ्यायचाय. प्रतिभेला एखादं तरी आकर्षण असलं तर ती अधिक फुलोऱ्यानं बहरून येते हा माझा अनुभव आहे. कलम केल्यानंतर रायवळ आंबादेखील हापूसची फळं देतो.

**तपकिरे :** मग त्याच्या घराचं काय वाटेल ते होऊ दे.

**गुलाब :** त्याची जबाबदारी तो पार पाडील. आपला काय संबंध येतोय ? संस्था चालवायची.

**मनू :** ( प्रवेश करून ) संस्थेतली माणसं—आत बोलावतात. ( दोघं आत जातात ) तुळशीचं पान आहे उजव्या खांद्यावर.

**देव :** आहे ना ? शाब्बास पोरी ! आता तू त्याला एकट्याला गाठ. त्याची माझी एकट्याची भेट करून दे. त्यानं गरजा वाढवायला सुरुवात केलीय, तू असं करू नकोस असं मला त्याला सांगायला हवंय, हीच वेळ आहे सावरण्याची. इथंच मी घसरलो होतो. ही गरज—ही एक अकारण आलेली उपाधी आहे. सगळ्या गरजा आपणच उत्पन्न करायच्या आणि स्वतःचं नुकसान करून त्यांना पूर्ण करीत बसायचं—म्हणजे आपण दरिद्री व्हायचं आणि दुसऱ्याला समृद्ध करायचं—माणसानं स्वतः पूर्ण असायला पाहिजे. माणूस ज्या दिवशी त्याच्या सगळ्या गरजा संपवील—निखळ माणूस म्हणून ज्या दिवशी जगायला शिकेल त्या दिवशी तो माणूस म्हणून वागायला लागेल. मला त्याला हे सांगावं लागेल. राहील तेवढं लक्षात ठेव—आणि लक्षात ठेवलेलं प्रत्येक अक्षर हे ब्रह्मानंदाचं सुख देणारं असेल हेही लक्षात ठेव.

**मनू :** तुम्ही भूत आहा ना ? मग हे ब्रह्म वगैरे शब्द कसे बोलता ?

**देव :** ( हसतो ) बरोबर आहे, बरोबर आहे पोरी—मी एक भूत आहे, पण अजून पूर्ण न विरघळलेला भूत आहे. अजून मी देवाचं नाव घेऊ शकतो.

**मनू :** बरं झालं ग बाई—

**देव :** काय ग ?

**मनू :** आजपासून मी तुम्हाला आपलं दिनकर देवच म्हणत जाईन. म्हणजे आईला उगीच भीती वाटते ना भूत म्हटल्यावर—ती उगीच वाटायला नको—तिची काळजी.

**देव :** काही म्हण—पण एक लक्षात ठेव, मी पापी नाही पोरी, माझा रस्ता चुकलेला आहे. तो रस्ता मला या तीन महिन्यांत सापडणार आहे. मला मदत कर, माझी—त्याची भेट करून दे.

**मनू :** मग तुम्ही स्वतःच का नाही भेटत—डायरेक्ट ?

**देव :** मार्मिक प्रश्न आहे पोरी—एखाद्या नाटककाराला, एखाद्या टीकाकारानं ह।

प्रश्न नक्की विचारला असता. आता उत्तर असं आहे पोरी – त्याच्यासमोर मी असा एकाएकी – प्रकट झालो – तर तो घाबरेल. मला त्याला घाबरवायचं नाही. आपलंसं करून घ्यायचंय. आपलं भलं व्हावं म्हणून. त्यात त्याचंही भलं आहे. तू बरोबर असलीस तर त्याला भीती वाटणार नाही. हे निष्पाप नातं, वंश आणि अंश एकमेकांना जोडण्यासाठी मी धागा म्हणून वापरतो आहे. मला क्षमा कर परमेश्वरा. पण मला या अधांतरी हवेतून मुक्ती हवी आहे. तो क्षण आजच्या दिवसात मला केव्हा तरी भेटणार आहे. तीन महिन्यांत आज येणारा हा पहिला क्षण आहे आणि तू साक्षात सरस्वतीसारखी माझ्यासमोर उभी आहेस.

(गुडघे टेकून बसतो) मला साहाय्य कर माते.

मनू : वेड्यासारखे– एवढीशी मुलगी मी– मला माते काय म्हणता ?

देव : ही अवस्थेची अगतिका आहे मनू– व्यक्तीची नव्हे– आणि तुला एक सांगू ? सरस्वतीला वय नसतं. अमृताला चव नसते. खऱ्या हिऱ्याला रंग नसतो. यांना फक्त गुण असतो. या अवस्थेला तू माताच आहेस– मला साहाय्य कर.

मनू : आपण असे मोठ्यांनी मुलांचे काय पाय धरायचे असतात काय ? हसेल ना कुणी बघितलं तर!

देव : दिसणार कुणाला नाही– तुझ्याशिवाय– पण तुझंही बरोबर आहे. नकळत होणाऱ्या तुझ्या हालचाली तुला त्रासदायक ठरतील. तू असं कर, माझी त्याची एकदा ओळख करून दे. मग आपण फक्त तिघंच भेटत जाऊ. (तिचा गाल धरल्याचा अभिनय करतो. हताश होऊन हात खाली घेतो.) मी तुला स्पर्श नाही करू शकत, पण मला तू फार आवडलीस मनू. देण्याच्या अवस्थेत असतो– किमान हल्ली दिनकर आहे त्या माझ्या पूर्वीच्या अवस्थेत असतो तर– एखाद्या नाटकात तुला काम देऊन एका रात्रीत रंगभूमीवरची नायिका करून टाकली असती. वडील नाहीत ना तुला ? आई आहे ना एकटी ? तुझ्या नवऱ्याचा संसार तुला करता येईल, एवढी मोठी करून ठेवली असती. असो. तूर्त शुभचिंतन करतो. दिनकर आला बघ. (दिसेनासा होतो).

(आतून दिनकर आणि गुलाब प्रवेश करतो.)

गुलाब : ए दिनकर, त्या तपकिऱ्याला जरा सांग रे– जरा वजावून– सगळा साल चुगल्या करतो भाभीजवळ.

दिनकर : जाऊ दे रे– बोलतो माझ्याविषयी– करणारा मी– मला ओळखणारी

माणसं त्याच्या विश्वासावर माझं वागणं ठरवणार आहेत का ?/

गुलाब : अरे, परवा चक्क त्यानं शोभाच्या घरी जाऊन सांगितलं, की दिनकरशी ओळख, मान सगळं ठेवा– पण लांबून– त्याची बायको साध्वी आहे. आता तुझी बायको साध्वी आहे हे तिच्या घरी जाऊन सांगायची काय गरज ? मला नक्की वाटतंय– हा साला स्वतः शोभावर लाइन मारतोय.

दिनकर : कशावरून ?

गुलाब : बघ ना– हा काय पूर्वी कधी घेणारा नाही ? पण शोभा आल्यापासून तिला आवडत नाही म्हणून हा घेत नाही. आणि बाहेर बोंबा मारतो, जन्मात कधी न घेतल्याची. थांब, आज शोभा येणार आहे ना– त्या वेळी हा प्यालेला तिला दिसला पाहिजे. बघू तर काय होतंय ते.

दिनकर : कांय त्याची पर्वा करायची रे ? माकड ते– ही कोण रे मुलगी ?

मनू : ते त्यांना कसं ठाऊक असणार ? मला विचारा. ( त्याच्यासमोर जाऊन उभी राहते– गालावर थापटतो. ) शेजारी राहते– तुमच्या आधीपासून इथं येत असते. आज शेवटचं एकदा यायचं म्हणून आले होते. दिनकरला भेटायला—

दिनकर : कोण दिनकर ?

मनू : दिनकर– मोठे नट होते.

गुलाब : अग, होते नव्हे बाई–आहेत.

मनू : हे आहेत हो– ते होते. याच घरात रहात होते. याच घरात एक दिवस आपल्या बायकोबरोबर रहायला आले होते.

दिनकर : कोण ? कुणाबद्दल बोलतेस तू ?

गुलाब : अरे, दुसऱ्या कुणाबद्दल ? तुझंच तर वर्णन आहे. विनोदी दिसते पोरगी हं.

मनू : विनोदी दिसताय तुम्ही–

दिनकर : घे–

गुलाब : काय म्हणतेस ?

मनू : हे रहायला केव्हा आले इथं ?

गुलाब : आज–

मनू : आणि मी यांना रोज भेटायला येत होते असं म्हणाले– म्हणाले ना ? मग असं म्हणायला मी तुम्हाला वेडी वाटले का ?

प्रश्न नक्की विचारला असता. आता उत्तर असं आहे पोरी – त्याच्यासमोर मी असा एकाएकी – प्रकट झालो – तर तो घाबरेल. मला त्याला घाबरवायचं नाही. आपलंसं करून घ्यायचंय. आपलं भलं व्हावं म्हणून. त्यात त्याचंही भलं आहे. तू बरोबर असलीस तर त्याला भीती वाटणार नाही. हे निष्पाप नातं, वंश आणि अंश एकमेकांना जोडण्यासाठी मी धागा म्हणून वापरतो आहे. मला क्षमा कर परमेश्वरा. पण मला या अधांतरी हवेतून मुक्ती हवी आहे. तो क्षण आजच्या दिवसात मला केव्हा तरी भेटणार आहे. तीन महिन्यांत आज येणारा हा पहिला क्षण आहे आणि तू साक्षात सरस्वतीसारखी माझ्यासमोर उभी आहेस.

(गुडघे टेकून बसतो) मला साहाय्य कर माते.

मनू : वेड्यासारखे– एवढीशी मुलगी मी– मला माते काय म्हणता ?

देव : ही अवस्थेची अगतिका आहे मनू– व्यक्तीची नव्हे– आणि तुला एक सांगू ? सरस्वतीला वय नसतं. अमृताला चव नसते. खऱ्या हिऱ्याला रंग नसतो. यांना फक्त गुण असतो. या अवस्थेला तू माताच आहेस– मला साहाय्य कर.

मनू : आपण असे मोठ्यांनी मुलांचे काय पाय धरायचे असतात काय ? हसेल ना कुणी बघितलं तर!

देव : दिसणार कुणाला नाही– तुझ्याशिवाय– पण तुझंही बरोबर आहे. नकळत होणाऱ्या तुझ्या हालचाली तुला त्रासदायक ठरतील. तू असं कर, माझी त्याची एकदा ओळख करून दे. मग आपण फक्त तिघंच भेटत जाऊ. (तिचा गाल धरल्याचा अभिनय करतो. हताश होऊन हात खाली घेतो.) मी तुला स्पर्श नाही करू शकत, पण मला तू फार आवडलीस मनू. देण्याच्या अवस्थेत असतो– किमान हल्ली दिनकर आहे त्या माझ्या पूर्वीच्या अवस्थेत असतो तर– एखाद्या नाटकात तुला काम देऊन एका रात्रीत रंगभूमीवरची नायिका करून टाकली असती. वडील नाहीत ना तुला ? आई आहे ना एकटी ? तुझ्या नवऱ्याचा संसार तुला करता येईल, एवढी मोठी करून ठेवली असती. असो. तूर्त शुभचिंतन करतो. दिनकर आला बघ. (दिसेनासा होतो).

(आतून दिनकर आणि गुलाब प्रवेश करतो.)

गुलाब : ए दिनकर, त्या तपकिऱ्याला जरा सांग रे– जरा बजावून– सगळा साल चुगल्या करतो भाभीजवळ.

दिनकर : जाऊ दे रे– बोलतो माझ्याविषयी– करणारा मी– मला ओळखणारी

माणसं त्याच्या विश्वासावर माझं वागणं ठरवणार आहेत का ?/

गुलाब : अरे, परवा चक्क त्यानं शोभाच्या घरी जाऊन सांगितलं, की दिनकरशी ओळख, मान सगळं ठेवा– पण लांबून– त्याची बायको साध्वी आहे. आता तुझी बायको साध्वी आहे हे तिच्या घरी जाऊन सांगायची काय गरज ? मला नक्की वाटतंय– हा साला स्वतः शोभावर लाइन मारतोय.

दिनकर : कशावरून ?

गुलाब : बघ ना– हा काय पूर्वी कधी घेणारा नाही ? पण शोभा आल्यापासून तिला आवडत नाही म्हणून हा घेत नाही. आणि बाहेर बोंबा मारतो, जन्मात कधी न घेतल्याची. थांब, आज शोभा येणार आहे ना– त्या वेळी हा प्यालेला तिला दिसला पाहिजे. बघू तर काय होतंय ते.

दिनकर : कांय त्याची पर्वा करायची रे ? माकड ते– ही कोण रे मुलगी ?

मनू : ते त्यांना कसं ठाऊक असणार ? मला विचारा. ( त्याच्यासमोर जाऊन उभी राहते– गालावर थापटतो. ) शेजारी राहते– तुमच्या आधीपासून इथं येत असते. आज शेवटचं एकदा यायचं म्हणून आले होते. दिनकरला भेटायला—

दिनकर : कोण दिनकर ?

मनू : दिनकर– मोठे नट होते.

गुलाब : अग, होते नव्हे बाई– आहेत.

मनू : हे आहेत हो– ते होते. याच घरात रहात होते. याच घरात एक दिवस आपल्या बायकोबरोबर रहायला आले होते.

दिनकर : कोण ? कुणाबद्दल बोलतेस तू ?

गुलाब : अरे, दुसऱ्या कुणाबद्दल ? तुझंच तर वर्णन आहे. विनोदी दिसते पोरगी हं.

मनू : विनोदी दिसताय तुम्ही–

दिनकर : घे–

गुलाब : काय म्हणतेस ?

मनू : हे रहायला केव्हा आले इथं ?

गुलाब : आज–

मनू : आणि मी यांना रोज भेटायला येत होते असं म्हणाले– म्हणाले ना ? मग असं म्हणायला मी तुम्हाला वेडी वाटले का ?

**दिनकर :** काय– काय– म्हणतेस काय तू? तुला काय ठाऊक– इथं कोणी दिनकर नावाचा नट राहात होता?

**मनू :** रहात होता नव्हे– राहतो.

**दिनकर :** हो– हो– म्हणजे आजच्या आधीपासून–

**मनू :** नाही– नाही– आधीच्या आधीपासून–

**दिनकर :** म्हणजे?

**मनू :** सांगेन केव्हा तरी– एकटं असताना– बराच वेळ झाला– आता आधी आईला भेटून येते. (जायला लागते.)

**दिनकर :** अग, थांब थांब– माझ्या बायकोला तर भेटशील का नाही?

**मनू :** येईन ना– यावंच लागणार. शेजारी आलात ना रहायला– जबाबदारी आहे. [जाते.]

**दिनकर :** लव्हली–! काय गोड पोरगी आहे.

**गुलाब :** पोरीमागं लागायचेच दिवस आहेत तुझे–

**दिनकर :** शीः ! काय थर्ड क्लास माणूस आहेस.

**गुलाब :** या पोरीबद्दल नाही म्हटलं मी. शोभाबद्दल बोललो.

**दिनकर :** हळू बोल लेका. आपण आता लॉजवर नाही, घरी आहोत.

**गुलाब :** मग मी काय करू?

**दिनकर :** आपला एकेक राउंड झाल्यावर ती इथं येईल अशा बेतानं बोलावं. काय करू रे– त्या जागेतला फोन अजून इकडं आलेला नाही. मॅनेजर म्हणवता, ही कामं करायची कुणी? हजामती करा हजामती! बरं, आणली आहेस ना?

**गुलाब :** ती काय तिथं. (पैसे देऊ लागतो.)

**दिनकर :** पैसे राहू देत– आधी शोभाकडं जाऊन ये.

**गुलाब :** एक काम कर. तपकिऱ्याला कुठल्याही परिस्थितीत सोडू नकोस. त्याच्या तोंडाला आलेला वास मला तिला दाखवायचाय. माझा काही फायदा नाही. तुझीच लाइन क्लिअर करतोय.

**दिनकर :** माझी नको काळजी करूस.

**गुलाब :** तुझी नाही करत आहे. नव्या नाटकाची करतोय. नवीन नाटक लौकर यायला पाहिजे बाबा– म्हणून वातावरण स्वच्छ करतोय. एक पेग त्या तपकिऱ्याच्या पोटात जाऊ दे– काय काय वहिनींच्या जवळ आपल्याबद्दल चुगल्या

करतो— खडाखड बोलायला लागेल.

दिनकर : त्यातला नाही रे तो. फक्त थोडा खादाड आहे. माणूस वावळट.

गुलाब : तुला नाटकातली पात्रं रंगवता येत असतील, पण व्यवहारातली माणसं समजायला मॅनेजरच व्हावं लागतं. ते असू दे—तेवढं काम कर. तो हो म्हणालेलाच आहे. तू फक्त त्याला अडकवून ठेव.

दिनकर : ते बघतो मी. पण थांब—मीच येतो जरा खाली—सिगरेट घेऊन येतो परत. (आत वाकून) रेणू, जरा बाहेर येऊन बैस. मी जरा बाहेर कोपऱ्यापर्यंत जाऊन येतो.

गुलाब : कशाला उगीच तकलीफ घेतो रे—मी आणतोना येताना—

दिनकर : असं म्हणतोस ? पण सगळ्याच संपल्यात रे.

गुलाब : निष्कारण नको त्या सवयी लावून घेता आणि मग बोंबलत बसता—आपलं बघा—कुठलीही गोष्ट करत नाही असं नाही, पण व्यसन नाही. चिकटून नाही घ्यायचं—तळमळलं त्याच्यासाठी की संपलं—तुम्हाला पटायचं नाही सध्या !—आवर्तातच सापडलायना तुम्ही. म्हटलं पार्टनर म्हणून तुला एक सल्ला देतो गड्या—हिरॉइन म्हणून तिच्याशी जवळीक ठेव. जवळीक ठेव, पण लांबून ठेव. आपल्याबरोबर तिला फर्स्ट क्लासनं फिरवू नकोस.

दिनकर : तिचं प्रेस्टिज वाढलं म्हणजे कंपनीचं प्रेस्टिज वाढल्यासारखं नाही का ?

गुलाब : ही बंडलं आपल्या वायकोजवळ मार. सहवास हवा असतो म्हणून एकत्र प्रवास करता. ते नैतिकनैतिक सगळं ढोंग. असो. आवर्तात सापडलायस सांगितलं ना—माझं आपलं ऐकून ठेव. तळमळलं त्याच्यासाठी की संपलं.

दिनकर : काही तरीच बोलतोयस तू.

गुलाब : ठीक आहे; पटवून देईन.

दिनकर : काय ?

गुलाब : तू तिच्या किती अधीन गेलायस ते !

दिनकर : कुठलीही हवीशी गोष्ट मिळेपर्यंत तळमळ चालायचीच.

गुलाब : बसा तळमळत. ( निघून जातो. आतून हात पुसत रेणुका बाहेर येते. )

रेणुका : हे काय, तुम्ही बाहेर ना निघाला होता ?

दिनकर : नाही. तो आणतो म्हणाला स्वतः — हा कुठं गेला तपकिऱ्या ?

रेणुका : चिवड्याचा डबा उघडून बसलेत.

दिनकर : म्हणजे नेहमीचं. (दोघेही हसतात. तिचे हात धरतो.) ए, बस ना! राणी आज आपलं स्वतःचं घर झालं — सोन्याचा दिवस आला. रेणू, कष्टाचे दिवस आठवतात का?

रेणुका : न आठवायला काय झालं? नाटकांच्या मोठमोठ्या बोर्डांच्या भिंती करून साजरे केलेले ते दिवस — विसरण्यासाठी का आले होते?

दिनकर : राणी, बऱ्या-वाईट दिवसांत सारखं सहकार्य दिलंस; — मी असा सारखा दौऱ्यावर — पैसा आज मिळतो, पण एका काळी याच नाटकाच्या पूर्वी तुझ्याच गळ्यातला नेकलेस गहाण टाकण्याची वेळ होती. आज नावही मिळतंय— केवळ बायको जवळ नाही, म्हणून आम्ही नट बिघडतो का?

रेणुका : स्वतःला कुठं त्या यादीत ओढता?

दिनकर : माझंच असं नाही ग म्हणत मी — पण एकूणच. जनरल.

देव : हा चक्क खोटं बोलला.

दिनकर : (चमकून) तुला कसला आवाज नाही ऐकू आला?

रेणुका : कसला?

दिनकर : नाही आला? मला भास झाला असेल. तू काही म्हण, एक सांगतो रेणू, तू घरी होतीस म्हणून हे घर आपलं झालं.

रेणुका : त्यात काय झालं? राहायला मी येणारच होते ना?

दिनकर : तसं नाही राणी. माझ्यासारख्या भटक्या कलंदर माणसाचा संसार सावरायला, तुझ्यासारखी बायको मिळाली हेच त्याचं भाग्य.

रेणुका : हे काय भलतंच बोलता तुम्ही? लाजवता मला?

दिनकर : नाही राणी. दुःखाप्रमाणे सुखाचेही कढ येतच असतात ग. आजचा हा दिवस तुझ्यामुळं दिसला; हे कबूल करायला कसली आली आहे लाज?

रेणुका : चला, मला स्वयंपाकाकडं बघायला पाहिजे संध्याकाळच्या. भाजी आणावी लागणार. येऊ जाऊन?

दिनकर : थांब, मीच आणतो. नाही तरी सिगरेट संपलेलीच आहे— गुलाब येईपर्यंत धीर धरेलसं नाही वाटत?

रेणुका : इतके कसे अधीन जाता हो एखाद्या गोष्टीच्या?

दिनकर : काय — त्याला काही उत्तर नाही.

रेणुका : हे दिवस असेच राहणार आहेत का?

दिनकर : हेच वाक्य तू लग्नापासून बोलत आलीस; आणि दिवस जसे होते त्याच्यापेक्षा जास्त जास्त चांगलेच होत गेले.

रेणुका : तुमच्या तोंडाला कुणी हात घालायचा ? हे कसले चांगले दिवस आहेत ?

दिनकर : म्हणजे ?

रेणुका : आपण दोघांनीच हा संसार करायचाय का ? जन्मभर ?

दिनकर : दोघांनी म्हणजे ? ( रेणुका त्याच्या डोळ्यांत बघते – लाजून पायाकडे बघते. ) डोळ्यांनी जे बोललीस त्याच शब्दांनी काय उत्तर देऊ ? ( तिचे हात धरतो. ) राणी – अरे हो, बरी आठवण झाली – अग, ती शोभा येणार आहे हं आपल्याकडं–

रेणुका : मग ?

दिनकर : नाही म्हणजे – येणार आहे.

रेणुका : मग काय ? तिच्या ओवाळण्याची तयारी करू ?

दिनकर : छेः ! – तुम्ही बायका म्हणजे निष्कारण राग करता एकमेकांचा.

रेणुका : व्या बाई, मी इथं कशाला कुणाचा राग करू ?

दिनकर : बरं बरं – मी आलो; – त्या तपकिऱ्याला सोडू नकोस मी आल्याशिवाय.

रेणुका : सराफाकडं जाऊन आलात ना ? का जाणार आहात ?

दिनकर : ते सांगतो मग. [ निघून जातो. ]

रेणुका : सिगरेटस् आणायला चालला आहात ना ? की–

( आतून तपकिरे हातात चहाचा ट्रे – चहाची किटली – कप–बश्या घेऊन प्रवेश करतो ). हे हो काय भाऊजी ?

तपकिरे : काही नाही – म्हटलं, दोघं प्रेमात आलेले होतात – आपण म्हटलं कामात असावं – चहा करून आणला चौघांचा आणि जाता जाता माझ्याबद्दल तो काय बोलला ?

रेणुका : आडून ऐकलंत होय ?

तपकिरे : नाही, कानावर पडलं–

रेणुका : ही सवय चांगली नाही हं भाऊजी–

तपकिरे : बरोबर आहे ना – त्यामुळंच इतरांना असलेल्या आणि चांगल्या नसलेल्या सवयी मला समजतात.

रेणुका : असेनात का ? त्यांच्या त्यांना – आपण कशाला लक्ष द्यायचं ?

तपकिरे : नाही वहिनी, आपल्याला या गोष्टीचा राग आहे. हा गुलाब दिन्याला चक्क बुडवतोय. आता तो झाला असेल पार्टनर–पण पहिल्यापासून दिन्या आणि आम्ही दोस्त–एका कपडेपटात सतरंज्या घातल्यात आम्ही दोघांनी–आतां त्याचं नशिब फळफळलं–आमचं उजळलं–हा भाग्याचा भाग–पण त्या वेळी हा नव्हता जवळ. सिनेमा कंपनीत जमेना म्हणून लेकाचा नाटकात आलाय. आला तोच लेकाचा मॅनेजर म्हणून. मॅनेजर म्हणून आला आणि पार्टनर होऊन बसला. दिनकर ऊस होऊन उन्हात वाळत होता तोपर्यंत एक-जण जवळ येत नव्हता. त्याचा गूळ झाल्याबरोबर ढेपेला सगळे मुंगळ्यासारखे चिकटले. तुमच्याविषयी वहिनी, आम्हाला अभिमान वाटतो–सगळे कंपनीचे लोक तुम्हाला लक्ष्मी म्हणतात. उपनगरात का होईना स्वतःची जागा झाली एका नाटक्याची–तुमच्यामुळं–तुमच्या पायगुणामुळं–आता उपनगरातच का जागा घेतली हा वादाचा मुद्दा आहे. कारण तिथं लॅाजवर रांहायला मिळतं असं मी म्हटलं तर म्हणाल चुगली करतो. या नटाचे इतिहास विलक्षण आहेत एकेक–तुमच्या संसाराला फाटा फुटला–तर इथं आमचं अंतःकरण फुटेल.

रेणुका : फारच नाटकी बोलता बाई तुम्ही–

तपकिरे : नाटकातला माणूस असलो तरी माणूस नाटकी नाही मी वहिनी. मी एक पापभीरू माणूस आहे. कुठल्याही मोहाच्या क्षणापासून शक्य तितक्या लांब पळण्याचा मी प्रयत्न करतो. मी भाबडा नाही–भोळाही नाही;– पण सरळ आहे. तरी नाटकात आहे.

रेणुका : चांगलं आहे.

तपकिरे : चांगलं राहू दे.

रेणुका : आपली निष्ठा मजबूत असली म्हणजे काही नुकसान होत नसतं.

तपकिरे : आपण जपायला हवं का नाही ? मी त्या शोभा वगैरेबद्दल तुमच्या-जवळ बोललो हे मनात ठेवा. मी चुगली म्हणून केली नाही. फक्त कळलं ते कानावर घातलं– कारण फक्त तुमच्याबद्दल आदर.

रेणुका : तो ठेवा तुम्ही– पण माझा नवरा नट म्हणून नाटकात काम करतो हे मला ठाऊक नाही का ? दुसऱ्या कुठल्याही स्त्रीबरोबर ते बोलले तर त्यांचा राग यायला– मी त्यांची नुसतीच प्रेयसी नव्हे; पत्नी आहे. माझ्या नवऱ्याला मी चांगलं ओळखते. टोकापर्यंत जातील– पण उडी नाही टाकायचे– त्या क्षणी त्यांना

माझी आठवण येईल.

**तपकिरे :** तेही बरोबर आहे. [ दरवाजाकडं जाऊ लागतो. ]

**रेणुका :** अहो, निघाला कुठं ? यांनी थांबायला सांगितलंय. स्वभाव माहिती आहे ना ?

**तपकिरे :** हो. उद्या कंपनीत रहायचंय. (बसतो) तुम्हाला माझी अडचण सांगू का वहिनी ? या दोघांनी मला जबरदस्तीनं दारू पाजायची ठरवलं आहे.

**रेणुका :** जबरदस्तीनं म्हणजे ? तुम्ही पिऊ नका.

**तपकिरे :** बरोबर आहे — म्हणजे मॅनेजरचं काम झालं — त्यानं दुसरा माणूस आणलेलाच आहे. ही मॅनेजरची जात साली ही असलीच. बाटली—बाई—खात्रीनं सांगतो. त्या बाईलादेखील ह्याचीच फूस असली पाहिजे. जाऊ दे. तुम्हाला मी उगीच चुगली करतो असं वाटायचं—पण ही अडचण अवघड आहे. मुद्दाम चहानं सुरुवात करावी—म्हणजे पुढं दारू प्यावी लागणार नाही. या हेतूनं चहासुद्धा करून आणला चार कप — मी आयुष्यात कधी प्यालेला नाही हो — छे, छे, छे. काही सुचेनासं झालंय हो — चहा — चहा — वहिनी, बाटली असेल ना दारूची एखादी घरात ?

**रेणुका :** ही घ्या— ( टेबलावरची बाटली देते. )

**तपकिरे :** ही नव्हे हो— रिकामी.

**रेणुका :** कशाला हो ?

**तपकिरे :** या किटलीतला चहा त्या बाटलीत ओतून ठेवा—

**रेणुका :** आणि ?

**तपकिरे :** ती बाटली आत फ्रीजमध्ये नेऊन ठेवा—

**रेणुका :** लपवून ?

**तपकिरे :** लपवून नाही हो—थंड करण्यासाठी. चहा—गरम आहे ना तो ? मला व्हिस्की पाजतात ना—मी त्यांना चहा पाजतो.

**रेणुका :** त्यानं काय होईल ?

**तपकिरे :** फार काय होईल ? दिनकर चिडेल—पण माझा निषेध व्यक्त होईल. मी भोळा असेन, बावळट असेन, पण सरळ माणूस आहे.

**रेणुका :** ते सगळं खरं हो—पण या बाबतीत मी तुम्हाला मदत करू ?

**तपकिरे :** जाऊ दे हो. तुमच्यावर काही दिनकर भडकणं शक्य नाही.

निदान– अजून तरी–( ती लाजून पायाकडं बघते ) वा:, वहिनी, खरं लाजावं ते नाटकाबाहेरच्या वायकांनी. पण थांबा जरा, ही बाटली आणली आहे मॅनेजरनं– सॉरी पार्टनरनं. नेमका लेकाचा चोरून ऐकत असायचा. मग भडकायचा–

रेणुका : स्वत:ला असलेल्या सगळया सवयी दुसऱ्यांना अवतातच असं नाही.

तपकिरे : मुद्द्याची गोष्ट काय आहे, बाटली आणली त्यानं, मी शेकवतो त्याच्यावर!

रेणुका : अहो, बाकी सगळं ठीक आहे हो– पण असली बाटली कुठं घरात आहे? दुसऱ्या आहेत हं–ही रिकामी झाल्यावर धने ठेवायला मागून घेते. छान बाटली आहे.

तपकिरे : बाटली चांगली आहे हो– पण आतली चांगली नाही. धनेच ठेवा तुम्ही. धन्यानं धन उधळायचं आणि धनिणीनं धने साठवायचे. असो– ते असू दे. पण मग असली बाटली नाही? हं– बरोबर, मग मेलो–

रेणुका : मरू नका भाऊजी– मी ही दुसऱ्या बाटलीत ओतून ठेवते. रागावलेच तर देता येईल त्यांची त्यांना परत–

तपकिरे : फार उपकार होतील वहिनी माझ्यावर. ( पाया पडतो. )

रेणुका : ( दरवाजाकडं बघत ) कायमची सुटली तर माझ्यावर होतील देवाचे– काही असलं तरी ते काही वाईट नाहीत.

तपकिरे : म्हणून तर आम्ही तुम्हाला लक्ष्मी म्हणतो.

रेणुका : ( तिच्या पायाशी असलेल्या तपकिरेकडे पाहून ) अहो, हे काय भाऊजी?

( दरवाजात मनू. )

मनू : बाई, बाई, बाई, ही मोठी मोठी माणसं अशी पाया काय पडतात कुणास ठाऊक?

तपकिरे : वहिनी, जाऊन येतो–आता नक्की येतो–एक महत्त्वाचा फोन आहे. तो आत्ता करून येतो. ( मोजे आणि बूट पायात आहेत. ) तुम्ही एवढं काम करा–( काढून ठेवलेले मोजे पायांत घालीपर्यंत रेणुका बाटली घेऊन आत जाते– मनू उभी आहे आणि रेणुका बाटली ठेवून येते. )

मनू : तुम्ही परत येणार आहात?

तपकिरे : ( रेणुकाच्याच प्रश्नाला उत्तर देत असल्यासारखा ) लगेच–( दचकून ) का ग–तुला काय करायचंय?

मनू : नाही—थोडं खाजगी काम होतं—

तपकिरे : कुणाशी ?

मनू : तुमच्याशी नाही. म्हणूनच तुम्ही परत येणार आहात का ते विचारलं.

तपाकिरे : खाजगी काम तुझं कसलं ग ?

मनू : तुम्ही गेल्यावर जे करायचं—ते तुम्हाला कशाला सांगायचं ?

रेणुका : कोण ग तू मुली ? सकाळपासून दोन—तीनदां पाहिलंय मी—पूजेच्या वेळेला. आजूबाजूला—कुणाची मुलगी तू ?

मनू : कमालच आहे. दिनकरनी तुमच्याशी माझी ओळख कशी करून दिली नाही ? इट इज जस्ट अॅन एटिकेट्—मग मीच आता माझी ओळख करून देते. मी दातार—मनू दातार—मधुकुंज, रामानंद रोड, खार—तसं सगळं शिकवलेलं आहे मला—

रेणुका : कुणी गं चिमुरडे ?

मनू : दिनकर देव—(देव हसतो—तीही हसते.) (हे चमकतात).

तपाकिरे : पण मालकीणबाई, आपण आत्ता कशाला आला होतात ?

मनू : तुम्ही गेल्यावर यांना सांगेन—

तपकिरे : का ?

मनू : खाजगी आहे.

तपकिरे : यांच्याशी ?

मनू : यांच्याशी असेल नाही तर ह्यांच्या यांच्याशी असेल. तुमच्याशी नाही.

तपकिरे : अगदी नाटक कंपनीत राहण्याच्या योग्यतेची मुलगी आहेस—

मनू : काम देता ?

रेणुका : भाऊजी, तुम्ही पळॉ— तुमची डाळ इथं शिजायला कठीण दिसते—
[तपकिरे जातो.] काय ग नकटे— नाव काय तुझं म्हणालीस ?

मनू : नकटी हे तुम्ही थट्टेनं म्हटलंत ना ?

रेणुका : हो— का ग ?

मनू : नाही—तशी मी असले तर लग्न होणार नाही ना ? आईला कुठं दिसतं ? म्हणून खात्री करून घेतली—

रेणुका : आईला दिसत नाही तुझ्या ? (तिला जवळ घेत) तुम्ही राहता कुठं ग ?

मनू : मधुकुंज, रामानंद रोड,— खार—

रेणुका : ते समजलं, पण–

मनू : पलीकडचा भाग आमचा–

रेणुका : इतका जवळ आहे ? बरं झालं बाई, मला एक मैत्रीण झाली.

मनू : पण माझं काय ?

रेणुका : तुझं काय ?

मनू : तुम्ही दोघंच आहात ?

रेणुका : म्हणजे ?

मनू : मला खेळायला नाही कुणी घरात ?

रेणुका : मी आहे ना तुझ्याशी खेळायला – चल, तुला एक लाडू खायला देते–

मनू : लाडू घेईन मी – पण आता तुम्हाला काही अडचण नाही आहे ना ?

रेणुका : अडचण म्हणजे ?

मनू : तुम्हाला इथली माहिती नसेल ना म्हणून आले. मदतीला आले.

रेणुका : मदतीला आली आहेस ? मग चल, ये – माझ्या मागोमाग.

( मनू तिच्या हातातला ट्रे काढून घेते. )

मनू : हं – तो ट्रे द्या इकडे – मदतीला आले आहे – नुसती लाडू खायला नाही.

देव : मी आहे हं मने इथं–

मनू : मला ठाऊक आहे–

रेणुका : ( जाता जाता ) काय ठाऊक आहे ग ?

मनू : तुम्हाला नाही— दिनकरना म्हटलं— ( दरवाजात दिनकर उभा. )

रेणुका : ( फिरते ) हे काय, आलांत तुम्ही परत ?

दिनकर : मग असं काय विशेष लांब होतं – हं – ही भाजी – आणि हा सोडा. सोडा फ्रीजमध्ये नेऊन ठेव.

मनू : मी जरा मदत करून येते वहिनींना—

दिनकर : मदत करतेस ?

मनू : एकट्याच आहेत ना ? चला – मी येते – तुम्ही थांबा हं – मला तुमच्याशी काही तरी बोलायचंय ?

दिनकर : काय ग बोलायचंय ?

मनू : यांच्या देखत नाही सांगता येणार–

दिनकर : का ग ?

रेणुका : खाजगी असेल. होय ना ग ?

मनू : ( रेणूकाकडं बघते नुसती ) ठेवून येते. ( दोघं हसतात )

दिनकर : तुझी झाली वाटतं हिच्याशी ओळख ?

रेणुका : आता करून घेते—

दिनकर : नको– नको– तिला इकडं पाठव ताबडतोब–

रेणुका : का हो ?

दिनकर : तिच्याशी बोलायचंय—

रेणुका : काय ?

दिनकर : खाजगी आहे— ( दोघं हसतात )

रेणुका : ( ती आत जाते. )

दिनकर : छे, अचानक पाऊस काय सुरू झाला ! एखाद्या अद्‌भुत नाटकाचं वातावरण निर्माण करायचं असलं तर ही सिच्युएशन चांगली आहे. अरे, व्हिस्कीचा काय वास येतोय. मी तर जीनच घेऊन आलोय.

[ इतक्यांत मनू बाहेर येते. ]

मनू : चला बाई, वेळ वाया घालवून नाही भागायचं–इकडचंही बघायचं, तिकडचंही बघायचं– जबाबदारी आहे ना ?

दिनकर :इकडची समजलं– तिकडची आणिक कुठली जबाबदारी आहे आपल्यावर !

मनू : आई आहे ना घरी– माझीच आई म्हणून ठीक आहे. दुसऱ्या एखादीची असती तर संतापलीच असती– सारखी घराबाहेर असते म्हणून. तशी करते मी मदत– मघाशी पाणी दिलं तापवून– आता येताना तांदूळ वैरून आले– शिजलाय का नाही हे तिनं बघितलं तर कुठं बिघडलं ? तर चिडते माझ्यावर– एवढं त्या दिनकरच्या भुताशी सूत होतं तर माझ्या पोटी आलीस कशाला ?

दिनकर : भूत !

मनू : सॉरी, देव !

दिनकर : हां थांब– हे काय प्रकरण आहे ?

मनू : प्रकरण कसलं ? माझी जबाबदारी आहे—

दिनकर : कसली ?

मनू : ओळख करून द्यायचीय—

दिनकर : कुणाची ?

मनू : तुमची—

दिनकर : माझी ?

मनू : हो— त्या दिनकर देवांशी—

दिनकर : कुठं असतात ते ?

मनू : इथं— या भिंतीत—

दिनकर : तू मला वेडा समजतेस— का तू वेडी आहेस ?

देव : ( प्रवेशून ) ती शहाणी आहे मुला— आणि तूही वेडा नाहीस. दचकू नकोस— आणि घाबरू नकोस— या लहान लेकरानं— माझी तुझी ओळख करून दिली आहे— हेही विसरू नकोस—

मनू : माझं काम मी केलं— मी जाऊन येते हं— दिनकर देव.

दिनकर : अग— अग— मनू—

मनू : तुमचं खाजगी आहे ना ? ( नाकावर बोट ठेवून जाता जाता. ) आता नाही म्हणाले मला वेडी. [ जाते. ]

देव : हुषार मुलगी आहे— माझ्या भाग्याला दिशा दाखविणारी देवता आहे.

दिनकर : पण आपण कोण आहात ?

देव : मी तुझ्या पूर्वजांच्यापैकी एक— तुझ्या आधीच्या पिढीतला— तुझ्या भेटीची वाट पहात— या कपाटात— पूर्वी या ठिकाणी भिंत होती— चिणला गेलेला तुझा एक निकटचा पूर्वज— तुझ्याकडून मला मुक्ती मिळणार आहे— ते सविस्तर सांगायला आता वेळ नाही आणि वेळ आल्यावर ते सगळं कळल्याविना राहणारही नाही. आता मी सांगतो एवढं लक्षात टेव. मी देणार त्या सल्ल्यानं तुझं भलं होणार आहे एवढं मी तुला निश्चित सांगू शकतो— तुझं वाईट मी चिंतूच शकत नाही. कारण त्यात माझंच वाईट संभवतं— तर फक्त मी सांगतो त्याप्रमाणं वाग. ज्यादिवशी मी केलेली एक चूक तू सुधारणार आहेस— तो तुझा अंश माझ्याजवळ आहे— तो मी तुला परत करणार आहे— तुझा वंश फुलविण्यासाठी— तुला आपल्या मनाविरुद्ध काही गोष्टी कराव्या लागतील— कर— तिथं तू आपल्या मनाला बळी पडू नकोस— माझ्या मनासारखा चाल— मला मुक्ती मिळेल. तुला तृप्ती मिळेल. ही बघ आता तुझ्याकडं एक प्रेयसी येईल.

दिनकर : माझी कोण असणार प्रेयसी ? मला माझी एक बायको आहे.

देव : हे तू मला सांगतोस—स्वतःलाच ? माझंच आयुष्य तू जगतो आहेस दिनकर. यशाच्या कैफाचे दिवस हेच असतात. तू मिळविलेल्या यशावर भाळणारी माणसं तुला आवडणारच— तो तुझा दोष नाही—

दिनकर : माझं माझ्या बायकोवर मनापासून प्रेम आहे—

देव : आणि मनात कुठं तरी सूक्ष्मसा — बारिकसा कंटाळाही आहे.

दिनकर : खोटी गोष्ट—

देव : लौकिकात तू असं म्हणणं क्रमप्राप्तच आहे. पण काम फार छान केलंत— म्हणून आंदोलनासाठी परस्त्री जेव्हा हात पुढं करते — त्या स्पर्शामुळं ते कौतुक बायको करत नाही म्हणून सूक्ष्मसा एक रागाचा तिढा नक्की तुझ्या मनात बांधला गेलेला आहे.

दिनकर : बायकोविषयी ?

देव : एकच सांगतो—बायको ही लग्नघडीला लावलेल्या कुंकवासारखी आहे— आणि प्रेयसी ही — नटाच्या तोंडावरच्या रंगासारखी असते — नाटक संपलं — पुसली जाते — तिला दुखवू नकोस आणि हिच्याकडून मिळणाऱ्या सुखाची अपेक्षा स्वप्नातसुद्धा दुसरीकडून तू करू नकोस—नकली नाणं वाजवूनसुद्धा बघायची गरज नसते—नजरेला कळावं लागतं—

दिनकर : माझं डोकं भ्रमल्यासारखं झालंय—साली एखाद्या नाटकातसुद्धा असली सिच्युएशन कधी पाहिली नव्हती.

देव : आयुष्याचं असंच असतं—आधी घडतं आणि मग नाटकात येतं— मीसुद्धा तुझ्यासारखाच नट— नाटककार होतो— माझ्या आयुष्याची वाट तू चालतोयस. तुझ्या आयुष्यात येणाऱ्या अडथळ्याची तुला आठवण देण्याकरता मी तुझी वाट पाहात होतो.

दिनकर : आता लक्षात आलं—तू कोणी तरी वेडा आहेस—आणि इथं लपलेला आहेस. थांब मी पोलिसला बोलावतो.

देव : तू माझं किंवा मी तुझं नुकसान काहीच करू शकत नाही. कारण माझी जाणीव तुला होत असली तर तू मला स्पर्श करू शकणार नाहीस—करून बघ — ( हात लावतो — तो जाळीला लागतो ) माझ्या मनात आलं तर मी नाहीसा-देखील होऊ शकतो. ( दिसेनासा होतो. )

दिनकर : काय भुताटकी आहे कुणास ठाऊक— !

रेणुका : कुणाशी बोलता एकटेच ?

दिनकर : नाही, नाटकातलं एक स्वगत बोलत होतो.

देव : बघ—बोललास का नाही खोटं ?

[ दिनकर भिंतीकडे पाहात असतानाच गुलाब प्रवेश करतो. ]

गुलाब : दिनकर, अरे, असा काय बावरल्यासारखा दिसतोस ? आलो जाऊन मी शोभाकडं—फार खूष दिसली. तू काय—काल तिच्या स्वप्नात आला होतास म्हणे. फार सांगत होती आई तिची—आज सकाळी बेबी उठली ती म्हणे ओरडतच—नाचत—आई मला आज स्वप्नात साहेब दिसले—म्हणजे तू— ( दिनकरला देव खाकरतो ते ऐकू येतं—मागं वळून बघतो. )

गुलाब : काय झालं रे ?

दिनकर : काही नाही, काही तरी आवाज झाल्यासारखं वाटलं—तुला नाही ऐकू आलं ?

गुलाब : नाही.

देव : नाहीच येणार. ऐकू येईल फक्त तुला आणि मनूला—दिसेन फक्त तुम्हालाच. ( दिसतो आणि नाहीसा होतो. )

दिनकर : ए बाटली काढ रे—डोकं भणभणलंय.

गुलाब : अरे, पण शोभा यायचीय ना ?

देव : शुद्धीत न करता येणारी कामं करायची त्यासाठी आधी बेशुद्ध व्हावं लागतं.

दिनकर : जा, आतून घेऊन ये फ्रीजमधून. तिला सांग—

गुलाब : हा चमचा कुठं गेला—तपकिऱ्या ? पळाला का रे ? मला जबरदस्त शंका आहे— हा तपकिऱ्या त्या शोभावर लाईन मारतोय.

तपकिरे : ( प्रवेशून ) काय लेका आगी लावून देतो रे ? कोण कुणावर लाईन मारतोय. अगदी मॅनेजर शोभतोस बघ.

गुलाब : आडून ऐकलंस ?

तपकिरे : तेच बरं झालं—म्हणून मला हे कळलं—मी आपला सरळ माणूस आहे. आपल्या मनात नाही बाबा कारस्थानं करायचं येत—अरे वा ! उद्या माझ्या मनात वहिनींच्याविषयी काही तरी वेडंवाकडं आलं असंसुद्धा सांगशील.

दिनकर : काय म्हणालास ?

**तपकिरे :** वहिणीसारखी मला ती –

**दिनकर :** हं. (नुसता त्याच्याकडं बघतो–आपल्याच विचारात क्षणभर बसल्यासारखा. फ्रीझ्ड दिसतो–मागं— )

**देव :** हां–आपल्या बायकोशी हा फार बोलतो म्हणून तुझ्या मनात चुकचुकली ना संशयाची पाल? आणि याचा उपयोग सांगू? आकर्षणाचं कारण, तिच्या?

**दिनकर :** तू गप्प बैस रे–

**तपकिरे :** गप्पच बसलो होतो. करतो काय? पोट आहे ना?

**रेणुका :** (प्रवेशून) हां–ही घ्या तुमची तयारी–

**तपकिरे :** (धावत जाऊन ट्रे घेत) अरे, तुम्ही कशाला आणलंत वहिनी? मी होतो की–काय, बरोबर ना?

**रेणुका :** अगदी बरोबर– (दिनकर व गुलाब एकमेकाकडं बघतात– देव खाकरतो तपकिरे ट्रे टेबलावर ठेवतो.) (ट्रे घेतो.)

**गुलाब :** चल, आण इकडे!

**तपकिरे :** ठेव तिकडे.

(वाकून) अभिनंदन करतो तुमचं– (गुलाब ग्लासेस भरतो.)

**रेणुका :** कशाबद्दल हो?

**तपकिरे :** म्हणजे यांनी सांगितलं नाही तुम्हांला?

**रेणुका :** काय ते?

**तपकिरे :** मला आताच कळलं. महापौरांकडून सत्कार आहे ना तुमचा?

**रेणुका :** मला नाही बोलले–

**तपकिरे :** काय! बोलला नाहीस वहिनींजवळ?

**दिनकर :** कॉर्पोरेशनचं काम आहे रे ते–फायनल कागदपत्र व्हायचेत–पत्र यायचंय. आधीच काय ओरडत बसू–तू जा ग आत–बटाटा चिप्स करून आण. प्लीज– [रेणुका जाते.] (एक मोठा घोट घेऊन) काही तरी वेगळाच वास येतोय.

**गुलाब :** बरोबर–इंपोर्टेड आहे ना?

**दिनकर :** काय रे तपकिऱ्या–माझ्या घरच्या खाजगी गोष्टीत तू एवढा रस घेऊन कशाला पाहात असतोस?

तपकिरे : कसल्या खाजगी गोष्टी ?

गुलाब : ते घे अगोदर — ( तोंडाला लावतो — कसलाच वास न आल्यासारखा पितो. )

गुलाब : च्यायला — अगदी संवय असल्यासारखा प्यायला. तुला वास नाही आला कसला ? ( नंतर तोंड वेडीवाकडी करतो. )

तपकिरे : आता घाण आली.

दिनकर : काय रे! मला कुठं निमंत्रण आलं तर मी बायकोला बरोबर न्यायचं हे तू कशाला ठरवत असतोस ? नसता आगाऊपणा !

तपकिरे : वहिनींना हा चान्स मिळायलाच पाहिजे.

दिनकर : अरे, पण हे तू कोण ठरवणारा ?

तपकिरे : अरे वा ! पण आम्हाला असं व्हावंसं वाटतं —

गुलाब : आणि काय रे चमच्या ? तू शोभाजवळ कशाला सांगितलं ?

तपकिरे : काय ?

गुलाब : यानं वहिनींच्यासाठी नेकलेस आणलास म्हणून ?

तपकिरे : बरोबर सांगितलं !

दिनकर : काय बरोबर सांगितलं ?

तपकिरे : वाः — ! तिला कळायला नको —

गुलाब : काय ?

तपकिरे : याचं आपल्या बायकोवर किती प्रेम आहे ते —

गुलाब : पण हे तिला सांगून तू काय मिळवलंस ?

तपकिरे : मित्रप्रेम —

गुलाब : कसलं मित्रप्रेम ?

तपकिरे : वाः — ! माझा मित्र आपल्या बायकोबरोबर अत्यंत प्रेमानं संसार करतो — दुसऱ्या कुणावरही त्याचं मन जडलेलं नाही — हे दृश्य दिसायला गोंडस नाही का ?

दिनकर : पण अगदी तुझ्या म्हणण्याप्रमाणं माझं मन शोभावर बसलेलं असलं — तर त्यात तुझ्या बापाचं — सॉरी हं — जरा घेतलीय म्हणून —

देव : हे निमित्त का रे ? मनामध्ये बोलायचं ते स्पष्ट बोलायचं म्हणून दारू हे निमित्त असतं का रे ? नाही तर नुसता चहा पिऊन दारू प्यायल्यासारखं नक्कीच

बोलला नसतास–.

**दिनकर :** काय ? हा चहा आहे ?

**गुलाब :** कुणाला विचारलंस ?

**तपकिरे :** तुला कुणी सांगितलं ?

**दिनकर :** अरे, खरंच हा चहा आहे ?

**तपकिरे :** कुणास ठाऊक ? तुला कुणी सांगितलं ?

**दिनकर :** कर्णपिशाच्चानं सांगितलं–तुला काय करायचंय ?

**तपकिरे :** काय सांगितलं ?

**दिनकर :** हा चहा आहे–हा कुणाचा चावटपणा ?

**तपकिरे :** आपल्याला नाही बाब्बा ठाऊक.

[ रेणुका चिप्स घेऊन प्रवेश करते. ]

**रेणुका :** खोटं कशाला बोलायचं भाऊजी ? होय हो–चहा होता तो–आम्हीच केली होती जरा गंमत–

**दिनकर :** दोघांनी मिळून ?

**रेणुका :** हो–

**दिनकर :** कशासाठी ?

**रेणुका :** घरात पाहुणी यायचीय ना ? मग त्या वेळी प्यालेले असलंच पाहिजे असं नाही. पण काही तरी प्यायला असलं म्हणजे झालं–कसा लागतो हो सोड्यातून चहा–

**मनू :** ( प्रवेश करीत ) या आत. या तुमच्याकडं आल्या आहेत–आता ही पत्ता सांगायची वगैरे सर्व कामं मलाच करावी लागणार–जबाबदारी आहे ना ? [ जाते. ]

[ शोभा प्रवेश करते. ]

**दिनकर :** ये–ये, शोभा. ( उठून तिचा हात धरायला हात पुढं करतो. )

**देव :** हां हां,–हात नको धरूस–बायको समोर आहे–हे घर आहे. लॉज नव्हे.

**शोभा :** नमस्कार हो–अग बाई, तुम्ही मंडळी कशी इथं ?

**तपकिरे :** आमची पार्टी होती.

**शोभा :** बावळट–तुमचीसुद्धा— ( सगळेजण हसतात–रेणुका सोडून )

तपकिरे : चहाची – ( सगळे गंभीर होतात – एकटी रेणुका हसते. )

( पुन्हा दिनकरच्या मनाची घालमेल ).

शोभा : ( दिनकरकडे बघत ) तेच म्हटलं मी – या समोर असताना तुम्ही काय दारू पिणार ?

रेणुका : हो ना – हे लॉज थोडंच आहे ?

शोभा : मेकप चेहऱ्यावर नसताना आपण प्रथमच भेटतो आहोत – मला वाटतं एकमेकांना –

रेणुका : माझा चेहरा नेहमी एकच असतो.

शोभा : हे पातळ घ्या – मुद्दाम तुमच्या रंगाला मॅच होईल असं आणलंय.

दिनकर : अग, पण कशासाठी ?

शोभा : आईनं मुद्दाम सांगितलंय – गृहप्रवेश आहे ना पहिला तुमचा आणि माझाही, – जाताना वस्त्र घेऊन जायचं असतं म्हणाली. नमस्कार करते हो ! ( तिच्या पाया पडते. )

रेणुका : अहो, अहो, हे काय !

तपकिरे : पाया पडू दे. जोडवी सांभाळा –

शोभा : लहान आहे ना तुमच्यापेक्षा वयानं –

रेणुका : थांबा जरा, कुंकू लावते –

शोभा : नको, नको मला कुंकवाची ॲलर्जी आहे.

तपकिरे : चला, वैधव्याची धास्तीच नाही.

शोभा : अहो, मला बस वगैरे काही म्हणाल का नाही ?

तपकिरे : सांगायला कशाला पाहिजे – घर आपलंच आहे.

शोभा : हे तुम्ही तुमच्या घरी बोलवा आणि मग सांगा.

तपकिरे : झाल्यावर विचार करावा – आणि तुम्हाला बोलावताना हजार वेळा विचार करावा लागणार.

शोभा : का ? ( दिनकर वही काढून पेन घेऊन बसतो. )

तपकिरे : कारण बायको असताना तुम्ही घरात आलात तर तिला टाकून तुम्हांला घरात घ्यायचा मोह व्हायचा. त्याचा काय नेम आहे ?

( गुलाबला दिनकर खूण करतो – कटव – )

गुलाब : ए चिकटू – तू आता येतोस का बसतोस इथंच ? चहा चढला काय ?

चल – ए दिनकर, नाटकाचं बघ जरा – शोभाताई, नवीन नाटक यायला पाहिजे लवकर – बघा जरा, बघा–

**दिनकर :** बघतोय–

**तपकिरे :** पण स्फूर्ती यायला पाहिजे ना ?

**दिनकर :** तू बाहेर नीघ.

**तपकिरे :** हं – स्फूर्ती आलेली दिसते. (जाता जाता म्हणून जाते)

**दिनकर :** बैस ना शोभा. (बसते.) चहा घेणार ?

**शोभा :** जरा बसू तरी द्याल का नाही ? तुम्हीही बसा ना–

**रेणुका :** त्याला माझी हरकत नाही, पण तयारी करावी लागेल ना – मी जरा गॅस पेटवते.

**शोभा :** आणि मला नकोच असला चहा तर ?

**रेणुका :** तेही बरंच झालं – उरलं काम उरकून येते – वाती लावून येते देवापुढं–

**शोभा :** कसल्या ?

**रेणुका :** रोज तिन्ही सांजेला देवापुढं नीरांजन लावायची पद्धत आहे आमच्या घरची—

**शोभा :** कशाला ?

**रेणुका :** (हसत) घरातला प्रकाश कायम राहावा म्हणून देवघरात दिवा लावायचा. [आत जाते.] (देव डोळे पुसतो.)

**देव :** आता हा नाही माझं ऐकायचा – परक्या मुलीनं आपल्या संसारात शिरू नये म्हणून माझ्यासुद्धा बायकोनं देवापुढं वाती लावल्या होत्या. आता हा नाही माझं ऐकायचा – आली घसरण्याची वेळ—

**दिनकर :** शोभा, आज आई नाही बरोबर ?

**शोभा :** मुद्दामच आली नाही.

**दिनकर :** का ?

**शोभा :** मी असले म्हणजे ते नीटसे खुलत नाहीत. तुझ्याशी एकटीशी बोलायला त्यांना बरं वाटतं – मी सांगते सगळी कथानकं – कविता तुमच्या – घरी आईला – ती म्हणते माझ्यासमोर कशी इतकं चांगलं सांगत नाहीत ? संकोचतात–

**दिनकर :** खरं आहे शोभा – तू माझी स्फूर्ती आहेस – तुला बघितल्यावर माझ्या शब्दांना बहर येतो – पहिलीच ओळ सुचल्याला किती दिवस झाले – आता

बघ हे—पहिली ओळ होती—सखीला प्रेमपत्र पहिले—या ओळी बघ पुढच्या—आता केल्या—केल्या कसल्या—तुला बघून झाल्या—चंद्राला बघून सागरा उधाण आलं—अकस्मात तिन्ही सांजेला अंगणात रातराणीचा सुगंध दरवळला. तशी कविता आली.

**सखीला प्रेमपत्र पहिले ।**
**गोड गुलाबी गालांवरती ओठांनी लिहिले ॥ ध्रु० ॥**
**तव रूपाची राजस कांती। खेळत येते अक्षर-प्रांती ।**
**शब्द शब्द हे तव पायाचे। गुलाम होउन बसले ॥**
**सखीला प्रेमपत्र पहिले ॥**

खरंच—तुला बघितल्यावर मला सुचतं—

**शोभा :** खरंच ? (त्याचा हात धरते.)

**देव :** तू आता सांगून ऐकणार नाहीस—

**शोभा :** (हात झिडकारते.) तुम्ही खोटं बोलता—

**दिनकर :** काय ग शोभा ?

**देव :** पाघळूं नको— स्मित—स्तुती—ढोंग—लटकी आर्जवं—तोष, रोष, दांभिक वरवरचा—निंद्य जीवनक्रम ह्यांचा !

**दिनकर :** (कासावीस झालाय) काय खोटं बोललो ?

**शोभा :** बायकोसाठी नेकलेस केलाय हे मला सांगितलं नाही. होय ? तुम्हाला काय वाटलं मी मागेन ?

**दिनकर :** तसं नाही—

**शोभा :** नाही. तुम्ही खोटं बोलता—मघाशी तुमची बायको मला इथं आल्यावर किती बोलली—आई नाही आहे बरोबर. (रडायला लागते.)

**दिनकर :** ए शोभा, थांब, रडू नको—मी तुला खरं सांगतो.

**शोभा :** (रडत) काही नको—मला तुमचं नाटक नको—महापालिकेत जातानासुद्धा बायकोलाच घेऊन जा—जा, मला तुमचं काही नको.

**देव :** अरे, रडू दे—रडू दे तिला—लागेल तितकं—तुझी बायको आल्यावर लगेच बदलतो का नाही बघ तिचा चेहरा—अरे, नटी आहे ती—ट्रायल घेऊन बघ. नाही—गेलास कामातून—

**दिनकर :** असं करू नकोस शोभा—अग, तिच्यासाठी नव्हता आणला नेकलेस,

तुझ्याचसाठी आणला होता—त्या तपकिऱ्याला मी उगीच बंडल मारलं होतं—ही बघ—तू नसलीस तर—खोटं नाही सांगत—मला लिहायला सुचणार नाही.

**शोभा :** खरंच ? (हात धरते.) तुम्हाला सोडून मी कुठं जाणार दिनकर ? तुम्ही माझे गुरू आहांत. सगळेजणच मला म्हणतात—तुला काय कमी आहे, दिनकरच तुझ्या हातात आहे.

**दिनकर :** खोटं !

**शोभा :** शप्पथ नाही. मला किती तरी बोलावणी आहेत बाहेर—पण आई म्हणते, जाऊ दे—मला बाई लाज वाटते—

**दिनकर :** काय म्हणते ?

**शोभा :** स्वतःचं घर असताना दुसऱ्याचे संसार कशाला सजवायचे ?

**दिनकर :** खरंच आहे—आपण एक घर म्हणून कंपनी चालवतो.

**शोभा :** हो—कंपनीपुरतं घर—स्वतःचं घर बांधलंत—माझं काय झालंय ? जे काय करता ते स्वतःपुरतं—बायकोपुरती नेकलेस आणा—आणखी काही आणा—

**दिनकर :** खरंच, हा नेकलेस मी तुझ्यासाठीच आणला आहे. हं—हा घे. (गळ्यात घालण्यासाठी हात पुढं करतो.)

**देव :** देऊ नकोस—बायकोसाठी आणलेला नेकलेस तिला देऊ नकोस—ही घडीची आहे—ती जन्माची आहे. नाटकात हवं तर तिला असा सीन घाल, पण संसारातली अन्नपूर्णा प्रसन्न ठेव. सोनं विकत मिळेल. भावना पिकत नाहीत. हा अलंकार ही एक भावना आहे—त्याला एक मंगळसूत्राचा मणी बांधलेला आहे भावनेचा. तो तोडू नकोस. हीच माझी घसरण्याची वेळ होती. (तोपर्यंत धडपड धावपळ चालू आहे.)

**शोभा :** अहो, हे काय ? बायको आली आतून तर ?

**दिनकर :** आली तर काय ? नवीन नाटकातला सीन आहे म्हणून सांगेन—

**शोभा :** कसला ?

**दिनकर :** हीरोचं वाक्य आहे—'प्रत्यक्ष माझी बायको जरी इथं माझ्यासमोर आली तरी तिच्यादेखत हा हार मी तिला तुझ्या गळ्यात घालून दाखवीन.'

(नेकलेस तिच्या गळ्यात घालतो—मागं उभी रेणुका.)

**रेणुका :** जरा इकडे बघा, दिनकर—

**दिनकर :** हे काय रेणुका ?

**रेणुका :** गृहप्रवेश आहे ना ? तुम्हाला ओवाळते–

**शोभा :** घ्या बाई–हा काय प्रकार आहे ? [नेकलेस तिथंच टाकून शोभा जाते.]

**दिनकर :** तिला चिडविण्यासाठी मुद्दाम तमाशा केलास ? शोभा–

[बाहेर जातो.]

**मनू :** काय झालं ? (असं म्हणत देवाकडे येते.)

**रेणुका :** मनू–हे जरा नीरांजनाचं तबक धर गं–मला भोवंडल्यासारखं होतंय.

(मनू तबक ठेवते–रेणुका कोचावर डोळे मिटून पडते.)

**मनू :** काय झालं, देव ?

**देव :** हीच वेळ होती. या वेळी कुणाचा तरी हिच्याकडे आला असणार. त्या वेळची एक चूक मी निस्तरतो. माझं ऐक–तो नेकलेस घाल तिच्या गळयात. बघ शेवट गोड होईल. नंतर नक्की मनात म्हणशील दिनकर देव पावला. मी माझ्या बायकोच्या गळयातनं काढून घेतलेला नेकलेस तुझ्या हातून तिच्या गळयात घालतो. माझी चूक सुधारणार–मला मुक्ती मिळणार.

(देव नाचतो–मनू नेकलेस तिच्या गळयात घालते. ती जागी होते).

**रेणुका :** अग, हे काय मनू ?

**मनू :** वा: ! काय बाई छान दिसता ? दृष्टच काढायला हवी तुमची–

[बाहेरून शोभाचा हात धरून दिनकर आत येतो.]

**दिनकर :** तो नेकलेस काढ गळयातून रेणू–तो तिचा आहे. मी तो तिला दिला आहे. इतका कसला हा दागिन्याचा सोस ?

**रेणुका :** असं म्हणता ?

(ती निमूट काढून देते–शोभा हातात घेऊन— )

**शोभा :** मला काही भीक नाही लागलेली— [असं म्हणून बाहेर जाते]

[दिनकर तिच्यामागे धावतो.]

**मनू :** काय झालं हे देव ?

**देव :** वेश्येदारी केवडा वेचे शेवटी दार न चेपू तियेचे–हे विसरला–कवडी कवडी बाईच्या पायावर ओतली–पण शेवटी दारावर थाप मारायच्या लायकीचा

उरला नाही—हे विसरला—माझी पहिली संधी गेली.)

[दारात वामन येतो—हाक मारतो.]

**वामन :** काय झालं ताई ?

**रेणुका :** भाऊ ? तू आणि ह्याच वेळी कसा आलास अचानक ?

(अंक पहिला समाप्त)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. १११२५ नों. दि. ६।१०।८३
वि. नाटक क्र. ..................

# अंक दुसरा

( स्थळ तेच. रेणूका टेलिफोनजवळ बसलेली आहे. रेणूकाचं लक्ष टेबलां-वरच्या पाकिटाकडं जातं. ती ते उचलते. त्यातून एक्स रे बाहेर काढते. ती पहात असतानाच–आपल्याला पुढील कवितेच्या ओळी ऐकू येतात—)

संसार मी सुखाचा – तो नेटका करावा ।
इच्छुका तुझ्या मनाची देवास भाव ठावा ।।
आहे इथे सुखात, जे जे मिळे भले ते ।
उपदेश हा तुझा मी – तो नित्य आठवीते.
एकेक अश्रुबिंदू – जोडून होत मोती ।
सामावली तयात – तव थोर थोर प्रीती ।
हासून सांगताती, होऊन शब्द आई ।
आहेस त्या ठिकाणी, आनंद मान बाई ।।

( आतून कोट घालत, भाऊ येतो–कंगव्याने भांग पाडत–डोक्याबरोबर कापलेले केस, तपकिरी रंगाची टोपी मधून मधून हाताच्या तळव्यानं नाक पुसायची सवय आहे .)

भाऊ : ताईऽऽ काय वाचतेस ग ? रडतेस का ? आजीच्या एक्स रे मध्ये तसं काही 'सिरियस नाही' आहे. आणि हे बघ, त्यातून कळेलच ना आत्ता–जाऊन येतोच मी हॉस्पिटलमधून हं—

रेणुका : अरे, त्यासाठी नव्हते रडत–यांच्या नाटकातली एक कविता वाचून रडत होते. किती खरं लिहितात–

भाऊ : हं–वाचलं पाहिजे हं एकदा केव्हा तरी –बाकी कसं काय चाललंय –हे विचारण्यात काही अर्थच नाही आहे म्हणा–घरच घेतलंय–घेऊन घेतलं तर सबर्बमधे का घेतलं ?

रेणुका : तसं नाही रे–हेच घर घ्यायचं कारण होतं–

भाऊ : हां—ते माहीत आहे मला—त्यांच्याच कुण्या पूर्वजानं बांधून ठेवलं आणि रकमेपायी त्याचा घात झाला—पुढच्या पिढ्यांत कुणी खरेदी करण्याच्या योग्यतेचा नव्हता—

रेणुका : म्हणूनच त्यांनी हे जिद्दीनं घर घेतलंय. तसं जुनंच आहे घर हे—मी आपलं रंग देऊन सजवून घेतलंय—

भाऊ : नाही वाटतं नवीनच ? नाही—मी आपला विचार करत होतो—आईला हॉस्पिटलमध्ये न्यायला जरा सोयीचं पडलं असतं. जरा सांगून बघ दिनकररावांना, पैसा मिळतोय, वेळेवारी एखादा फ्लॅट घेऊन टाका म्हणावं मुंबईत.

रेणुका : हो, सांगेन ना—

भाऊ : तुझं ऐकतात ना ?

रेणुका : म्हणजे ?

भाऊ : नाही—म्हणजे काय आहे (पैसा जवळ आला ना माणसाच्या की आकर्षणं अधिक येत असतात, त्यामुळं घराचं आकर्षण कधी कधी कमी होतं—) तू आहेस म्हणा खंबीर ! [ आत जातो—शर्ट घालत परत येतो. ]

रेणुका : दादा, आईची तब्बेत कशी आहे ? काल सकाळपासून का कुणास ठाऊक, सारखी आठवण येते बघ तिची. ( इथपर्यंत त्याचं ड्रेसिंग झालं आहे ) आणि आज नेमका आलायस. खूप बघावंसं वाटतं बघ आईला.

भाऊ : बघतो. हॉस्पिटलमध्ये जाऊन येतो, आणि मग ठरवू या काय करायचं ते. लागलीच थोडी मदत तर पैसे असतील ना घरात ?

रेणुका : हो—हो, पैसे नसायला काय झालं ? तू येईपर्यंत मी यांना विचारून ठेवते.

भाऊ : अंबोळीला जाता जाता दिसले, पण काही बोलले नाहीत—आपल्या विचारात दिसले—

रेणुका : अरे नाही रे—नाटक वगैरे लिहीत असतात ना—तेव्हा असं आपल्या नादात असतात—फार छान आहेत वागणुकीला—उगीच तू काही तरी गैरसमज नको हो करून घेऊ—

भाऊ : छे छे, गैरसमज कसला ?—बरं, मग मी येतो—

[ शर्टची बटनं लावत—केस टॉवेलनं पुसत—कंगवा घेऊन दिनकर प्रवेश करतो. ]

दिनकर : काय, आईची तब्येत काय म्हणते ?

भाऊ : ठीक आहे—आता तिकडेच जातोय.

दिनकर : काही लागली मदत तर सांगायची हं—

भाऊ : हो ना—तुमचाच तर आधार आहे आम्हाला, नाही तरी आहे कोण दुसरं इथं मुंबईत ? बरंय, येतो. [ भाऊ जातो ].

( दिनकर लिहिण्याचं साहित्य घेऊन बसतो—रेणुका एका दिशेला बघत त्या भिंतीजवळ उभी आहे. )

( टेलिफोनवाली माणसं आतून टेलिफोन घेऊन येतात. दिनकरच्या टेबलावर ठेवत— )

पहिला-दुसरा : राम राम !

पहिला : साहेब, मुद्दाम लांब वायर आणलीय.

दुसरा : हापिसात परवानगी न्हाई.

पहिला : पण आपलंवालं नाव मोटं—

दुसरा : यानंच मला सांगितलं—लई मोठं नाटकवालं हाईत. फोन हवा तकडं हलवाया आला पायजे—अशी वायर घे लांब—

पहिला : तर इकतं करायला पाहिजे—

दुसरा : हापिसातून परवानगी नाही.

पहिला : मुद्दाम आणली.

दुसरा : आपल्यासाठी—

पहिला : राम राम—( दिनकर खिशातून दहा रुपयांची नोट काढून देतो. ) आणली मी—सांगितली यानं—( दिनकर दुसऱ्यालाही दहा रुपये देतो. )

दोघेही : राम राम—

[ निघून जातात. ] [ मनू येते—दोघंही गप्प पाहून )

मनू : दोन मोठी माणसं एकमेकांवर रागावलेली असली ना, म्हणजे माझ्यासारख्या लहान मुलांना नेहमी वाटत असतं, ही दोघं आता एकमेकांशी बोलणार कधी ? भांडण झालंय तुमचं ?

रेणुका : नाही ग—ते कामात आहेत ना ? माणूस आपल्या विचारात असला ना म्हणजे त्याला त्रास द्यायचा नसतो—लिहितायत ना ते—त्याला फार मोठी एकाग्रता लागते—

मनू : मग मी सॉरी हं–जाऊ? मग येईन–

रेणुका : का आली होतीस? (पडद्यात देव दिसतो.)

मनू : उदबत्ती लावायला आले होते–नेहमीच्या सवयीनं–पण नको–आता परवानगी नाही.

रेणुका : कुणाची?

मनू : कुणाची हे सांगायचं असतं तर उदबत्ती नसती का लावली?

(रेणुका हसते–दिनकर हसतो–ती दिनकरकडे बघते–नजरानजर होते. तो मान खाली घालतो–देव हसतो–त्याच्याकडे बघून मनू हसते–देव तिला हातानं जा अशी खूण करतो–ती मान डोलावते.)

मनू : मग येईन.

(रेणुका चमकते–मागं बघते–मनू जाते–रेणुका आत जाते).

देव : तोंड चुकवतोयस बायकोचं? चूक झाली हातून असं अजून वाटत नाही? या वेळी मी उन्मत्तपणे वागलो म्हणून आज अशी ही माझी अवस्था झाली. अजून झाली चूक सुधार. विश्वासानं ज्याच्या खांद्यावर मान टाकून, जिवाभावाच्या चार गोष्टी सांगायच्या त्यानंच असा आधार काढून घेतला तर त्या माउलीनं करायचं काय? माझ्याच बायकोला मी माउली म्हणतोय–गेलीय म्हणून–तिची क्षमा माग–त्या शोभाच्या मागं मूर्खासारखा पळत गेलास–त्या बिचाऱ्या बायकोला काय वाटलं असेल–विचार केलास? जळजळीत निखारे काळजावर पडल्यावर कसं चर्रर्र–होत असेल काळजात कल्पना कर–मी मूर्खानं केलेली चूक–तुला शहाण्याला सुधारायला सांगतोय.

दिनकर : पण शोभाची मला गरज आहे.

देव : तू स्वतः तयार केलेली.

दिनकर : तिच्याशिवाय मी रंगभूमीवर कुणाशी एकरूप होऊच शकत नाही.

देव : हा भ्रम आहे तुझा–तूच स्वतः तयार करून घेतलेला स्वतःच्याच भोवती. तू जी भूमिका रंगवलेली आहेस ती जर उत्तम असली तर वस्त्रांकडं फार कमी लक्ष जातं प्रेक्षकांचं–तू वस्त्राला अंगाचं महत्त्व देतो आहेस. रंगभूमी वीसच फुटांपुरती आहे, त्याचा संसाराशी संबंध जोडून नाही चालणार–तिच्या बरोबर तू रंगभूमीवर उत्तम जोडीदार दिसण्यापेक्षा रेणुकाबरोबर तू जन्माचा जोडीदार म्हणून असणं अधिक बरं.

दिनकर : पण रेणुकाला मी काय कमी केलंय ? अन्न, वस्त्र, निवारा–

देव : तू कोण काय देणारा रे–देणारा तर वर बसलेला, तुला काल अनुकूल आलेला आहे–देणारा वर बसलेला आहे, हजार हातानं देतोय–अशा वेळी विचार कर–सूर्याहाती ऊन देतो आहे–चंद्राहाती चांदणं देतो आहे–तुला काय योग्य तो विचार तूच कर–तूच करणार–देणाराला काय–देणाराचे हात हजार!

दिनकर : पण शोभाच्यापायी रेणुकावर मी कधीच अन्याय करणार नाही.

देव : कालचा नेकलेस ?

दिनकर : तसले छप्पन्न आणून देईन–

देव : स्वतःच्या मनाचं समर्थन करू नकोस–

दिनकर : मी माझ्या मनाचं समर्थन करतोय ?

देव : मोठ्यानं बोलू नकोस–बायको आतून येतेय–तुला कुणी तरी झपाटलंय असा गैरसमज करून घेईल. [ रेणुका येते. ]

दिनकर : मी माझ्या मनाचं समर्थन करतोय ? मी माझ्या मनाचं समर्थन करतोय ?

रेणुका : ( थोडी भ्यालेली ) कुणाशी बोलताय एकटेच ?

दिनकर : ( एकदम तिचा हात धरतो. ) राणी, रागावलीस माझ्यावर ? मी चंचल आहे–अविचारी आहे. पण दुष्ट नाही. तू रागावलीस माझ्यावर ?

रेणुका : कशासाठी ?

दिनकर : तो नेकलेस काल मी शोभाला दिला म्हणून ?

रेणुका : तुमच्या नाटकातल्यासारखं बोलायचं असतं तर मंगळसूत्र आहे ना माझं, असं म्हणाले असते–

दिनकर : म्हणजे ?

रेणुका : तुम्ही! तुम्ही असताना मला नेकलेसला काय कमी आहे ?

दिनकर : म्हणजे– शोभाला मी तो नेकलेस दिला–तुला राग नाही आला ?

रेणुका : छे ग बाई–राग कसला ? त्यांनाच असल्या वस्तू लागायच्या! मला कुठं त्यांच्यासारखं मोठ्या लोकांच्याबरोबर फिरायचं असतं ? नाटकात कामं करायची म्हणजे त्यांनी नटायलाच पाहिजे–मी काय–नटून शेवटी बसणार पोळ्या करायलाच ना ? मी तर म्हणते ही नेकलेस तुम्ही त्यांना आग्रह करून

परत द्या – पण ही गोष्ट तुम्हांला का एवढी मनाला लागली ?

**दिनकर :** मनाला लागण्याचा प्रश्न नाही – धक्का मात्र बसला !

**रेणुका :** कसला ?

**दिनकर :** तू फार मोठी आहेस, रेणू—

**देव :** तुला दिलासा मिळाला ना ?

**दिनकर :** ( तिकडं बघतो. ) कसला दिलासा ?

**रेणुका :** काय म्हणालांत ?

**दिनकर :** नाही रेणू – मी तुला समजू शकलो नाही.

**रेणुका :** त्यात काय समजायचं ? तुमचा व्यवसायच तसला आहे. नाटकात असताना जसं वागायचं असेल तसंच तुम्ही वागत असता हे समजूनच मी तुमच्याशी लग्न केलंय. एखाद्या कारकुनाशी लग्न केलं असतं तर संध्याकाळच्या लोकलला घरी आले नसतात तर जीव कासावीस झाला असता. मी तुम्हाला आपलं समजून मी तुमच्यात सामावून गेले – तुमचा दुर्गुण असला तरी त्याचं समर्थन करायला पाहिजे मी. आणि आपल्याजवळ तर दृष्ट न लागो कोणाची असे सद्‌गुण आहेत.

**दिनकर :** नाटक नवं लवकर लिहून व्हायला पाहिजे – अजून चांगला साला मूड लागत नाही.

**रेणुका :** कुठं बाहेरगावी जाऊन राहता का ?

**दिनकर :** का ?

**रेणुका :** नाही, म्हणजे तिथं गेल्यावर सुचेल.

**देव :** पुन्हा संशय— स्वतः गुन्हेगार आहेस— आणि दुसऱ्याचा संशय घेतोस ?

**दिनकर :** कोण ? कसला संशय ?

**रेणुका :** तुम्ही मध्येच असं असंबद्ध काय बोलता आहात ? काही होत नाही ना ?

**दिनकर :** नाही ग, काही सुचत नाही. राणी, तुझ्या आईचा काय रिपोर्ट येतोय तो बघ – काही अडचण असली तर मला सांग – मी जरा दादरला जाऊन येतो परत – आधी एक फोन करतो – दुसरा अंक पुरा करायचाय जरा – दुपारी जेवायला येतोच मी. ( फोनच करता करता— ) काय लोक तरी असतात बघ – तिकडच्या

जागेतला फोन इकडं आणला आणि नवा फोन लावून गेल्याचा अभिनय केलान् वायर लांब आणलीय– सांगितलं यानं– वीस रुपये गेले—

रेणुका : देणाराचे हात उदार– त्याला तो काय करणार ?

दिनकर : जरा चहा करून आणतेस ? [ रेणुका आत जाते. ]

देव : का तिला घालवलीस आत ? हा कुठं टेलिफोन ?

दिनकर : तू गप्प बैस—

देव : कसलं रहस्य आहे ? कसलं का असेना– मला कळणारच– (फोन ठेवतो.) नको जाऊस लोणावळ्याला– घरी बसून लिही.

दिनकर : तू माझ्या बायकोला काही सांगू शकत नाहीस.

देव : तूही तुझ्या बायकोला सांगू शकत नाहीस.

दिनकर : ( फोनवर ) हॅलो– ! हं, मॅनेजर, जरा बोलवा,... कुणाला काय ? मी बोलतोय दिनकर ! आवाज नाही ओळखता येत ? काय, नाहीत ? लोणावळ्याला– दोघीही— बरं बरं, काही नाही. ( फोन ठेवतो. )

देव : निघालास लोणावळ्याला ? बायकोला सांगितलंस दादरला जातो म्हणून ! मनात संशय ! दुसऱ्या कुणाकडे गेली की काय ? आणि दुसऱ्याचा संशय घेण्याचा तुला रे काय अधिकार ? त्याच्या हिशोबी तू दुसरा असणार ?

दिनकर : नाही. मला जमणार नाही घरी बसून लिहायला—

देव : का ?

दिनकर : ज्याच्यासाठी लिहायचं– ते माणूसच इथं नसल्यावर लिहून तरी कसं व्हायचं ?

देव : प्रयत्न केलास ?

दिनकर : नाही– मला जमणार नाही. डोळ्यासमोर शोभा असल्याशिवाय माझ्या अक्षरातून अर्थ बाहेर निघत नाही. मला तिला ऐकवायचं असतं– मनापासून तिला मी उमललेल्या फुलासारखी खुषीत बघायला मागतो. त्यासाठी जीवनाचं दान देतो. मनोमन– झुळूक यावी आणि कळीचं फूल व्हावं— तसा तिला बघितल्याबरोबर माझ्या ओठी येणाऱ्या शब्दांना सुगंधाचा स्पर्श मिळतो.

देव : हे स्वतःच्या बायकोकडं बघून तुला का वाटत नाही ? नाटकात उत्तम काम केल्याचं बक्षीस तुझ्या हातून तिला मिळालं आणि लग्न करून तिचाच हात तू हातात घेऊन संसार सुरू केलास— तिला बघून लग्न करण्याची स्फूर्ती तुला

झाली. तिला बघून काव्य करण्याची स्फूर्ती तुला का होऊ नये ?

**दिनकर :** कारण— कारण....

**देव :** शोध—मी आयुष्य संपल्यापासून त्याचा शोध घेत आलेला आहे. कारण सांग ? नाही! तर मी सांगतो. जी स्फूर्ती तुला शोभाकडं पाहून होते आणि रेणूकडे बघून का होत नाही—याचं कारण मी सांगतो.

**दिनकर :** नाही—मी सांगतो—मला ते कळलेलं आहे—

**देव :** कबूल करवत नाही ?

**दिनकर :** असं कोण म्हणतं ? मनातल्या मनात मलाही ते कबूल असतं— पण जाणूनबुजून बुध्याच मी ते कारण डोळयांआड करतो. रेणुकेशी माझं लग्न झालं त्या दिवसापासून स्वामित्वाची एक भावना मनात जन्माला आली आणि रेणुकेवरचं प्रेम संपून आपुलकीच्या एका नव्या नात्यानं जन्म घेतला. आपली असावी असं वाटणं संपलं आणि तिथं प्रेम संपऊं.आणि हक्क सुरू झाला. तिच्याशी सुखसंवाद साधण्यासाठी हवं असलेलं परकेपण नाहीसं झालं माझं— म्हणून मी एका परक्या शक्तीच्या शोधात राहिलो की जे माझं आकर्षणाचं स्थान बनून माझ्याकडून शब्दांचं नर्तन घडवील. सोनचाफ्याचा सुगंध वातावरणात पसरण्यासाठी वाऱ्याची झुळूक जितकी गरजेची तितकीच शोभा आता माझ्या गरजेची वस्तु झालीय. माझा मूळ धर्म लेखनाचा—त्यासाठी आवश्यक ते वातावरण मी शोधलं तर त्यात चूक काय झालं ?

**देव :** मनात बायकोची आठवणसुद्धा येत नाही.

**दिनकर :** येते. ज्या ज्या वेळी शोभाला भेटण्यासाठी वाट पाहात मी उभा राहतो—त्या त्या वेळी प्रतीक्षेच्या तीक्ष्ण सुया मनाला जशा टोचत असतात. तशाच आपण कुणाला तरी फसवत असल्याच्या वेदनेचे चिमटेही मनाला बसत असतात. तडफड तडफड होत असते मनाची.

**देव :** तरी पण आकर्षणापासून तुटून निघण्याचं धाडस काय हातून होत नाही. अगदी बरोबर. इथपर्यंत असाच मी आलो होतो. आणि मी कुठं फसलो हे मला ज्या क्षणी कळलं त्या क्षणी मी संपलो. ती माझ्या मरणाची गोष्ट आहे. फरक कुठं पडलाय ते तुला सांगतो. बुद्धिवान पण चंचल—प्रतिभावान म्हणून भावनाप्रधान असा तू, आणि आकर्षण म्हणून ज्या शक्तीला तू पूजेचं स्थान समजतोस ते देऊळ म्हणजे कुमार्गानं पैसे मिळविणाऱ्या धनिकानं मुलाच्या

उपजीविकेची सोय म्हणून बांधलेलं होतं — हे ज्या दिवशी कळेल त्या दिवशी तुझा भ्रमनिरास होईल !

दिनकर : म्हणजे ?

देव : तू भक्तिभावानं जी फुलं तिच्या पायांवर वाहतोस त्याचा उपयोग ती स्वतःला बाजारात विकण्यासाठी करते, हे लक्षात घे. तू कलाकार आहेस — ती कलावती आहे का कलावंतीण आहे; याचा शोध घेतल्याशिवाय कुठल्याही शक्तीची तुझ्या तेजस्वी प्रतिमेला पुजारी बनू देऊ नकोस. आतापासून तिला टाळायचा प्रयत्न कर. तेसुद्धा तिच्यावर रागावून नव्हे — तिला क्षमा करून — राग धरायलासुद्धा योग्यता लागते. तिची वृत्ती साधून घेण्याची आहे — तुझी वृत्ती साधकाची असू दे; — फरगिव्ह हर. वन डे यू विल फरगेट हर — क्षणासाठी आलेली जन्मासाठी बरोबर राहील. या भ्रमात राहण्यापेक्षा जन्माच्या सोबत्याला प्रत्येक क्षणी सुखी कसं करता येईल याचा विचार कर — हजार हात जगात मिळतील — दिनकर — एक हात जो खरा शेवटी, जो जन्माचा जोडीदार — देणाराचे हात हजार !

दिनकर : काही कळत नाही. जे कळतं ते वळत नाही आणि जे पटतं ते घडत नाही. (त्याची घालमेल चालू आहे.)

देव : नाही ऐकणार तू — नाही ऐकणार तू. (खदखद हसत असतो.)

दिनकर : (भीती वाटून) रेणू — रेणू — रेणू — (आतून येत असताना)

रेणुका : आले — आले — [रेणुका येते] चहा व्हायला तर हवा ना ?

दिनकर : चहा ? कुणी सांगितलं होतं चहा आणायला ? [निघून जातो.]

(रेणुका दरवाजा बंद करते — लाइटस ऑफ)

(बेल वाजते — लाइट्स ऑन — दरवाजात तपकिरे उभा आहे.)

तपकिरे : (नाही मी बोलत नाथा —) हे गाणे म्हणत येतो. काय वहिनी ? आला नाही का हा अजून ? लोणावळयाहून ?

रेणुका : नाही हो — मी दुपारपासून जेवणासाठी वाट बघतेय.

तपकिरे : होय ? दुपारी जेवायलाच आलेला नाही ? बरोबर — कमाल आहे — पाच वाजले — सात वाजताचं फंक्शन आहे ना ?

रेणुका : कसलं ?

तपकिरे : म्हणजे तुम्हाला ठाऊक नाही ? परवा मी बोललो नाही का

तुम्हाला ? महापौरांकडून सत्कार व्हायचाय ना तुमचा आज ? दोघांचा ?

**रेणुका :** म्हणजे मला जायला लागणार आहे यांच्याबरोबर ?

**तपकिरे :** हो — म्हणजे हा तुम्हाला बोलला नाही ?

**रेणुका :** पण हे गेलेत कुठं म्हणालात ? मला दादरला जातो म्हणाले होते.

**तपकिरे :** छे, छे, चक्क टॅक्सीत असताना बघितलं त्याला स्टेशनच्या बाहेर. सहज म्हणून चौकशी केली — तर मला कळलं—

**रेणुका :** की हे लोणावळ्याला गेले म्हणून ?

**तपकिरे :** हो — म्हणून तर मी मुद्दाम उशीरा आलो — आतापर्यंत यायला हवा होता —

**रेणुका :** नाही हो — लिहायला बसले असतील तिकडं जाऊन.

**तपकिरे :** हो —

**रेणुका :** घरात काही सुचत नाही म्हणत होते —

**तपकिरे :** होय ना — बाहेरचं एकदा सुचलं माणसाला की घरात काही सुचेनासं होतंच.

**रेणुका :** बाहेरच्यावरून आठवलं — यांच्याशी बोलताना या घरात आल्यापासून तुम्हाला काही फरक जाणवला का हो ?

**तपकिरे :** फरक म्हणजे ?

**रेणुका :** असं आपल्याशीच बोलणं —

**तपकिरे :** भ्रमिष्टासारखं — हां — असं तू गप्प बैस — असं मला एकदा अचानक म्हणाला होता — पण बघत होता तिसरीकडंच.

**रेणुका :** याच्यावर काही उपाय नाही का हो ? माझी आपली बाईची बुद्धी हो —

**तपकिरे :** म्हणजे — त्यामुळे तो असा वागत असतो असं तुमचं म्हणणं ?

**रेणुका :** असा म्हणजे ?

**तपकिरे :** तेच — हे असं हे लोणावळ्याला जाणं, त्या शोभाच्यामागं — नको मी उगीच चुगली करतो असं तुम्ही म्हणाल, — याला उपाय आहे. त्या शोभाला याच्यापासून लांब नेली पाहिजे — करतात हां काही बायका असले प्रकार — याला एक उपाय आहे !

**रेणुका :** कसला ?

**तपकिरे :** तुम्ही कायम त्याच्याबरोबर राहायला सुरुवात करा—तुमचा पायगुण म्हणून आज हे दिवस दिसलेत—जगाला माहीत नाही काय? तुम्हाला मी एक सांगतो—तुम्ही जर बरोबर असलात तर त्याचं संरक्षण शंभर टक्के—तुम्ही म्हणजे त्याची प्रतिष्ठा आहांत—प्रतिष्ठा घरात ठेवून हा बाजारात फिरत असतो ते कशाला? आत्ताचंच तुम्हाला सांगतो ना—हा सत्कार आहे ना संध्या-काळचा—घरी तो येणारच—तुम्ही उत्तम सजून तयार व्हा—गृहलक्ष्मी म्हणून सजून तयार व्हा— गृहस्थ म्हणून त्याला तुम्हाला बरोबर न्यावंच लागेल. थोडासा अतिरेकी वाटेल, पण हेतू हिताचा आहे.

**रेणुका :** छे हो—पण ह्यांना काय वाटेल?

**तपकिरे :** त्याला काय वाटायचंय? तुमच्याऐवजी शोभाला नेलं समारंभाला तर आम्हाला काय वाटेल याचा विचार करा—

**रेणुका :** छे, छे—असं नाही होणार—

**तपकिरे :** त्याला हाच उपाय आहे. आटपा हो लौकर—तो आला की लगेच जायला निघेल.

**रेणुका :** म्हणजे मी खरंच—समारंभाची—(बेल वाजते.) कोण—हे आले.

**तपकिरे :** बघा—तुम्हाला सांगत होतो—(दरवाजा उघडतो.) हं—नंदी आलेत—शिव अजून यायचाय— [गुलाब प्रवेश करतो.]

**गुलाब :** काय? काय म्हणालास?

**तपकिरे :** आडून नीट ऐकता येत नाही त्यानं—आड काय बोलत होतो हे विचारायचं नसतं—

**गुलाब :** का?

**तपकिरे :** काही ऐकलं तर खरं वाटणं शक्य नसतं—मी म्हटलं, वाहन पुढं आलंय—मालक अजून यायचाय—

**गुलाब :** वाहन म्हणजे?

**तपकिरे :** मॅनेजर—

**गुलाब :** अँ?

**तपकिरे :** सॉरी— मॅनेजिंग पार्टनर—

**गुलाब :** अरे—तो तर मी आहेच. नाही आला हा अजून?

**तपकिरे :** नाही अजून. वहिनी बिचाऱ्या वाट बघताहेत—

**गुलाब :** नाही – आता एवढ्यात येतील—

**तपकिरे :** येतील म्हणजे काय ? यायलाच पाहिजे – त्याच कपड्यांनी काही तो सत्काराला नाही ना जाणार ?

**रेणुका :** त्यात काय आहे ? सत्कार त्यांचा आहे की कपड्यांचा ?

**तपकिरे :** त्यांचं ठीक आहे – पण तुम्ही आता वेळ घालवू नका – तो इथं यायच्या आत तुम्ही तयार पाहिजे.

**गुलाब :** या येणार आहेत ?

**तपकिरे :** ऑं ?

**गुलाब :** –ना सत्काराला ?

**तपकिरे :** हो ना – मी सांगितलं मुद्दाम.

[ रेणुका आत जाते. ]

**गुलाब :** तुला हा सभ्यपणा कुणी करायला सांगितला ?

**तपकिरे :** कसला ?

**गुलाब :** वहिनींना बरोबर नेण्याचा—

**तपकिरे :** का, तुला वाईट वाटलं ?

**गुलाब :** मला कशाला वाईट वाटेल ? पण गृहलक्ष्मीशी भांडून कधी घरातून बाहेर पडू नये – हे या व्यवसायातलं पहिलं यशाचं लक्षण – हे माझं पहिलं बोलणं झालेलं आहे – भागीदारी करण्याआधी, पण जरा धंदा होऊ दे ना—

**तपकिरे :** कसला धंदा ?

**गुलाब :** नाटकाचा–

**तपकिरे :** म्हणजे ?

**गुलाब :** एवढं नाटक लिहून पुरं होऊ दे–

**तपकिरे :** काय बोलतोयस कुणास ठाऊक !

**गुलाब :** ते कळत असतं तर – जाऊ दे – अरे बाबा, शोभा डोळ्यासमोर असल्याशिवाय त्याला अक्षर सुचत नाही – ती दोघं जितका जास्त वेळ जवळ राहतील तेवढं नाटक लवकर पुरं होईल.

**तपकिरे :** पण तो तर असं कधीच बोलत नाही.

**गुलाब :** अरे, अशा गोष्टी कुणी कुठं बोलत असतं काय ? अगदी तपकिऱ्या आहेस – तुला पुरावा देऊ ?

तपकिरे : कसला ?

गुलाब : तो तिच्या पुरा अधीन गेल्याचा ?

तपकिरे : दे–

गुलाब : घे–आज तारीख किती ?

तपकिरे : एक एप्रिल–

गुलाब : मी आज त्याला एप्रिल फूल केलाय–

तपकिरे : दिनकरला ?

गुलाब : मीच त्या दोघांच्या संगनमतानं बाहेरून कुलूप घातलं होतं–खोलीला.

तपकिरे : लॉजवरच्या ?

गुलाब : हो–आणि मॅनेजरला सांगून ठेवलं होतं की कुणाचा फोन आला तर त्या लोणावळ्याला गेल्यात असं सांगायला सांगितलं होतं.

तपकिरे : मॅनेजरनं ऐकलं ?

गुलाब : एक एप्रिल– न ऐकून सांगतो कुणाला ? तसा काही मी तिच्या अधीन गेलेलो नाही असं म्हणाला तेव्हाच म्हणालो होतो, पटवून देईन. एक दिवस देईन. दिलं का नाही पटवून–

तपकिरे : अरे अरे–वहिनींना हे कळलं तर बिचारीला फार वाईट वाटेल—

गुलाब : आणि तशात तू त्यांना सत्काराला बोलावलंस–आता तिला वाईट वाटेल–आणि तुम्ही म्हणणार मॅनेजर वाईट.

तपकिरे : ते आहेच रे–पण ही शोभा कशी वागते कुर्रेबाजीनं कंपनीत ते पाहलंस ना ? अरे, याच्यासुद्धा अंगावर खेकसते–गडी–नोकरांच्या देखत–आपल्याला नाही हे पटत–ही वहिनी बिचारी कंपनीत आली की फुलं उधळत आल्यासारखी येते, तिला किंमत नाही!

गुलाब : एवढं नाटक लिहून पुरं होऊ दे–बरोबर तिला तिच्या जागेवर ठेवतो!

तपकिरे : एकलंत का वहिनी हा काय म्हणतो ते ?

गुलाब : अरे, त्यांना कशाला सांगतोयस ?

तपकिरे : म्हणता ना नेहमी चुगल्या करतो म्हणून ? आता तोंडावरच सांगतो.

गुलाब : पण तुझा काय स्वार्थ आहे त्यात ?

तपकिरे : साधल्यावर सांगेन—

**रेणुका :** काय म्हणता ? ( तिथल्या ड्रेसिंग टेबलाजवळ जाऊन कुंकू टिकली लावते. )

**तपकिरे :** हा घ्या वहिनी पुरावा—

**रेणुका :** कसला ?

**तपकिरे :** दिनकर नक्की लोणावळ्याला गेला—तुमचे हाल वहिनी आम्ही पूर्वी बघितलेले आहेत. जाहिरातीचे बोर्ड भोवती लावलेले, आत स्टोव्ह. तुम्हाला स्वैंपाक करताना या डोळ्यांनी पाह्यलंय—आणि आता याला लोणावळा सुचतोय.

**रेणुका :** तुम्हाला एवढं गहीवरायला काय झालं ?

**तपकिरे :** अहो, गहिवरताय कसलं वहिनी ? अहो, तो म्हणे शोभासाठी लोणावळ्याला गेला तुम्हाला न सांगता—

**रेणुका :** मग ? गेले असतील—तिथं गेल्यावर त्यांना सुचंत असेल लिहायला. लिहून पुरं व्हायला पाहिजे ना ?

**गुलाब :** हो तर—त्याशिवाय कंपनी चालणार कशी ? जुन्या जुन्या नाटकांवर आता किती तग धरणार आहात ?

**तपकिरे :** अहो, पण वहिनी—

**गुलाब :** तू गप रे—त्यांना राग येत नाही आणि तुलाच का येतो ?

**दिनकर :** [ प्रवेश करून ] सखीला प्रेमपत्र पहिले—दुसरा अंक झाला हं सुरू गुलब्या.

**तपकिरे :** आटप बाबा लवकर—

**दिनकर :** होय—लिहायचं म्हणजे खायचं काम नाही.

**तपकिरे :** हल्ली मी खाणं कमी केलंय—विचार वहिनींना—

**रेणुका :** काय हो—तुम्ही म्हणे आज लोणावळ्याला गेला होतात ?

**दिनकर :** कुणी सांगितलं ? या तपकिऱ्यानं ?

**देव :** हां—काय सांगितलं हे महत्त्वाचं नाही—कुणी सांगितलं त्याचा संशय आला ना मनात ?

**तपकिरे :** मी नाही हां—मला हा म्हणत होता—

**रेणुका :** गेला होतात का नाही तेवढं सांगा—

**दिनकर :** छे ग—दादरला बसलो होतो—थिएटरमध्ये—मागल्या बाजूला—

**गुलाब :** असेल – असेल—

दिनकर : असेल काय ? निष्कारण एखाद्या सभ्य माणसाच्या घरात चुगल्या करायच्या – व्हिलन साले –! ऐक – या नवीन कवितेत सुखी संसाराचं चित्रच कसं रंगवलंय ते —

**हवी असावे मीही तुला अन् तूही मला हवास**
**दोन मनांचे मीलन म्हणजे शुभमंगल सहवास**
**तुझ्यावेगळे चिंतन नाही, तुझ्यात मी पण गुंतून राही,**
**तू माझेपण, मीच तुझेपण, म्हणती अवघे श्वासोच्छ्वास,**
**दोन मनांचे मीलन म्हणजे शुभमंगल सहवास ॥**

तपकिरे / गुलाब : वाऽऽ वाऽऽऽऽ!

रेणुका : बघा, मी सांगत नव्हते ?

दिनकर : पण एवढं जाब घेतल्यासारखं कुठल्या विषयाचं तुमचं खाजगी चिंतन चाललं होतं ?

रेणुका : नाही – चिंतन नाही – दुपारपासून वाट बघतो आहोत आम्ही.

दिनकर : कशाला ?

रेणुका : दुपारी जेवायला घरी येणार होतात ना ?

दिनकर : सांगितलं ना लिहायला बसलो होतो म्हणून ?

देव : झालं – हां – बारीक खटके उडायला सुरुवात झाली.

गुलाब : अरे बाबा, महापालिकेची गाडी बरोबर साडेसहाला तुम्हाला न्यायला येईल. माझ्याकडं पत्र आलंय.

दिनकर : ठाऊक आहे.

तपकिरे : वहिनींना मी केव्हापासून तयार ठेवलंय.

दिनकर : कशाला ?

तपकिरे : सत्काराला जाणार ना तुझ्याबरोबर ?

दिनकर : अरे, पण जाणारा मी – ठरवणारा मी. नसत्या चिंता तुम्ही कशाला करता ?

तपकिरे : आपुलकी आहे तुमच्याबद्दल म्हणून बोलतो —

दिनकर : खड्डयात गेली तुमची आपुलकी —

रेणुका : अरे, पण तुम्हाला इतकं चिडायला काय झालं ?

दिनकर : कारण शोभा –

( दिनकर रागानं तिकडं वळून बघतो. मागून शोभा येते. )

**शोभा :** हॅऽलो दिनकर – ! बघा बाई, तुमच्या नवऱ्याचं माझ्यावर किती प्रेम आहे ते – मी दादरला नाही हे कळल्यावर स्वारी लोणावळ्याला माझ्या घरी जाऊन आली.

**तपकिरे :** आणि पावन झाली. [ रेणुका आत जाते. ]

**दिनकर :** काय म्हणालास ?

**तपकिरे :** बराय़, मी चलतो. आम्हाला काही तुम्ही बरोबर नेणार नाही. मी आपला पुढं जाऊन बसतो – वहिनींना घेऊन ये हां बरोबर —

**शोभा :** पण तुमचा चेहेरा असा पडल्यासारखा का दिसतोय ?

**तपकिरे :** तुम्हाला आरशात बघितल्यासारखं वाटत असेल – [ जातो. ]

**गुलाब :** गाडी खाली आल्यावर मी हॉर्न देतो – तुम्ही या नंतर. [ जातो. ]

**शोभा :** तुम्ही माझ्यासाठी लोणावळ्यास गेला होतात ? मला किती बरं वाटलं म्हणून सांगू ?

**दिनकर :** माझे मात्र हाल केलेस—

**शोभा :** पण गेला होतात ना ?

**दिनकर :** हो, गेलो होतो – पण तुला कसं कळलं ?

**शोभा :** मी फोन केला होता – घरी – वडिलांना – मला खूप खूप बरं वाटलं.

**दिनकर :** मी मात्र – अचानक तू काय आजारी वगैरे पडलीस का काय या धास्तीनं – सबंध प्रवासात – घरी आल्यावर – तू दिसेपर्यंत तळमळत होतो.

**शोभा :** खरंच इतकं वाटतं तुम्हाला माझ्याबद्दल ?

**देव :** स्वतःच्या बायकोबद्दल कधी वाटतं का ?

**दिनकर :** हो वाटतं—

**शोभा :** काय ?

**दिनकर :** प्रेम !

**देव :** हे विकारी – ते संस्कारी—

**दिनकर :** ( **प्रेम विकारी वा संस्कारी । सार असो वा ना संस्कारी ।**
**सदैव प्रतिमा तुझीच सामोरी—**
**साहित्याचा अर्थ सुगंधी । शब्द गुलाबी फुटले ॥**
**सखीला प्रेमपत्र पहिले !** )

वा ! फर्स्ट-क्लास शोभा – आपला दुसरा अंक झाला बघ शोभा – त्या विवक्षित व्यक्तीला बघितल्याशिवाय, नायकाला कविता सुचत नाही – अशीच ही सिच्युएशन आहे दुसऱ्या अंकात—

**शोभा** : पुढं ?

**दिनकर** : पुढं बघू काय सुचेल ते—

**देव** : मी सांगतो की, हिच्या आधीन जाऊ नकोस.

**शोभा** : खरंच – कसं बाई तुम्हाला सुचतं एवढं ?

**देव** : हं – फुगून जाऊ नको. हे ढोंग आहे—

( दिनकर पेपरवेटशी चाळा करतोय – शोभा त्याचे हात धरते. )

**देव** : हातातली अंगठी सांभाळ—

**शोभा** : ( अंगठीकडं बघत ) दिनकर—

**दिनकर** : अं ?

**देव** : अं ऽ हं—

**शोभा** : तुम्हाला सगळयात आवडणारं तुमचं स्वतःचं कोणतं नाटक हो ?

**दिनकर** : आत्ता लिहितोय ते—

**शोभा** : आणि मागं लिहिलेली ?

**दिनकर** : अग – मंगळवारी जन्माला आलो तेव्हा आपला कसा वास येत होता हे गुरुवारी उगवलेल्या गुलाबाला सांगता येतं का ? आम्ही रोज नेहमी नवा सुगंध घेऊन जन्माला येणारे – त्याच्यापेक्षा तू मोठी – तुझा सहवास हा माझ्यासारख्याला सुगंधाचा वाटतो – हे तुझं मोठेपण.

**शोभा** : नका बाई उगीच लाजवू – खडा काय छान आहे, नाही ?

**देव** : अंगठी सांभाळ—

**दिनकर** : विषय बदललास ?

**शोभा** : खरंच, खडा चांगला आहे म्हणून म्हटलं—

**दिनकर** : तुला हवाय ? ( काढतो. ) घे – वापरून बघ – खरा हिरा आहे. लाभला तर ठेव – तुझं किंचितही नुकसान मला सोसणार नाही.

**शोभा** : नको बाई, तुम्हाला उगीच वाटायचं की मला लोभ सुटला त्याचा. नाही – परवा आई म्हणत होती—

**देव** : सांभाळ – आंगठी गेली – आता दुसरं काय ?

शोभा : नाइट—

दिनकर : नाइटचं काय ?

शोभा : कमी पडते म्हणत होती. आणखी एक शंभर रुपये वाढवा म्हणून...

दिनकर : शंभर ?

शोभा : का ? एवढं कावायला काय झालं ?

दिनकर : कावायला ?

शोभा : सॉरी—रागवायला म्हणत होते मी ? माझ्यावर कंपनी चालते आहे—बाहेर वाटेल तेवढी बोलावणी आहेत मला—

दिनकर : छे, छे, भलता कसला विचार करतेस ? पैशाचं काय—बघू ना आपण. मी त्या गुलाबला सांगतो.

शोभा : त्याला काय सांगायचं ? मालक तुम्ही—

देव : फुगून जाऊ नकोस.

दिनकर : नाही, ते झालं—

शोभा : ते मला कटवायला निघालेत—मी गेले म्हणजे कंपनी बसणार हे त्यांना माहीत आहे—मला घालवणार ते. ( रडते. )

दिनकर : थांब—थांब—मी आहे ना ? वाढवतो पैसे—घाबरते कशाला ? मी आहे ना ? सव्वा सहा झाले. आता महापालिकेची गाडी येईल ! रडू नकोस, बायको येईल.

शोभा : येईना—तो तपकिऱ्या एवढं मोकळेपणानं वागतो तिच्याशी, त्याचा नाही वाटतं तुम्हाला संशय येत ? म्हणे मी आहे. काय आहात तुम्ही ते ठाऊक आहे. सत्काराला बायकोला घेऊन जाणार असाल बरोबर ? काय रूप तरी आहे ! ( पाय आपटते ) हं : ऽ !

शोभा : जाऊ दे—मला काय बाहेर कामं मिळणार नाहीत काय ?

दिनकर : नाही—नाही— असं नको करू...

शोभा : तुम्हाला वाटलं तर घेऊन चला मला लॉजवरून—[ जाते. ]

दिनकर : थांब, थांब शोभा—( कोट घालतो. )

देव : अरे, जाऊ दे तिला—बायकोला घेऊन जा बरोबर—काही बिघडत नाही. आजची संध्याकाळ काही उद्या येणार नाही. उद्या काय होतं ते बघ. उतावळा होऊ नकोस—

दिनकर : रेणू–

देव : है शाबास–!

दिनकर : रेणू–

रेणुका : आले आले–( घाईघाईनं हात पुसत बाहेर येते. ) हो, चला–मी तयार आहे. ( नाकाचा शेंडा लाल–डोळ्यांत पुसट पाणी. )

दिनकर : कुठं जायचंय ?

रेणुका : तुमच्याबरोबर यायचं ना ?

दिनकर : मी तुला सांगितलं होतं ?

रेणुका : नाही–पण–मला तपकिरे म्हणाले–घाई करा–

दिनकर : कसली ?

रेणुका : तयार राहण्याची, सजून–

दिनकर : म्हणजे त्यानं सांगितलं म्हणून तू सजलीस ?

रेणुका : तुम्ही असं नाटकातल्यासारखं काय बोलताय ?

दिनकर : तुझा त्याचा काय संबंध आहे ?

रेणुका : संबंध म्हणजे ?

देव : अरे, चोर आणि जार यांना साव आणि सभ्य जगात असू शकतात, हे कधी पटणंच शक्य नाही, असं तो बलराम म्हणतो ते खरं. अरे, तू तसा आहेस म्हणून तिच्याविषयी असा विचार करतोस–घे थोबाडीत मारून–दिन्या, दिन्या, हीच रे चूक तुझी झाली. आता काय उपयोग ? ( भिंतीकडं पाहतो. )

रेणुका : तिकडं काय बघताय ? तुम्हाला काही होतंय का ? असं काय बोललात तुम्ही ? संबंध म्हणजे काय ?

दिनकर : त्याच्या सांगण्यावरून तू कपडे सजवून... उद्या त्याच्यासाठी कपडे काढून... ( रेणुका खाड्दिशी मुस्काडीत मारते. )

देव : है शाबास–! ( खाली हॉर्न वाजतो–दरवाजात मनू येते. नंतर भाऊ येतो. )

मनू : दिनकर, तुम्हाला गाडीकडं बोलावतात. ( दिनकर भाऊच्या अंगावरून बाहेर जातो. भाऊ रेणुकाजवळ जातो. )

भाऊ : काय झालं ताई ?

रेणुका : आईची तब्येत कशी आहे ?

भाऊ : हे बघ रिपोर्ट्स. ( रिपोर्ट दाखवतो. ) बहुतेक ऑपरेशन करावं लागेलसं वाटतंय.

मनू : तुम्ही नाही गेलात त्यांच्याबरोबर ?

रेणुका : नाही.

मनू : मग त्या जाणार आहेत ?

देव : तुला काय करायचं मने – गप्प बैस—

मनू : ( भिंतीकडं बघून ) बरं—

रेणुका : तू यांना बोलवायला आली होतीस ?

मनू : ते होतंच – पण उदबत्ती लावायला आले होते – तुमची परवानगी असली तर.

रेणुका : कसली उदबत्ती ?

मनू : पूर्वीपासून लावत होते—

रेणुका : कुठं ?

मनू : तिथं– आमचा देव राहतो—

रेणुका : तुमचा ?

मनू : हो – दिनकर देव – मग लावू ? त्याला सहवास घेता येत नाही ना म्हणून सुवास आवडतो.

भाऊ : कोण ग ही चिमुरडी ?

रेणुका : एक विरंगुळा – मैत्रीण आहे माझी. आणि मनू, हा भाऊ माझा मोठा.

मनू : ( पाया पडते. ) उदबत्ती लावू ?

( दरवाजात गुलाब उभा राहतो. )

गुलाब : वहिनी, हे पैसे पाठवलेत – दिनकरनं – येताना पाहिलंन. यांना – काही अडचण लागली तर ?

रेणुका : सध्या असू देत – त्यांना निरोप सांगा – संध्याकाळी परत याल तेव्हा कदाचित मी भेटणार नाही. मी माझ्या भावाबरोबर तातडीनं माहेरी गेले म्हणून सांगा – कारण त्यांना माहीत आहे. [ आत जाते. ]

[ गुलाब जातो. ]

भाऊ : ताईऽऽ, काय झालं ? [ आत जातो. ]

देव : हे काय चाललंय मनू ? हे प्रकरण माझ्या आयुष्यात घडलं नव्हतं—काय होणार आहे—का मी असाच टांगला राहणार आहे आयुष्यभर – याच अवस्थेत—

मनू : म्हणजे तुमचं उत्तर तुम्हीच तुम्हाला दिलंत.

देव : कसं ?

चंद्रालाही सहस्र किरणे – सूर्यालाही एक हजार।
शीतलता का ऊन हवे – तुझा करावा तूच विचार।
तुला हवे ते तू स्वीकार – देणाराचे हात हजार।

(अंक दुसरा समाप्त.)

# अंक तिसरा

( स्थळ : पहिल्या अंकातले. मनू उदबत्ती लावून, नमस्कार करून बसलेली. )

देव : मने, असा कोणता चटका आहे—जो सुखासाठी माणूस स्वतःला लावून घेतो ?

मनू : बिब्बा !

देव : बरोबर बोललीस—

मनू : कुणाच्या सुखात बिब्बा घालू नये असं का म्हणतात ?

देव : सुखात बिब्बा घालतानासुद्धा सुख द्वेष करावा इतकं तीव्र—चांगलं असावं लागतंच—पण यामुळं सन्मार्गानं जाणाराचं काहीच नुकसान होऊ शकत नाही. ज्याचा मार्ग चुकला—तो मात्र सुखाला मुकला. तो आला बघ—तू आता जा मनू—मला त्याच्याशी बोलू दे एकट्याशी.

मनू : प्रायव्हेट ?

देव : हां—प्रायव्हेट. ( दिनकर पुढं होतो. )

दिनकर : काय आहे ? का ग मनू, निघालीस ?

मनू : प्रायव्हेट आहे ना तुमचं ? मग मी कशी थांबू ?

दिनकर : पण तू आपल्या आईकडं नेणार होतीस ना आम्हाला ?

मनू : आधी वहिनींची आई बरी होऊ दे—मग नेईन—[ जाते. ]

देव : बघ, त्या पोरीला जिव्हाळा आहे तुझ्या बायकोच्या आईबद्दल—नशीब समज बायको परत आली. आईचं ऑपरेशन इथंच करायचं ठरलं, म्हणून बिचारी राहिलीय भावाबरोबर तुझ्या घरात, हे नशीब समज. नसती अडचणीत तर नक्की परत आली नसती. ही काय वागणूक झाली तुझी ?

दिनकर : चुकलं.

देव : एवढं जाणवलं तरी खूप झालं—अजून चूक सुधार—आयुष्यात येणाऱ्या आईपासून पत्नीपर्यंतच्या व्यक्ती असेपर्यंत त्यांची किंमत कळत नाही. गेल्यानंतर

कळते! सत्काराला बायकोला बरोबर नाही नेलंस! आयुष्यात येणारे हे सुवर्णक्षण आठवणींच्या चंदनी करंडकात जपून ठेवले तर ते उत्तरआयुष्यात तुम्हाला संजीवनीचं सामर्थ्य देत असतात! बायकोपासून हिरावून असले क्षण एकट्यानं उपभोगू लागलास तर तो कृतघ्नपणा ठरेल! तुझ्या सुदैवानं ती परत आलीय.— ती बघ आली—

[ दिनकर डोळे पुसत असतो—रेणुका प्रवेश करते. ]

**रेणुका :** बरं का नाही तुम्हाला? पाणी का डोळ्यांत?

**दिनकर :** नाही राणी—माझं चुकलं!

**रेणुका :** काय झालं?

**दिनकर :** तुला मी न्यायला हवं होतं माझ्याबरोबर सत्काराला.

**रेणुका :** बरं झालं की नाही नेलंत ते—अहो, मला उगीच गोंधळल्यासारखं वाटलं असतं तिथं—

**दिनकर :** आईपासून बायकोपर्यंत आयुष्यात येणाऱ्या व्यक्ती असेपर्यंत त्यांची किंमत कळत नाही. फक्त गेल्यावर कळते. आयुष्यात येणारे कैक सुगंधी क्षण नुसते आठवणीच्या चंदनी करंड्यात जपून ठेवले तर तो स्मृतिगंध पुढच्या आयुष्यात संजीवनीचं सामर्थ्य तुम्हाला देत असतो. यासाठी चांगले क्षण हातातून हरवू नकोस. अशा आनंदाच्या संधी बायकोपासून हिरावून एकट्यानं उपभोगू लागलास तर तो कृतघ्नपणा ठरेल. कागदाचे कपटे हवेत भिरकावून दिल्यासारख्या या जपून ठेवण्यासारख्या सुवर्णसंधी वाऱ्यावर सोडू नकोस. लेखक आहेस ना तू? जरा बायकोच्या भूमिकेत जा. तू शोभाचा हात धरून अगदी तुझ्या—माझ्या म्हणण्याप्रमाणं कुठलाही विकार न ठेवता रस्त्यानं फिरत असतोस—कल्पना कर,—स्वतःचा नवरा—दुसऱ्या स्त्रीचा हात हातात धरून रस्त्यानं जाताना बघितल्यावर रेणुकाच्या मनात कुठल्या भावनेनं कुणास ठाऊक पण तप्त लाव्हारसाच्या ज्या उकळ्या फुटत असतील—त्या दुःखाला काही शब्द असतील? सांग ना—कर विचार—लेखक आहेस ना तू? काय निवतं उत्तर? डोळ्यांत निथळं ना पाणी? हेच त्याचं उत्तर! ऐक, गेली वेळ पुन्हा येणार नाही—तुझ्या सुदैवानं ती परत आलीय—ती बघ आली.

[ दिनकर डोळे पुसत असतो—रेणुका प्रवेश करते. ]

**रेणुका :** बरं का नाही तुम्हाला? पाणी का डोळ्यांत?

दिनकर : नाही—राणी, माझं चुकलं—!

रेणुका : काय झालं ?

दिनकर : तुला मी न्यायला हवं होतं माझ्याबरोबर सत्काराला—

रेणुका : बरं झालं की नाही नेलंत ते—अहो, मला उगाच गोंधळल्यासारखं झालं असतं तिथं—

दिनकर : मग तयार होऊन कशाला आली होतीस ?

रेणुका : त्यांनी मला मुद्दाम तयार व्हायला लावलं—

दिनकर : तू का ऐकलंस ?

रेणुका : खरं सांगू ? तुमच्याबरोबर आले नाही तर तुम्हाला राग येईल असं मला वाटलं—उगीचंच वाटलं—

दिनकर : नाही राणी—माझंच चुकलं—!

(तिचे दंड धरून कोचावर बसवतो. स्वतःच्या शेजारी—देवाकडं बघतो—देव अंधारात जातो.)

देव : (अंधारातून) 'मी मला बघतोय का म्हणून माझ्याकडंच बघतोय. आणि मीच मला बघेन म्हणून मीच मला भितोय.

दिनकर : तुला खरं सांगू राणी—माझी सध्या मनःस्थिती बरोबर नाही. या घराच्या खरेदीत फार पैसे गुंतलेले आहेत. नवीन नाटकं लिहून पुरं झाल्याशिवाय कंपनी चालवणं अवघड आहे. त्या लिहिण्याच्या अवस्थेत काही वेडावाकडा विचार मनात येऊन गेला—आणि माझ्या हातून काही घडलं तर माझ्यावर रागावू नको राणी.

रेणुका : खरं सांगू ? माझा भाव आपला भोळा आहे. तुम्ही असं काही म्हणालांत की असं वाटतं—तुमच्या सद्‌गुणांवर कुणाची दृष्ट पडू नये म्हणून स्वतःला तुमच्यावरून ओवाळून टाकावं. मी कशी आपल्यावर रागावेन ?

दिनकर : नाही ग—ही माणसं पैसे वाढवून मागायला लागलीत.

रेणुका : कोण ?

दिनकर : शोभानं मागितलेच आहेत शंभर रुपये वाढवून—तो तपकिरेही काही तरी कुरकूर करत होताच. लेकाचे मित्र म्हणवतात आणि कारस्थानं करतात.

रेणुका : वाढवावेत—योग्य वाटत असेल तर—

**दिनकर** : ते ठीक आहे ग — पण बाकी खर्च आहेच ना ?—

**रेणुका** : आईला एकदा बघून येऊ या ?

**दिनकर** : आजचा एवढा दिवस पार पडू दे.

**रेणुका** : म्हणजे ? असं काय बोलता ?

**दिनकर** : नाही राणी. काही तरी विलक्षण घडणार आहे आज — असं सारखं वाटतंय काही तरी. तुझ्या आईसाठी साधारण किती येईल ग खर्च ?

**रेणुका** : काही कल्पना नाही. पण भाऊ म्हणत होता त्याप्रमाणं पाच-सात हजार तरी लागतील.

**दिनकर** : येवढेच ना ? हां, मग बघू — कुठला तरी एक आघात होणार आहे माझ्यावर — त्यातून जरा सावरू दे.

**रेणुका** : हे तुम्हाला आधी कसं कळलं ?

**दिनकर** : त्याला इंट्यूशन म्हणतात. पूर्वसूचना कुठून तरी मिळते म्हणून लिहितो ना ?

**गुलाब** : आज अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तावर शुभवर्तमान घेऊन आलोय. नाटक काढायचं बघा — दहा हजार रुपये ॲडव्हान्स घेऊन आलोय. ( पैसे काढतो. ) पहिल्या प्रयोगाची तारीख सांग — शंभरावा प्रयोग आज डिक्लेअर करतो. संबंध महाराष्ट्र टेरिटोरीचं कॉन्ट्रॅक्ट करतोय.

**दिनकर** : थांब जरा — संध्याकाळपर्यंत सांगतो.

**गुलाब** : का ?

**दिनकर** : माझ्या कानावर काही वेगळंच आलंय.

**गुलाब** : काय ?

**दिनकर** : तू चहा टाकतेस रेणू ? तोपर्यंत याच्याशी मी नवीन नाटकाबद्दल बोलून घेतो.

**देव** : आता हे कुठलं नवीन नाटक ?

[ दिनकर चमकून भिंतीकडं बघतो — ते रेणुका बघते — आत जाते. ]

**दिनकर** : काही तरी कारस्थान चालू आहे कंपनीत.

**गुलाब** : कसलं ?

**दिनकर** : म्हणजे तसं कारस्थान वगैरे नाही — पण कुठून तरी पैसा त्यांच्या हातात येणार आहे आणि वेगळी कंपनी काढायचा विचार आहे.

गुलाब : कुणाचा ?

दिनकर : मला खात्री नाही वाटत, पण अंदाज आहे–की हा तपकिरे आणि शोभाची आई मिळून वेगळी संस्था काढण्याच्या विचारात आहेत.

गुलाब : आणि हिरॉईन शोभा ?

दिनकर : तू दिसतेस चांगली–तुला बघायला प्रेक्षक येतात असं सांगून या तपकिऱ्यानं तिच्या आईला बनवलीय.

गुलाब : तुला कुणी सांगितलं ?

दिनकर : कुणी का सांगेना ? – पण असं असू शकेल ?

गुलाब : पण पैसे कुठनं आणणार आहेत ?

दिनकर : पण आपल्या नाटकाचं काय ?

गुलाब : म्हणजे ?

दिनकर : नाटक पुरं व्हायला पाहिजे ना ?

गुलाब : का ?

दिनकर : शोभा नसली तर आपल्या हातनं नाही बुवा लिहून होणार—

गुलाब : कोण म्हणतं ?

दिनकर : म्हणजे ?

गुलाब : शोभा येण्यापूर्वी लिहिलेल्या नाटकांत लिहिताना कोण होती जोडीला ?

दिनकर : पण ती वेळ वेगळी होती.

गुलाब : जाऊ दे–येऊ दे तर प्रत्यक्ष शोभाला–खात्री करून घे. नाटक ती कुठं बाहेर जायच्या आत पुरं करून घे. हे पैसे तयार आहेत. पुढचं बघू या.

दिनकर : नाही–पण तिला मी काम देतो असं कबूल केलंय.

गुलाब : कोण नाही म्हणतं ?

तपकिरे : [ प्रवेश करून ] छे: ! ही बाई फार ताप देते बाबा डोक्याला.

दिनकर : कोण बाई ?

तपकिरे : आपण डोक्यावर चढवून ठेवलेली आपली हिरॉईन.

दिनकर : काय केलंन् तिनं तुझं ?

तपकिरे : ती पुढच्या नाटकात असली तर आपल्याला काम करायचं नाही.

गुलाब : तिचं काय ठरतं ते पाहू आणि नंतर तुझा विचार करू. बैस इथे.

पण तुझं हे काय नाटक आहे ?

तपकिरे : कसलं नाटक ?

दिनकर : तू आणि तिची आई—कंपनी काढताय असं ऐकलं मी—

तपकिरे : ते तिनंच सांगितलं असेल. कारण नसताना—तुला कुणी सांगितलं—

दिनकर : बातमी खरी का नाही ?

तपकिरे : माझं नाव केलंय—चाल आहे तिची—

दिनकर : कुणाची ?

तपकिरे : अरे, म्हणून तर मी संतापून आलोय. मलाच निरोप सांगायला सांगितला आहे शोभाच्या आईनं तुला—

दिनकर : कसला निरोप ?

तपकिरे : अरे, मी काय नोकर आहे तिचा ?

दिनकर : अरे पण, निरोप काय आहे ते सांगशील का नाही ?

तपकिरे : तुला बोलावलंय तिच्या आईनं—

गुलाब : स्पष्ट बोल—

दिनकर : कशाला ?

तपकिरे : काही धंद्याच्या गोष्टी बोलायच्यात म्हणे—

दिनकर : काय बोलणार आहे ?

तपकिरे : आता तुझ्याशी ती काय बोलणार आहे हे मला काय ठाऊक असणार आहे ?

दिनकर : वा:!—तुला तर सगळं ठाऊक असतं—शोभा आहे का घरी ?

तपकिरे : नसायला काय झालं ?

दिनकर : बघ—आहे का नाही ठाऊक ?

तपकिरे : त्यांनी कंपनी काढायची ठरवलीय—तुझं नाटक घेऊन—

दिनकर : कोण म्हणतं ?

तपकिरे : ऐक जाऊन आईकडनं—ही शोभा साली आमच्यानंतर आलेली पोरगी. मला डझनभर केळी आणून द्या म्हणून सांगते समोरच्या दुकानातून.

दिनकर : दिलीस ना ?

तपकिरे : सभ्य माणूस म्हणून दिली. नोकर म्हणून नव्हे. कंपनी काढायच्या आधीच मालकीण झाली. सांगितलं ना—ती जर पुढच्या नाटकात असेल तर

आपण नाही. ही तुझं नाटक घेणार–आज ही माझ्यावर अधिकार गाजवते. उद्या वहिनींना स्वैंपाक करायला लावील.

दिनकर : तिचा का तुला एवढा कळवळा ? आणि काय रे, बाहेर गावी दौऱ्यावर असताना–माझ्या आणि शोभाच्याबद्दल तू घरी येऊन माझ्या बायकोला काहीही सांगतोस ?

तपकिरे : काहीही म्हणजे ?

दिनकर : दौऱ्यावर असताना आम्ही दोघं एका खोलीमध्ये राहतो असं सांगितलंस ?

तपकिरे : पण आई बरोबर असते तिची असंही सांगितलं होतं.

दिनकर : तिथं आम्ही काय करत असतो असं तुला सांगायचं असतं ?

तपकिरे : तुमचं मला काय ठाऊक असणार ?

दिनकर : अरे गाढवा, मग ठाऊक नसलेलं तिला सांगितलंस आणि तिनं जर आपलं काही वेडंवाकडं करून घेतलं–तर त्याला जबाबदार कोण ?

देव : तू शहाण्यासारखा वागलास तर ती कशाला वेडंवाकडं वागेल ?

दिनकर : माझा तिच्याशी कसलाही गैरव्यवहार नाही. ( भिंतीकडं बघून बोलतो. ही दोघं एकमेकांना खूण करतात–हे असं का ? )

तपकिरे : अरे, म्हणूनच आई बरोबर असते असं सांगितलं ना ?

दिनकर : अरे, पण का ?

तपकिरे : जाऊ दे ना–आपला संबंधच संपतोय. हवा कशाला व्याप ? तिच्याशिवाय तू नाटक लिहिणार नाही आणि ती नाटकात असली तर आपण काम करणार नाही !

गुलाब : अरे, लिहून तर होऊ दे–पुढं बघू.

तपकिरे : ती नसली तर काम कोण करणार आहे ? [ रेणुका चहा घेऊन येते. ] वहिनी !

रेणुका : काय म्हणताय भाउजी ?

गुलाब : तुम्ही नाटकात काम कराल काय म्हणून विचारत होता —

रेणुका : तुम्ही मला इतकी बावळट नका हं समजू ? वेळ आली तर मलासुद्धा नटीसारखं काम करता येईल. बघा—(पाय आपटून) काय तरी मेलं रूप आहे ?

तपकिरे : शोभाची नक्कल छान केलीत हं वहिनी.

**दिनकर :** तुला का तिचा एवढा राग ? असो—दोनच कप चहा आणलायस ना ? या दोघांना दे—मी जरा जाऊन येतो—यानं निरोप आणलाय—

**रेणुका :** तिची नक्कल केली म्हणून राग आला वाटतं ?

**दिनकर :** राग कसला यायचाय ? नक्कल ती नक्कलच.

**गुलाब :** मग नाटकाचं काय ? अॅडव्हान्स घ्यायचा ना ?

**दिनकर :** परत आल्यावर सांगतो. [ निघतो—समोरून भाऊ येतो. ]

**दिनकर :** ( तपकिरेला ) आपले वडील सध्या कुठं असतात ?

**तपकिरे :** वर असतात ?

**दिनकर :** मग ? चहा कोण घेणार ? आपले वडील ?

**दिनकर :** ( भाऊला ) तुमची आमची दरवाजातच भेट व्हायची असं ठरलेलं दिसतंय.

**भाऊ :** हो. तसाच योग दिसतोय.

**दिनकर :** ए रेणू, यांची ओळख करून दे ना भावाशी. [ जातो. ]

**भाऊ :** ( हसत ) काय, निघालात वाटतं ?

**रेणुका :** यांचं नाव वामन—माझा हा मोठा भाऊ—

**भाऊ :** त्यामुळंच वामन या नावानं मला कोणी ओळखत नाही. मला म्हणतात भाऊ—

**तपकिरे :** मग या ताई असतील ?

**भाऊ :** कशावरून ?

**तपकिरे :** वा: !—त्याशिवाय कौटुंबिक नाटक पुरं होत नाही ना ?

**भाऊ :** नाटक कसलं ?

**तपकिरे :** संसाराचं—आई, वडील, भाऊ, ताई ही चार, आणि रांगोळी घालायला शेजारी सून असल्याशिवाय कुटुंबाची गर्दी नाटकाला होत नाही ना ?

**रेणुका :** तुम्ही उपहास करताहात त्या विचारांचा की ज्याच्यावर तुमचा चरितार्थ चालू आहे. भाऊ, काय म्हणाले डॉक्टर ?

**भाऊ :** आत चल, सांगतो.

**रेणुका :** तुम्ही चहा घ्या—मी येते,—बसा ना. [ भाऊ, रेणुका आत जातात. ]

**तपकिरे :** काय हाणलाय छान—छान !—बघ साल्या—हे घरंदाज प्रेम बघ नवऱ्यावरचं.

गुलाब : वा: ! स्वत:लाच बसलेल्या जोड्याचं स्वत:च कौतुक कर. काय रे—तू ही डबल पॉलिसी कसली खेळतो ?

तपकिरे : कसली पॉलिसी ?

गुलाब : तू आणि ती म्हातारी कंपनी काढणार, आणि शोभा नाटकात असेल तर तू काम करणार नाही—हे कसं जुळायचं ?

तपकिरे : या कंपनीत ?

गुलाब : म्हणजे—खरंच तुम्ही वेगळी कंपनी काढणार आहात ?

तपकिरे : मी नव्हे—आई-शोभाची.

गुलाब : आणि नाटक ?

तपकिरे : दिनकरचं—

गुलाब : आणि पैसा ?

तपकिरे : शोभाचा—

गुलाब : म्हणजे ?

तपकिरे : दिनकरचा.

गुलाब : तो पैसा देईल ?

तपकिरे : ते शोभा बघून घेईल.

गुलाब : तुझा काय संबंध ?

तपकिरे : कुणाशी ?

गुलाब : या सगळ्या प्रकरणाशी—

तपकिरे : साधक.

गुलाब : साधक म्हणजे ?

तपकिरे : स्वत:चं साधून घेणारा—

गुलाब : म्हणजे ?

तपकिरे : तिला जर कंपनीतनं काढली तर इकडे आहे,—तिनं कंपनी काढली—तर तिकडं जाईन. साधारणपणे कोणता पक्ष निवडून येईल ते बघायचं, आणि तिकिट मागायचं.

गुलाब : दोन डगरीवरी हात ठेवले, एकही येईना हाताला—अशी एक लावणी ऐकली आहेस का कधी ?

तपकिरे : हाताचा संबंध येतच नाही. हातभर लांब राहून सगळे उद्योग

करायचे. आमचा संबंध पायाशी—तारेवरचा नाच—बायकोच्या हाताची जबाबदारी असूनसुद्धा जर यांचं शोभाशिवाय जमत नसेल तर मग आम्ही बरे—त्या बिचाऱ्या वहिनींच्या मनाचा कुणी विचार केलाय ? त्यापेक्षा आमचं बरं—सडा फटिंग—मागं विरहानं रडणारं कुणी जोडायचं नाही. मग रोज नवे संबंध जोडले तरी दोन्ही बाजू निर्धास्त.

गुलाब : पण त्या दोघांच्या चुगल्या का करत असतोस वहिनींच्याकडे ?

तपकिरे : सरळ आहे—

गुलाब : काय ?

तपकिरे : मला शोभापासून दिनकरला तोडायचाय—

गुलाब : अरे, पण का ?

तपकिरे : खेळ—जो फक्त मीच करू शकतो—सडा एकटा—

[ रेणुका, भाऊ प्रवेश करतात. ]

रेणुका : असं एकटे किती दिवस राहणार आहात ? दुकटी बघा की एकदा—

तपकिरे : अहो वहिनी, भानगड अशी आहे—माझी नजर जिच्यावर तिचं लक्ष दुसऱ्याकडं. (सगळे हसतात. भाऊ गंभीर.)

रेणुका : फार चांगले विनोदी नट आहेत, बरं का हे भाऊ—

भाऊ : विनोदी म्हणजे ज्यांचं बोलणं ऐकल्यावर हसायचं असतं ते ना ?

रेणुका : ( संकोचून ) याला नाटकाचा वगैरे तसा काही पाहण्यापुरताही संबंध नाही.

भाऊ : नाही—तसं पाहिलं होतं गणेशोत्सवात एकदा. अहो, पण आम्ही आपली रूक्ष माणसं—सायन्सचा प्रोफेसर—सूर्यफूल. ज्या दिशेला सूर्य वळतो त्याच दिशेला का तोंड करतं ?— सौरशक्तीचा उगम सूर्यफुलात कुठं सापडतो का याचा शोध घेणारी छांदिष्ट माणसं आम्ही—असो; बाकी, तुम्हाला त्यात काय कळायचं म्हणा—

तपकिरे : पण सहजस्फूर्त विनोद ऐकूनसुद्धा हसू फुटत नाही ?

भाऊ : मनःस्थिती परिस्थितीवर असते.

तपकिरे : म्हणजे ?

भाऊ : माझ्या आईला कॅन्सर झालाय—ऑपरेशन करायला हवं आहे. याही वेळी मी तुमच्या विनोदाला हसायलाच हवं होतं का ? ( तपकिरे उठतो—

जातो – फोन वाजतो. ) हा आला बघ फोन. ( फोन घेतो. )

**शोभा :** ( प्रवेश करून ) नमस्कार वहिनी. ( रेणुका नाकावर बोट ठेवून तिला – बोलू नका – तो फोनवर बोलतोय – अशी खूण करते. तिनं पाठ फिरवल्या-वर ही पाय आपटते. तिच्याकडे बघत सिगारेट विझवतो. ती ओशाळवाणी हसते. )

**भाऊ :** हॅलो...हो, मी वामनच बोलतोय, हं...काय ठरलं. डिसिजन ?... ऑं आत्ताच ! अरे बापरे... ! हो हो, विचार कसला करता, मामा,... हो म्हणून सांगा ! सही – ? मी येतोच, ऑंऽऽ... आत्ताच भरायचेत ? – बघतो मी !—

**रेणुका :** काय झालं ?

**भाऊ :** काही नाही. आईचं. सांगतो मग.

**शोभा :** सॉरी हं – मघाशी तुम्ही फोनवर बोलत होतात – मी मध्येच ओरडत आत आले.

**भाऊ :** संवयीमुळं असेल.

**शोभा :** कसल्या ?

**भाऊ :** नाटकात ओरडावं लागत असेल ना नेहमी ?

**शोभा :** ( खळखळून हसत ) काय सुरेख बोलतात ? – हे भाऊ का तुमचे, वहिनी ?

**रेणुका :** तुम्हाला कसं ठाऊक ?

**शोभा :** तुम्ही नसलात – तरी मी हे घर आपलंच समजते. मला दिनकरनं सांगितलं – वाः ! – आणि दिसतात अगदी तुमच्यासारखे—

( गुलाबकडे पाहून नाक मुरडते. )

**भाऊ :** आमचे मामा तर म्हणतात – ती आईच्या वळणावर गेलीय, आणि मी बाबांच्या—

**शोभा :** हे शिकलेले आहेत ना खूप ?

**भाऊ :** कसलं हो – प्रोफेसरची नोकरी करतो सायन्सच्या.

**शोभा :** म्हणजे काय लहान-सहान गोष्ट झाली होय ? तुमच्यासारख्या माणसाचा जन्माचा सहवास लाभेल ती भाग्यवान.

**भाऊ :** छे बुवा, – फारच तुम्ही लाजवता !—

**शोभा :** कोण ? तुमची आई आजारी आहे ?

**भाऊ :** होय ना! नाही, — बरी होईऽऽल...

**शोभा :** काही अडचण असली तर सांगा हो — अगदी घरची समजा. वहिनी, जरा आतली खोली दाखवा हो. नवीन ड्रेस घेतलाय एका नाटकासाठी.

**रेणुका :** दुसऱ्याच्या—

**शोभा :** अजून नक्की नाही — पण घालून तर बघते. ( दोघी जायला वळतात. )

**गुलाब :** वहिनी, जरा एकट्या बाहेर या, — तुमच्याशी बोलायचंय —

[ दोघी जातात. ]

**भाऊ :** वाः! बाई अगदी घरंदाज कुटुंबातल्यासारख्या वाटतात, नाही ?

**गुलाब :** हो ना — कौटुंबिक नाटकात फार चांगली कामं करते!

**रेणुका :** ( प्रवेशत ) काय म्हणता ?

**भाऊ :** नाही — मी यांना म्हटलं, — बाई अगदी घरंदाज — कौटुंबिक वाटतात.

**रेणुका :** यांनीच शिकवलंय त्यांना पहिल्यापासून. हं — तुम्ही काय म्हणता ?

**गुलाब :** वहिनी, नाटकासाठी ॲडव्हान्स म्हणून दहा हजार रुपये मिळालेले आहेत. ( दरवाजात शोभा उभी ) या नोटा एवढ्या कुठं जवळ बाळगू ? त्याच्याजवळ द्यायच्या त्या तुमच्याजवळ देऊन ठेवतो. दुसऱ्या कुणाच्या हाती लागण्यापेक्षा — तुमच्याजवळ सेफ — तपकिरे जाईपर्यंत थांबलो — उगीच भटकणी नको.

**शोभा :** ( पुढं येत ) माझी पर्स राहिली. ( पर्स घेऊन जाताना भाऊकडे पाहते. )

**गुलाब :** मी दिनकरजवळ बोललोय. बरं येऊ मी. फार वेळ वाट पाहिली आणि मी गेलो म्हणून सांगा. [ गुलाब जातो. ]

**भाऊ :** ताई, मघाशी सगळयांच्या देखत बोलणं योग्य दिसलं नसतं. शिवाय तुलाही उगीच अवघडल्यासारखं वाटलं असतं! मघाशी फोन आला होता ना मामाचा ?... मला वाटलं होतं की अजून दहा-पंधरा दिवसांचा अवकाश असेल म्हणून! पण डॉक्टर म्हणतात की आईला आजच ऑपरेशन टेबलावर घ्यायला पाहिजे म्हणून!

**ताई :** आता रे ?—

**भाऊ :** घाबरू नकोस ताई, तसं काहीही सीरियस नाहीये. ऑपरेशनसुद्धा अगदी व्यवस्थित होईल, असं म्हणाले डॉक्टर! हां, खरंच! पण ताई, मी

विचार करत होतो पैशाचा. नाही, म्हणजे एकदम एवढे लागतीलसे वाटलं नव्हतं. त्यामुळे येताना मी थोडेच पैसे आणले होते, पण आता एकदम एवढे सगळे पैसे आजच भरायचे म्हणजे ऽ ऽ ऽ

ताई : अरे पैशाचा कसला विचार करतोस ? — हे घे पैसे !

भाऊ : सगळे घेऊन जाऊ ?

ताई : राहू देत, देशील परत—

भाऊ : ताई ऽ ऽ मला वाटलंच होतं बघ ! परमेश्वर पाठीराखा होऊन पाहात असतो, हेच खरं. बरं, मी आता पुढं होतो. तू दिनकरराव आल्यावर त्यांना सगळं नीट समजावून सांग, आणि मग तुम्ही दोघंही तिकडेच या. मी वाट पाहतो हं. येऊ ? [ जातो. ]

( रेणुका एकटी उभी आहे — हातातल्या उरलेल्या नोटा टेबलाच्या खणात ठेवते— टेबलावरची वही घेऊन वाचते. ) ( पुढील ओळी ऐकू येतात— )

दोन मनांचे मीलन म्हणजे, शुभमंगल सहवास ।
हवी असावे मीहि तुला अन् तुही मला हवास ॥ धृ. ॥
शुभमंगल सहवास ।

तुझ्यावेगळे चिंतन नाही — तुझ्यात मीपण गुंतून राही ।
तू माझेपण — मीच तुझेपण — म्हणती अवघे श्वासोच्छ्वास—
म्हणती श्वासोच्छ्वास ॥ १ ॥

डोळयांच्या काचमहाली, बाहुली, तुझी सानुली ।
क्षण विरहाची शंका येता, ताटातुटिच्या तारा तुटती ।
अश्रू ओघळती — ढळे का त्यांचाही विश्वास ॥ २ ॥

माझंच चरित्र नाटकातून कुठं लिहितात की काय कुणास ठाऊक ? शास्त्रशुद्ध लग्न झालेलं असलं म्हणून काय खरं प्रेम असूच नये ? माझा नवरा मला माझा हवा असतो — हा काय माझा गुन्हा ? ( वही ठेवून देते — नकळत तिचं लक्ष त्या जळत असलेल्या उदबत्तीकडे जाते. ) नाही तरी आपणच देव निर्माण करतो — मनू इकडे उदबत्ती लावते — हे ही इकडे कधी मधी बोलताना दिसतात — असलाच जर कोणी देव इथं तर माझं एवढं गाऱ्हाणं ऐक—

देव : काय करू रे ? माझं अस्तित्व इथं असून तिला मी जाणवू शकत नाही.

काय करू ? हिला मी आता एक उपाय सांगितला असता—काय करू. माध्यम पाहिजे—हिला म्हणावं तू नाटकात काम कर. सगळा गुंता सुटेल. तू दिसत असशील तशी कॅरेक्टर लिही म्हणावं—लेखक म्हणवतोना चोर. पण हे हिला सांगायचं कुणी ? [ इतक्यात मनू येते ] मने, ही डोळे मिटून बसली आहे ना तिला म्हणावं—देव म्हणतो तू नाटकात काम कर—सगळया चिंता मिटतील.

मनू : देव म्हणतो तू नाटकात काम कर.

( रेणुका दचकून डोळे उघडते — शोभा फुल ड्रेस्ड उभी राहते. )

शोभा : काय गं चिमटे — कुणाला म्हणतेस नाटकात काम कर ?

( मनू तिच्याजवळ जाते आणि तिला चिमटा काढते— लांब जाऊन उभी राहते. ) काय ग हे ?

मनू : तुम्ही जे म्हटलंत ते मी करून दाखवलं —

शोभा : कुठली हो मुलगी आहे ही ? अशी कशी भलतीसलती मुलं घरात वाळगता हो ? दिनकरला सांगायला हवं —

रेणुका : ( मनूला जवळ घेत ) ही माझ्या बहिणीची मुलगी आहे. ( शोभा पाय आपटते. )

मनू : ( तसाच पाय आपटत ) आणि नसले तरी काय झालं ? माणसं राहतात तिथं मुलं यायचीच— तुमच्या नाटकात माणसं रहात नाहीत ?

शोभा : नाही— भुतं राहतात—

मनू : इथं देव राहतात— !

शोभा : मला नाही कुठं दिसत ?

मनू : भुतांना देव दिसत नाही. म्हणून तुम्हाला मुलं आवडत नसतील.

रेणुका : जाऊ दे— तुम्ही काय त्या मुलीच्या नादी लागताय ?

शोभा : ( हुंदका देऊन ) म्हणजे आता तिची बाजू घेऊन तुम्ही माझ्या अंगावर धावून येता होय ? [ दिनकर येतो ].

मनू : या कुठं तुमच्या अंगावर धावल्या ?

शोभा : मी तुम्हाला आवडत नाही असं असेल तर घरी येत जाऊ नका म्हणून सांगा—

रेणुका : अहो, पण—

दिनकर : पुरे—रेणू—तू आत चल. [ रेणुका आत जाते. ]

मनू : अहो, पण या काही बोलल्या—

देव : मने—घरी जा;—तू बोलू नकोस.

मनू : बरं. [ मनू जाते. ]

दिनकर : तुला भेटायला म्हणून मी मुद्दाम तुझ्या घरी गेलो—

शोभा : आणि आईला नक्की भेटायला येणार नाही असं मला वाटत होतं म्हणून मी इकडं आले—मला वाटलं नक्की तुम्ही इथं असाल—यापुढं मी नाही हो तुमच्या घरात येणार—तू नसताना—

दिनकर : का ग शोभा ?

शोभा : आम्ही तुमच्यासाठी एवढं तळमळतो—पण तुमच्या घरात मी आलेलं आवडत नाही तुमच्या बायकोला—माझा राग वाटत असेल—मला प्रसिद्धी आहे ना—रूप आहे—जळत असतील !

दिनकर : छे ग,—साध्वी आहे बिचारी !—भोळी—तिच्या मनातही नसेल काही.

शोभा : वा ! आज अगदी लाडक्या राणीचा फार कळवळा आलेला दिसतो ?

देव : आला असला माझ्या बायकोचा मला आला—तुला जळायला काय झालं ? असं विचार तिला ?

दिनकर : तसं नाही ग—अग, तिनं परवा आपला नेकलेससुद्धा, तुला आग्रहानं द्यायला सांगितला—

शोभा : हो—तेवढं तोंडावर फेकलं म्हणजे बाकीचा पैसा लुबाडायला मोकळ्या.

दिनकर : लुबाडायला म्हणजे ?

शोभा : वरं बांधा ना आणखी—आई म्हणते—माझ्या मुलीच्या जिवावर पैसे मिळवता आणि बायकोच्या उरावर घालता—सगळे लोक येतात ते तुला पाहायला—

दिनकर : खरंच आहे तिचं—

शोभा : पण तरी मी तिच्याशी भांडते—मला तुम्ही पाहिजे असता—पण तुमच्या घरात मात्र मी—

दिनकर : थांब तू—मी तिला आत्ता बोलावून सांगतो—

शोभा : नको—माझ्यासमोर नको—लाडकीला जवळ घेऊन बसा आणि एकान्तात सांगा— ( उठते—तो बसवतो ) कशाला ? माझ्यासाठी काय करता तुम्ही ?

दिनकर : असं काय शोभा ? तुझ्यासाठी आता मी तुझ्या आईजवळ काय कबूल करून आलोय विचार—

शोभा : काय ?

दिनकर : शोभाला विचारून सांगतोय म्हटलंय—

शोभा : काय ? नाटक द्यायचं कबूल केलंत तुम्ही आईला ?

दिनकर : काय करू ?

शोभा : नको, दिनकर – आईला नाटक दिलंत तर मी काम करणार नाही.

दिनकर : शोभा—

शोभा : नाही – कंपनी आपली आहे दिनकर – तुमची आहे – नाही, नाही; नाटक दुसऱ्या कुणाला – माझ्या आईलासुद्धा द्यायचं नाही. हा त्या तपकिऱ्याचा कट असेल – त्याला बघवत नाही ना आम्ही दोघं एकत्र आलेलं – त्यात बायकोची साथ – नाही, नाही; दिनकर—

दिनकर : हा कुठला पोषाख घातलायस तू आज ?

शोभा : घ्या – हे तुमचं आमच्याकडं लक्ष—

दिनकर : हं – तो परवा दाखवलास तो इंग्लिश मॅगझिनमधला ?

शोभा : आपणच नाही का आणला दुकानातून ?

दिनकर : त्या वेळेला बांधलेला होता ना, त्यामुळे लक्षात आला नाही.

शोभा : आणि आता !

दिनकर : त्यानं तुला बांधल्यानं त्याला शोभा आली.

शोभा : खोटं—

दिनकर : खरंच सांगतो तुला शोभा – (उपमा सुचायलासुद्धा कारण लागतंच. कोण कारण होतं हा महत्त्वाचा मुद्दा नाही. पण कालिदासालासुद्धा शाकुंतल सुचण्यापूर्वी तशी सौंदर्यप्रतिमा दिसलीच असली पाहिजे. एरव्ही काव्य हे स्फुरणंच शक्य नाही. महाभारत वा रामायण अशा महाकाव्याच्या लेखकांना-सुद्धा प्रतिभेला नाजुक हातांनी धक्का देण्यासाठी क्रौंच पक्षी प्रतिभेचं कारण असू शकेल. त्या क्षुद्र पक्ष्याला बघून त्याला रामायण सुचलं. )

शोभा : किती छान तुम्ही बोलता ?

देव : हिला काही कळलेलं नाही – पण ती कलावती आहे—

दिनकर : तुला बघून मला सुचतं – तुला ऐकवावंसं वाटतं – म्हणून तुला

भेटायला मी इकडं तिकडं धावत असतो—शोभा, मला तुझ्यापासून काही नको—फक्त तुझा सहवास हवासा वाटतो—वसंत ऋतू सुरू झाल्यावर कोकिळेचा स्वर कानावर पडावासा वाटतो तसा— नाही तर काव्य होत नाही. आकाशात ढग जमले नाही तर मोराला कंठ फुटत नाही. मोराचा पिसारा फेलल्याशिवाय इंद्र-धनुष्याला रंग फुटत नाही.

**तुझ्या डोळ्यांतले पाणी—गुलाबाचीच निगराणी।**
**करी गालांवरी लाली—गुलाबगंधित जलपानाचा।**
**स्वाद घेऊनि उमले — सखीला प्रेमपत्र पहिले—।**

झालं माझं नाटक लिहून पुरं. शोभा, तिसरा अंक, झाला लिहून.

**शोभा :** कुठल्याही परिस्थितीत आईला नाटक द्यायचं नाही.

**दिनकर :** नाही—

**शोभा :** आपली कंपनी चालू दे—

**दिनकर :** तू असल्यावर मला काय कमी आहे ?

**शोभा :** बरं झालं—मग मला ते पैसे देता ना ?

**दिनकर :** कसले ग ?

**शोभा :** विसरलात होय ? म्हटलं नव्हतं का तुम्हाला ? माझा तो मामेभाऊ इंग्लंडला जायला निघालाय—त्याला दहा—हजार रुपये लागतील.

**दिनकर :** हां—हां,—ते होय ?—एवढं लिहून होऊ दे—त्याशिवाय माझ्या हाती यायचे नाहीत.

**शोभा :** मग त्यापेक्षा सरळ द्यायचे नाहीत असं सांगा की—

**दिनकर :** असं कसं म्हणतेस ?

**शोभा :** विचारा तुमच्या बायकोला दिलेत की नाही मॅनेजरनं ॲडव्हान्स म्हणून ?

**दिनकर :** खरंच, दिलेत त्यानं पैसे ?

**शोभा :** रेणू ... रेणूजवळ.

**दिनकर :** सॉरी शोभा.

**शोभा :** माझ्यावर विश्वास नाही तुमचा ?

**दिनकर :** विश्वासाचा प्रश्न नाही. रेणू;—पण तुला नंतर दिले तर ?

**शोभा :** नंतर नाही. मलाही तुमची कसोटी पाहायचीय—पैशावर प्रेम करता

का माझ्यावर करता? तुम्ही पैसे द्या तर मी उद्याच्या प्रयोगात आहे—नाही तर मी चालले—

देव : अरे, जात असली तर जाऊ दे—ही गेली दुसरी येईल— पण नाटक—तेच होईल. शेवटी नाटक ते नाटकच!

दिनकर : नाही—नाही—असं नाही.

देव : अरे बाबा—असंच आहे!

दिनकर : छे, छे, तुझ्याशिवाय आपला प्रयोग नाही होऊ शकत—एक हात गळाल्यासारखा होईल माझा. रेणू—रेणू—[ रेणुका येते. ] रेणू—गुलाबनं काही अ‍ॅडव्हान्स दिला होता तुझ्याजवळ?

रेणुका : हो—पण ते जरा नंतर सांगते—

शोभा : हं—माझ्यासमोर बोलायचं नसेल—

दिनकर : दिलेत का त्यानं पैसे? तुला विचारतोय, रेणू?

रेणुका : अं ऽ ऽ?

शोभा : पन्नास हजार रुपये—

दिनकर : तुला कसं कळलं?

शोभा : तपकिऱ्यांनी सांगितलं.

दिनकर : त्याचा काय संबंध?

शोभा : ते त्यांनाच विचारा.

दिनकर : ते पैसे कुठायत?

रेणुका : पैसे नाहीत—

दिनकर : म्हणजे?

रेणुका : ते मी भावाला दिले—

दिनकर : कुणाला विचारून?

शोभा : त्यापेक्षा दुसरी काही तरी युक्ती काढायची होती न द्यायला—

दिनकर : का दिलेस?

रेणुका : आ—आई—

दिनकर : आई—आई—काय? काय झालंय?

रेणुका : ते पैसे माझा भाऊ घेऊन गेलाय—नाही—चूक झाली—मी ते घेऊन परत येते— फोन—

(मान खाली घालून बाहेर चालू लागते — समोरून गुलाब येतो — गुलाब एकदा रेणूकडे व एकदा दिनकरकडे पाहतो — ती जाते.)

**गुलाब :** काय झालं ?

**दिनकर :** तू पैसे दिलेस रेणूजवळ ?

**गुलाब :** हो — पण तसे तुला मिळणार नाहीत.

**दिनकर :** म्हणजे ?

**गुलाब :** नाटक झालं पूर्ण ?

**दिनकर :** हो — आत्ताच — ही आली आणि झालं—

**गुलाब :** ते समजलं — तारीख बोल—

**दिनकर :** पुढच्याच महिन्यात आजचीच तारीख — ठरलं ना शोभा ?

**गुलाब :** तू आहेस ना ? पुढं बघू —

**दिनकर :** तिच्याशिवाय नाटक नाही होणार—

**गुलाब :** पाहू या रे — त्याला वेळ आहे.

**दिनकर :** तू एक काम कर—

**गुलाब :** काय ?

**दिनकर :** हिची आई कुठल्या ठिकाणी आहे — ठाऊक आहे तुला ?

**गुलाब :** हो — त्यांच्या भावाला मी एकदा सोडलं होतं—

**दिनकर :** तू टॅक्सीनं जा — तिला गाठ — आणि बरोबर घेऊन ये—

**गुलाब :** का रे ?

**दिनकर :** पैसे आहेत तिच्याजवळ — एकटी यायला नको — [ गुलाब जातो. ]

**शोभा :** हं ! (पाय आपटते.) एवढी बायकोची काळजी वाटत असली तर तिलाच बसा ना कुरवाळत. (उठते.)

**दिनकर :** तू कुठं जातेस ? तुला पैसे हवेत ना ?

**शोभा :** द्या — तुम्हाला गरज असेल तर पाठवून — मला काय कमी आहे ? लाखो देणारे पडलेत —

**देव :** नंतर त्यांचे दात पडलेत —

**दिनकर :** पण तू थांब ना—

**शोभा :** एक अट आहे माझी — ऐकता ? आपल्या लाडक्या बायकोसाठी,

पूर्वजांची खूण म्हणून विकत घेतलेलं आहे ना हे घर तुम्ही? आम्ही रक्ताचं पाणी करून नाटकं केली—आणि तुमची घरं भरली. ते घर माझ्या नावावर करून द्यायची तयारी असेल तर तसा निरोप पैसे न्यायला तपकिरे येतील त्यांच्याबरोबर पाठवा,—तरच तुमच्या पुढच्या नाटकात मी काम करीन— [ निघून जाते. ]

देव : आता दे उत्तर—विसर बायकोनं तुझ्यासाठी तुझ्याबरोबर काढलेले हाल. तुझा प्रत्येक अपराध आईनं पोटात घातल्यासारखा तिनं तुझा सहवास केला तो विसर—आणि लाग मागं जे तुझं नाही त्याच्या—स्वतःची नसलेली कुठलीही वस्तू कितीही आकर्षक वाटली तरी ती आपली नाही ही जाणीव सतत मनात बाळगली पाहिजे.—दिनकर—म्हणजे पुढं होणाऱ्या ताटातुटीच्या चिंतेनं पुढं होणाऱ्या दुःखाची कल्पना करण्यातच जन्म वाया जात नाही. वास्तविक त्या आकर्षणावरचं आपलंही प्रेम खरं नसतंच. आपणच आपल्या मूर्ख हट्टानं ते खरं धरून चालतो. तिच्यावाचून आपलं अडतं असं वाटणं हा पुरुषार्थाला कमीपणा—मनाचं दुबळेपण—हे झटकून टाक;)—एक काम कर—निरोप पाठव तिला—एरवी पैसे द्यायचेच आहेत ना? हा एक अनुभव घे—जो मी घेतला नव्हता—तो तुला घ्यायला सांगतोय. मला मुक्तीची संधी हवीय—हाच क्षण माझ्या आयुष्यात आला होता—मी तुला सावध करतोय—माझं ऐक—कल्याण होईल—तुझंही आणि माझंही;—एकच लहानसा मी सांगतो तो त्याग कर. जगातलं फार मोठं ज्ञान तुला मिळेल—हं—त्या वेळी मला माझा वारस माझ्या घरात येणार आहे हे कळलं नव्हतं—तुझाही वारस तुझ्या घरात येतोय. त्या बायकोची दया कर—या अवस्थेत तरी—एक लहानसा त्याग कर. पाठव तिला निरोप—तुझी बायको काही परत येईलसं दिसत नाही. माझी आली नव्हती. तुझी आली तर काही सांगता येत नाही. (फोन)

( फोन वाजतो—दिनकर फोनकडे जातो. ) तू म्हणजे मी चंचल आहे मनाचा आता तुझ्या मनात एकाएकी बायकोविषयी अमाप प्रेम उचंबळून यायला लागलंय—खरं ना? ( दिनकर त्याच्याकडे बघतो—फोन उचलतो. )

**दिनकर :** हॅलो—काय? गुलाब—हां—काय रे? नाही—वहिनींचा काही पत्ता नाही? चुकामूक होते म्हणजे काय? शोध, ती तिथंच पत्ता कुठं तरी

आहे. (फोन ठेवतो.)

देव : आता ऐक — मी माझ्या मरणाची गोष्ट तुला सांगतो — ज्याला विश्वास ठेवायचा असेल त्यानं स्वत:इतका माझ्यावर ठेवावा. असाच तुझ्याचसारखा मी ऐन प्रसिद्धीच्या शिखरावर होतो. त्या काळात — असाच तुझ्यासारखा मी प्रेमात पडलो होतो. नादी लागलो होतो असं म्हणायचं नाही म्हणूनच केवळ म्हणायचं नाही. सर्वस्व तिला दिलं होतं. एक धनाढ्य इसम नादावल्यानंतर कुठल्या अवस्थेत पोहोचतो ते बघायचं असेल तर माझ्याकडं बघ. तिनं अशीच एका अवाढव्य रकमेची मागणी माझ्याकडं केलेली होती. बायकोच्या अंगावरचे सगळे दागिने ओरबाडून मी त्याचे पैसे केले — तिला देण्यासाठी तिच्या खेड्यात गेलो. रात्रीचा — बरोबर एक मित्र होता — एकमजली घराच्या अंगणात एक विहीर होती. वरच्या माडीत ती रहात होती. मोठी कलावती — गायिका — माझा जीव जडला होता — नव्हे वेडा झाला होता — हे पैसे मिळाले नाहीत तर मी जीव देईन असा निरोप पाठवला होता तिनं — धडधड उरात होत असताना माझा मित्र मला म्हणाला होता — अरे, देणारच आहेस ना पैसे? उद्या देतो एवढं बोलून तर बघ — मी मूर्खानं ते ऐकलं — वरच्या बैठकीत बसलेल्या तिच्या आईला मी उद्या पैसे देतो असं बोललो मात्र — त्या बाईनं हंबरडा फोडला — आणि माझी पोरगी तू मारली रे — म्हणून कपाळावर हात मारून रडायला लागली. एवढ्यात मागच्या विहिरीत कुणी तरी उडी मारल्याचा आवाज आला. मी आणि माझा मित्र धावत त्या विहिरीजवळ गेलो — माझ्या मित्रानं कंदील वाकडा करून आत डोकावून पाहिलं — कमरेला दोर बांधलेली कलावती — खालच्या पायरीवर बसलेली होती आणि दोर वरच्या कडीला बांधलेला होता — त्या दिवशी मला त्या जातीची घृणा आली. आणि मी घरी आलो. पैसे बायकोला देण्याकरता — पण बायको घर सोडून गेली होती. आणि बाईची इतर चहाती माणसं — एक होऊन — मला लुबाडून — या भिंतीत चिणून निघून गेली. शहाणा झाल्यानंतर मला मरण आलं — मरण येण्याआधी तू शहाणा हो — तिला फक्त एवढाच निरोप पाठव — मला तुझी गरज नाही. मी तुला ओळखलेलं आहे.

[ तपकिरे येतो. ]

तपकिरे : काय झालं?

दिनकर : मला तुझी गरज नाही – मी तुला ओळखलेलं आहे असा निरोप सांग जाऊन शोभाला.

देव : है शाब्बास !–( दिनकर बघतो. ) काळजी करू नको – त्याला नाही ऐकू जाणार –

तपकिरे : हा निरोप घेऊन जाऊ ? मला काय गरज आहे – मी कशाला वाईटपणा घेऊ ?

दिनकर : म्हणजे ?

तपकिरे : अरे, तू नसलास तर करायची काय ती कामं ? तुला जोड नाही.

( हॉर्न वाजतो )

मनू : मी घेऊन जाऊ निरोप ?

देव : तू मने ?

मनू : ती नकोच यायला आमच्या घरी – मला आणि आमच्या ताईला उगीचच बोलली.

देव : असं म्हटलं तर तिला राग येईल.

मनू : तिच्या हातापासून माझे गाल लांब ठेवीन – [ जाते. ]

देव : आता मिळेल बघ तुला तिचं खरं रूप बघायला – घरंदाज – उच्च संस्कृत वरचीच कुणी अशी वाटणारी ही – तुला वाटत असलेली करुणामयी – कशी दारुणामयी बनते ते बघ – पैशाचा लोभ तिला नाही हा तुझा समज – हा तुझा भोळेपणा – अरे, जी क्रियापदं कल्पनेतसुद्धा तुझ्या व्याकरणात येणार नाहीत – ती सुभाषितासारखी तिच्या ओठावर नाचत असलेली तुला दिसतील. आतापर्यंत लाघवी प्रेम बघितलंस – आता बघ तिचं थैमान –

( बाहेरून शोभा येऊन कमरेवर हात ठेवून उभी राहते. )

शोभा : तुम्ही काय निरोप पाठवला मला त्या कार्टीबरोबर ? काय ओळखलंत तुम्ही मला ? तुम्हाला माझी गरज नाही ?

दिनकर : नाही – रागावू नकोस शोभा—

शोभा : अरे जा – मुडद्या—

दिनकर : शोभा —

शोभा : अरे, तुझ्यासारखे छप्पन्न बसलेले असतात. लॉजवर माझ्या कॉटच्या

पायाशी — तू नसताना — तुला काय वाटलं ? मी तुझ्या एकट्यावर अवलंबून आहे म्हणून ? फूट — हे दहा हजार रुपये — हे तर खेळणं. हे पैसे तर मी घेणारच होते— पण हे नाटकसुद्धा मी नि आई मिळून काढणार होतो. मी नाही काम केलं तर काय तुझं नाटक होतंय बघू.

**दिनकर :** शोभा, तुला कुठल्या गाळातून मी उपसून वर काढली... तुला गर्व झाला — शोभा

**शोभा :** तुम्ही मला ज्ञान शिकवता — तुम्ही माझे गुरू काय ? स्वतःला फार देखणे समजता म्हणून तुमच्यावर भाळले असं तुम्हाला वाटलं काय ? माकड बरं — असला आहे चेहरा — हं — मी म्हणून माझ्याबरोबर तुम्हाला मिरवू दिलं — म्हणून नाव झालं — मला आज बाहेर केवढी डिमांड आहे — कोण बसतंय तुमच्यासाठी नऊवारी पातळात — चुलीपुढं केरपोतेरी करीत ? नाही तर देवापुढं निरांजनं लावत — बायकोला सांगा — आमच्यावर पैसा केला—

**दिनकर :** तू खोटे आरोप करतेस — हे तुला कुणी तरी पढवलेलं आहे—

(ती तपकिऱ्याकडे बघते.)

**तपकिरे :** कशाला पाहिजे ? रात्री तुमच्याबरोबरीनं जागलो — प्रवास केला.

**दिनकर :** पण मीही काही घरी बसून नव्हतो. तुला पैशाला मी कधीच कमी केलं नाही.

**शोभा :** अरे जा रे, पैसे देणाऱ्या — तुझ्यासारखे छप्पन्न पडलेत — हं — घर बांध — पैसे मिळव — बायकोच्या उरावर घाल—

**दिनकर :** आजवर तू माझे केलेले अपमान मी तुझ्याबद्दलच्या आकर्षणामुळं सहन केलेत, पण यापुढं माझ्या बायकोचा अपमान मी या घरात सहन करणार नाही शोभा—

**शोभा :** माझं नाव काढायचं नाही तोंडातून — लायकी आहे का ? म्हणे घर — (पाय आपटते. ) तोंड नको तुमचं आणि तुमच्या घराचं. तुमच्या चार भिंतींच्या घरात सभ्य माणसासारखी नाटकं करण्यापेक्षा बाहेर उघड्यावर जाऊन कॅबरे केलेला काय वाईट — पैसा तरी भरपूर मिळेल. [ रेणुका येते — ती दारात थांबते. ] एवढं नाटककार म्हणून नाव होतंय ना तुझं ? मी गेल्यानंतर तुझ्या नाटकाचा एक तरी प्रयोग करून दाखव — फाके पडतील तेव्हा माझी किंमत समजेल —

माझ्या जिवावर पैसे मिळवून बायकोसाठी घरं बांधली. आता नाटक बंद पडल्यावर, त्याच बायकोला बाजारात नेऊन बसव म्हणजे पुढं पोटाची पंचाईत पडणार नाही !

**रेणुका :** तुम्ही फार बोलता बाई. बोलावं, पण तोंड सांभाळून बोलावं. मी तोल म्हणणार होते—पण तुम्हाला समजणार नाही म्हणून तोंडावर यायची वेळ आली. बाजारात बसण्याच्या गोष्टी बाजारातल्या बायकांनी कराव्यात, पण त्या बाजारात—घरात नाही. या घराच्या बाहेर जाऊन काय वाटेल ते बोला—हे घर आहे—बाजार नाही. कौटुंबिक नाटकातून तुम्ही उत्तम काम करीत असाल पण कुटुंबात येऊन बोलायला तुम्हाला अजून शिकायला हवं. घरंदाज बाईला भाषेपेक्षा संस्कार महत्त्वाचे वाटतात. पण माझ्यापेक्षा माझा नवरा—हा मला मोठा—अगतिक झाला असला तरी ज्याचा अपमान मी नाही सहन करणार—

**शोभा :** हं ! (पाय आपटते—तिची नक्कल मनू करते. )

**रेणुका :** आजपर्यंत मी तुम्हाला कधी उलट बोलले नव्हते म्हणून आता तुला सांगते—रस्त्यावर उभं राहून हवं तितकं भुंकत रहा. मी दारसुद्धा लावून घेणार नाही. कारण दार बंद केलं तरी तुझं तोंड बंद होणार नाही. कारण संस्कार—बोलणं आणि बोलणं एवढाच तुमचा धंदा—नाटकातल्या कामाचीच तुला घमेंड असेल तर एकच सांगते—नाटकातलं उत्तम काम केल्याचं बक्षीस यांच्याच हातून हेच अध्यक्ष असताना मी घेतलं होतं—पुढं यांच्याशीच संसार करायचा हे ठरल्यावर—नाटक बंद करून या क्षणापर्यंत मी गृहिणीचं व्रत घेतलं होतं—वेळच आली तर रंगभूमीवर उभं राहून—तुझ्यापेक्षा उजवी नाही ठरले तरी दुःख नाही, पण माझ्या नवऱ्याचं नाव मी एका कणानंही कमी होऊ देणार नाही. तुला घमेंडच असेल तर मलाही अभिमान आहे—तू या घरातून जा—आणि यायचंच असलं तर याच नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला ये. तुला सिद्ध करून दाखवीन की—मी नटवी नसले तरी नटी नक्कीच आहे !

**दिनकर :** रेणू—

**रेणुका :** तुम्हांला राग आला ? [ वळते,—पैसे पायाशी ठेवून आत जाते. ]

**दिनकर :** रेणू—

**रेणुका :** तुम्हाला वाईट वाटलं ? [ ती आत निघून जाते. ]

**शोभा :** (पाय आपटून)–बैस कुरवाळत—तू नाहीस तर लाख दुसरे–चला तपकिरे—

**तपकिरे :** मी येऊ ? आपण व्हा पुढं–मी आहेच मागं–(ती गेल्यावर) हलकट साली! लक्ष्मीचा अपमान करते! पोचवून परत येतो. [जातो]

**देव :** तुझी बायको परत घरी आली, दिनकर माझी संधी जवळ आली. फार उपकार केलेस मित्रा–मला या योनीतून सोडवलंस–तुझ्या सौभाग्यवतीचं हक्काचं पाऊल इथं पडलं की मी इथून जाणार. माझा काही त्रास झाला असला तर मला क्षमा कर. आता यापुढं आपली भेट होणं नाही. [मनू येते] मनू—या पोरीला तू नाटकात घे. (तो तिला जवळ घेतो.) ज्या जन्मात जाईन त्या जन्मातून तुझ्यावर आशीर्वादाचा वर्षाव करत राहीन—

**मनू :** (हुंदका देते.) आजोबा, मी उदबत्ती लावू ? (उदबत्ती लावते.)

**देव :** लाव बेटा. सहवास संपला सुवास बरोबर घेऊन जातो. दिनकर, हे कुणाला सांगितलंस तर कुणी विश्वास ठेवणार नाही, म्हणून कुणाला सांगूही नकोस—पण तू मात्र लक्षात ठेव—(तुझा असाच उत्कर्ष होऊ दे—पण उत्कर्षाच्या प्रत्येक क्षणाजवळ एक घसरण्याचा क्षण सतत असतो—तेवढी सावधगिरी बाळग.

**उत्कर्षाच्या शिखरावरती**
**क्षण कोसळता योजित नियती**
**अशा अवेळी नकोस विसरू**
**हात हिताचा जो आधार**
**देणाराचे हात हजार !** )

[दिनकर आत जातो.]

**मनू :** आजोबा, आता मला गोष्ट कोण सांगेल ?

**दिनकर :** माझी गोष्ट आता संपली मने ! आता तू माझी गोष्ट मला सांग ! सांगतेस ?

**मनू :** हो–इथं एक दिनकर देव नावाचा मोठा नट-नाटककार होता. एक दिवस तो आपल्या बायकोला घेऊन इथं राहायला आला.

(हळूहळू एक ज्योत रंगभूमीच्या डावीकडून उजवीकडे जाताना दिसते.)

हात हजार!

ता— आजोबा— (ओरडते.)

णू तिला जवळ घेतात— )

बरा शेवटी जो जन्माचा जोडीदार – देणाराचे हात हजार !

( अंक तिसरा समाप्त )

ॐ नमो भगवते सूर्याय। सहस्र किरणाय। इष्ट सिद्धयर्थं कराय।
मम कष्टं चूरय चूरय – मम मनोरथ पूरय पूरय – ॐ ह्रीं सूर्याय नमः।

✣ ✣ ✣

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. १००२४ नों. दि ८।१०।६३
वि. नाटक क्र. ....................

‘ देणाराचे हात हजार ! ’ हे बाळ कोल्हटकरांचे नवे नाटक. नाटक तसे प्रयोगक्षम आणि म्हणून परिणामकारक. ते तसे आहे, यात नवल असे काहीच नाही. हा नाटककार गेली कित्येक दशके नाटके लिहीत असल्या-मुळे तो आता बनचुका सिद्धहस्त आहे. आणि एखाद्या नव्या नाटकाची कल्पना मनात स्फुरली की त्या कल्पनेला सुभग नाट्याकार देण्याचे कसब प्रदीर्घ नाट्यानुभवाच्या परिणामी त्याने आत्मसात केले आहे. या विधानाचा अन्वयार्थ असा की, मूळ कल्पना नवी आणि नाट्यक्षम असेल, तर त्या कल्पनेवर या सिद्धहस्त नाटककाराने रचलेले नाटक प्रयोगक्षम आणि परिणामकारक व्हायलाच हवे. तसेच हे झाले आहे. तसे ते झाले नसते, तरच नवल !

बाळ कोल्हटकरांच्या नाटकाबाबत विचार करीत असताना भाषान्तर, रूपान्तर, अनुवाद इत्यादींचा विचार मनात येऊ देणेसुद्धा योग्य नव्हे; असे कोल्हटकरभक्तांना वाटणे स्वाभाविक आहे, हे मी जाणून आहे; पण तरीसुद्धा संस्कारक्षम आणि फलनक्षम अशा मनोभूमिकेत कोणते बीज केव्हा व कसे रुजेल, हे सांगता येत नाही. आणि एकदा ते बीज मनो-भूमीत खोलवर रुजल्यावर नंतर एखादा चमत्कार घडावा, त्याप्रमाणे कालान्तराने त्या बीजाचे एखाद्या पुष्पफलसमृद्ध वृक्षात रूपान्तर होणे, हे—चमत्काराची बाब वाद करून—नैसर्गिकच म्हणावे लागेल. तसे काहीसे प्रस्तुत नाटकाच्या संबंधात घडले असण्याचा संभव आहे, अशी माझी समजूत आहे.

अशी समजूत मनात दृढ होण्याचे कारण काय? ते कारण आता सांगतो. दोन-तीन वर्षांपूर्वी येथे ‘ रिइन्कार्नेशन ऑफ पीटर प्राउड ’ या नावाचा एक सुन्दर अमेरिकन चित्रपट दाखवण्यात आला होता. या

चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना भारतीय संस्कारात मुरलेल्या मनाला भुरळ घालील अशी होती. आपली धर्मधारणा अशी आहे की, प्राणतत्त्व आत्मा अविनाशी आहे, आणि तो जन्मजन्मान्तरी नानाविध देहाकार धारण करतो. म्हणून गेल्या जन्माच्या गोष्टी आपण किती सहजतेने करीत असतो. पुनर्जन्मावर आपला विश्वास असतो, आणि म्हणून गेल्या जन्माच्या स्मृती या जन्मात कोणाच्या मनोगतात तरळत असल्याचे आपण कोठे वाचले वा ऐकले तर त्याविषयी श्रद्धान्वित असे एक कुतूहल आपल्या अन्तर्यामी दाटून येते. म्हणूनच पीटर प्राउडच्या पुनर्जन्म खरोखरच झाला असल्यास त्याचे आपल्याला आश्चर्य वाटत नाही. पीटर प्राउडच्या चित्रांकित पुनर्जन्म-कथेविषयी भारतीय मनाला जिज्ञासा वाटणे अगदी स्वाभाविक होते.

अशीच दुसरी एक घटना म्हणजे वसंत कानेटकरांच्या 'गोष्ट जन्मान्तरीची 'बाबतची. आता वस्तुस्थिती अशी आहे की, जे. बी. प्रीस्टलेचे टाइम-प्लेज् विख्यात आहेत. या नाट्यत्रयात जो मध्यास्थित आहे, तो प्ले म्हणजे ' वन्स वुई वेअर हिअर बिफोर '. या गूढ नावातच पुनर्जन्माचे संकल्पन अभिप्रेत आहे. ' पीटर प्राउड 'च्या परिणामी असेल कदाचित, कानेट-करांना पुनर्जन्मावर आधारलेल्या या अप्रतिम नाट्यकथेचे स्मरण झाले असावे. आणि त्या नाटकाच्या रूपान्तरासाठी हा चालू काळ अनुकूल आहे, असे त्यांच्या मनाने घेतले असावे. आता ' गोष्ट जन्मान्तरीची ' हा ज्या नाटकाचा अनुवाद आहे, ते मूळ नाटक एका प्रतिभाशाली नाटक-काराने रचलेले आहे. पण मूळ नाटक पुष्कळ गुंतागुंतीचे, व्यामिश्र, सूक्ष्म आणि सूचक आहे. नेमके हेच गुण मराठी प्रेक्षकांसाठी जाचक ठरण्याचा संभव आहे, अशा समजुतीने कानेटकरांनी जे रूपान्तर सादर केले. ते पुष्कळच सोपे केलेले, स्थूल पण आकर्षक असे होते. मूळ नाट-

काची सूक्ष्म सूचना कानेटकरांच्या रूपान्तरात हरवलेली होती— पण तरीही त्या रूपान्तरित नाटकाने मराठी प्रेक्षकांची चांगली पकड घेतली असली पाहिजे, हे त्या तूर्त चालू असलेल्या नाटकाच्या शताधिक प्रयोगांनी सिद्ध केले आहे.

—आणि आता हे 'देणाराचे हात हजार!' या नाटकाचा प्रीस्टले-च्या 'वन्स वुई वेअर हिअर बिफोर' या नाटकाशी एक गूढ संबंध आहे, असे मला वाटते. कारण काय? तर तेही लगेच सांगतो. येथे हेही स्पष्ट करायला हवे की, प्रीस्टलेचे नावही कोल्हटकरांच्या कानी नसणार आणि अर्थातच त्याचा हा 'टाइम-प्ले' पण त्यांना माहीतच नसणार. पण संभव आहे की, त्यांनी 'गोष्ट जन्मान्तरीची'चा प्रयोग पाहिला असेल. किंवा तसे नसल्यास निदानपक्षी किमान त्या गोष्टीचा गोषवारा— कोणी तरी सांगितल्यामुळे वा वाचनामुळे— त्यांच्या कानी आलेला असणार. या पर्यायांपैकी नक्की खरा कोणता, ते मला माहीत नाही. आणि त्याची विचारपूस करण्याचे कारण पण मला कधी भावले नाही. कारण या विषयात माझी खात्री पटलेली आहे. कशावरून?

प्रस्तुत नाटकाचा नायक जो पिशाचरूप (दिनकर) देव आहे, त्याच्या मुखातून नाटकाच्या आरंभीच नाटकाचे जे संकल्पन वदवलेले आहे ते येणेप्रमाणे :

'मी त्याचा पणजा.... तो नाटकात काम करतो. मीही नाटकात काम करत होतो. मलाही त्याच्यासारखीच एक बायको होती. साध्वी, सद्गुणी, विचारवन्त. ऐन उमेदीत होतो मी सुद्धा त्याच्यासारखाच. त्या उमेदीतच संपलो. म्हणून असा राहलो........ याच दिवसापर्यंत आलो होतो. बायकोच्या सहकार्यानं. सगळं दारिद्र्य संपलेलं होतं.

आम्ही दोघंही सुखाच्या शिखरावर होतो.... आणि याच क्षणाला माझ्या आयुष्यात एक प्रेयसी आली होती.... देव देत होता हजार हातांनी आणि एवढंच सांगायला विसरत होता की हाच घसरण्याचा क्षण असतो! देणाऱ्याला काय कमी आहे? घेणाऱ्यालाच विचार राहात नाही. देणाराला हात हजार! ते पापही देती, पुण्यही देती! तुला हवे ते तू स्वीकार! तिथं चुकलो. तीच चूक आता सुधारणार. मला मुक्ती मिळणार.'

उपर्युक्त उद्धृत बरेच लांबले. पण त्यातील महत्त्वाचे व खुणेचे जे विधान आहे, ते म्हणजे: 'तीच चूक आता सुधारणार.' आपल्या रूढ पुनर्जन्म-कल्पनेत 'चूक सुधारण्याची' ही कल्पना नाही. मुळीच नाही. मग ही कल्पना या नाटकात आली कोठून? तर ती निःसंशय मूळ प्रीस्टलेच्या नाटकात आहे. आणि तेथे ती आहे, म्हणून कानेटकरांच्या त्या नाटकाच्या रूपान्तरातही आहे. गेल्या जन्मी केलेली चूक पुनर्जन्मात अन्य कोणाच्या संबंधात सुधारता येण्याची ही जी कल्पना आहे; त्याच कल्पनेवर प्रीस्टलेचा विख्यात 'टाइम—प्ले' आधारलेला आहे आणि त्या प्लेत या कल्पनेचे महत्त्व इतके पराकाष्ठेचे आहे की, ही कल्पनाच मुळात नसती, तर मूळ नाटकही नसते. आणि 'देणाराचे हात हजार!' या नाटकाबाबतही हेच नेमके म्हणता येण्यासारखे आहे. चालू जन्मातील कोणा एकाची चूक गेल्या जन्मातील कोणा एकाने सुधारण्याची ही जी कल्पना आहे, तीच शेवटी महत्त्वाची. एकदा ही मूलभूत कल्पना प्राप्त झाल्यानंतर त्या कल्पनेचा जो नाट्यरूप आविष्कार कोल्हटकरांनी केलेला आहे, तो सर्वस्वी आणि केवळ त्यांचाच आहे. वर ज्या बीजवृक्षन्यायाचा निर्देश केला, त्याचा समग्र हेतू सहज लक्षात येईल.

कानेटकरांची 'गोष्ट जन्मांतरीची'— मूळ नाटकात स्वतःच्या कल्प-

नेचे पाणी घालून– कितीही पातळ केलेली असली, तरी शेवटी मूळ नाटकाचा केवळ जर्मच नव्हे, तर तदंगभूत समग्र आकारही कानेटकरांच्या रूपान्तराला लाभला आहे. तर तसे येथे घडलेले नाही. प्रस्तुत नाटकाचा जो दृश्य आकार आहे, तो सर्वस्वी कोल्हटकरांच्या कल्पकतेने घडवलेला आहे. येथे मूळचे व्यामिश्र आणि गूढ नाटक इतके सरळ आणि सोपे केले आहे की त्यावर कोल्हटकरी सहीशिक्का स्पष्टास्पष्ट उमटलेला आढळून येतो. मराठी नाटकाचा प्रेक्षक सतत या नाटककाराच्या डोळ्यांसमोर असतोच. आणि तो नाटक नेमकी कशाकशाला दाद देणार आहे, याचे भान त्याला पक्के असते.

'माझंच आयुष्य तू जगतो आहेस,'– असे एकदा वंशज पणजोबाने अंशजाला निक्षून म्हटल्यानंतर उभयतांच्या आयुष्याची समान्तर रूपरेखा गृहीतच धरावी लागते. हे समान्तर तुटणार आहे केव्हा? तर वंशजाने अंशजाला उद्देशून पुन्हा पुन्हा केलेल्या असंख्य पूर्वसूचनांस अनुसरून तो वंशजाची चूक सुधारील आणि वेगळे वळण घेऊन स्वतःच्या आयुष्याला योग्य ती दिशा देईल, तेव्हा नाटकाच्या कथानकाचा संपूर्ण आराखडाच नाटकाच्या आरंभी आपल्याला असा भेटतो, आणि त्या आराखड्याबरहुकूम तदनंतरचे संपूर्ण नाटक आकारास येते. म्हणजे आरंभीच सस्पेन्स निकालात निघतो, असे घडते का? तर तसे घडत नाही. कारण अन्तिम पर्यवसानाची पूर्वसूचना नाटकाच्या आरंभीच मिळत असली, तरी या अन्तिम पर्यवसानापर्यंत नेऊन पोचवणारा घटनाक्रम प्रेक्षकाला अज्ञातच असतो. आणि त्या संबंधातील जिज्ञासा अखेरपर्यंत जागृत राहणारच असते.

पणजा आणि पणतू या उभयतांचा आयुष्यक्रम क्रायसिसच्या क्षणापर्यंत

जवळपास एकच असतो. आणि म्हणून 'माझंच आयुष्य तू जगतो आहेस,'– असे वंशज अंशजाला स्पष्टपणे सांगतोही. उभयतांच्या आयुष्य-क्रमांत अंतर पडणारच असेल, तर ते अखेरच्या क्षणी. पणजा परस्त्रीवश झाल्यामुळे त्याचा सर्वनाश जसा अटळ ठरतो, मोहवशता ही त्याची चूक ती अंशजाने दुरुस्त केली, तर वंशजाला पिशाच्चयोनीतून मुक्तता लाभणार असते. म्हणून हा वंशज अंशजाला ताळ्यावर आणण्यासाठी डोळ्यांत तेल घालून त्याच्यावर पहारा करतो. आणि मोहिनीला पिटाळून लावल्यावर पणतू स्वस्त्रीचा म्हणजेच पत्नीचा पातिव्रत्यमहिमा कळल्यानंतर पति-धर्माला जागतो. आणि मुक्ततेपूर्वी वंशज अंशजाला या नाटकाचे सूत्ररूप असे तात्पर्य निक्षून ऐकवतो. ते तात्पर्य म्हणजे : 'उत्कर्षाच्या प्रत्येक क्षणाजवळ घसरण्याचा एक क्षण सतत असतो. .... तिथं एक हात आधाराला हवा, म्हणून माणूस लग्न करतो ....एक हात जो खरा शेवटी। जो जन्माचा जोडीदार । –कोल्हटकरी नाटकात शेवटी तात्पर्यवजा असा काही तरी संदेश हवाच. खरे तर या संदेशासाठीच हे नाटक असते.

पति-पत्नी-धर्माची महती पटवू बघणाऱ्या या अशा नाटकात पतीला मोहवश करू बघणारी जी स्त्री आहे, ती येथे कलावती असली, तरी अखेरीस ती कलावन्तीण असल्याचा साक्षात्कार त्याला घडणे केवळ अटळ असते. म्हणजे स्वाभाविक घटनांच्या परिणामी तिचे मायावी स्वरूप उघड करणे क्रमप्राप्तच ठरते. हे कर्तव्यही नाटककाराने बाळबोधपणे चोख बजावले आहे. पतीवर प्रेम करणारी अन्य स्त्री ही कुलवती आणि शीलवती असण्याचा संभव अशा बालबोध नाटककर्त्यांच्या ध्यानीमनी कधी स्वप्नातही येण्याचा संभव नाही, हे सहज समजण्यासारखे आहे. कोल्हटकरी नाटकाला माणसामाणसांचे जे विभाजन अभिप्रेत असते, ते एकच. सज्जन

आणि दुर्जन. सज्जनाची दुर्जनता वा दुर्जनाची सज्जनता ही कोल्हटकरी नाटकाच्या आवाक्याबाहेरची वस्तू आहे. आणि वस्तुनिष्ठ नाटकाच्या रचनेसाठी या नाटकाराची ख्याती कधीच नव्हती.

—पण कोल्हटकरी ढंगाचे नाटकही फार फार देखणे असू शकते. ' दूर्वांची जुडी 'सारखे. किंवा ' लहानपण दे गा देवा 'सारखे, किंवा ' जुडी 'पूर्व ' दुरितांच्या तिमिरा 'सारखे. समंजस समीक्षकांनी नाटकांची गटवारी वा प्रतवारी जरूर करावी. ते त्यांचे कर्तव्यच असते. पण नाटकाच्या संबंधात शेवटी चांगले नाटक व वाईट नाटक हेच एक विभाजन शिल्लक उरते. आणि बाळ कोल्हटकरांची कित्येक नाटके चांगली आहेत, याविषयी दुमत होईल असे वाटत नाही. रंगमंचावर रंगते ते चांगले नाटक, आणि पूर्वोक्त नाटकांप्रमाणे हेही नाटक रंगमंचावर रंगणारे आहे.

शेवटी सेन्टिमेन्टल मेलोड्रामा असा एक नाट्यविशेष असतोच. सामान्य प्रेक्षकांना परमप्रिय अशा या वर्गातील नाटकाचा संदेश पूर्वनिश्चित असल्यामुळे त्या संदेशाप्रत नेणाऱ्या घटना अस्वाभाविक असल्या तरी प्रेक्षक त्या धकवून नेतात. उदाहरणार्थ : नायकाने उपनगरात बंगला शोधला. तो अभावितपणे आपल्या पणजाचाच. व्हिस्कीच्या बाटलीतील चहाची चव ज्ञातास्वादाला कळल्याशिवाय कशी राहील? पण अशा नाटकात हशा हा हवाच. आणि हुकुमी हशा वसूल करणारे एखादे पात्र पण हवेच. नायिकेच्या आईचे कॅन्सरचे ऑपरेशन अचानक उपटले, तर त्याच्या खर्चाची सोय करण्यासाठी म्हणून भावी नाटकासाठी नाटककाराला दिलेला कित्येक हजारांचा ॲडव्हान्स नायिकेच्या हाती मौजूद ठेवण्याची व्यवस्था नाटककार आधीपासून करून ठेवणारच! कारण नायिकेचा जसा पातिव्रत्यधर्म आहे, तसाच मातृव्रत्यधर्म म्हणून काही एक

धर्म असतोच ! आणि आपली गैरवाजवी अपेक्षा पुरी होत नाही, म्हणून उपरी स्त्री जी येथे नटी आहे—परागंदा झाल्यावर तिची जागा घेण्यासाठी नाटककाराची पत्नी ही पूर्वकाळात नटी असल्याची पूर्वसूचना कोणता नाटककार देणार नाही ? उपनगराची पालिका या नाटककाराचा सत्कार-समारंभ कशासाठी साजरा करणार असते, हे अशा नाटकात समजलं नाही, तरी चालते ! सत्कारमूर्तीचे निमंत्रण निर्मात्याच्या हाती दिले गेले, तरी ते चालते ! कारण नाटकात या घटनेचा उपयोग केला जातो, तो फक्त एकाच प्रश्नासाठी : सत्कार संभव नाटककार आपल्या पत्नीला सत्कारसमयी बरोबर घेऊन जाणार की नाही ? आणि तिला बरोबर नेण्याचा त्याचा मानस नसला, तरी निघतेवेळी तिला नटूनथटून सज्ज राहण्याचा आदेश देणारा अन्य कोणी नाटककाराचा चमचा असला तरी निभावून नेण्यासारखे असते. कारण शेवटी घटनांचा उपयोग नाटक रंगतदार करण्यासाठीच ना ? आणि हे नाटक तर असे आहे की, अशा काही घटनांची जोड त्याला दिली नसती, तर त्याचा एकांकच झाला असता. आता एकांक ताणून त्याचे त्र्यंक असे फुल-फ्लेज्ड नाटक करायचे तर त्यात अशा घटना अपरिहार्यच ठरतात. नाटकाची रंगत चढती वाढती ठेवण्यासाठी अशा घटनांचा उपयोग जरूर होतो. शेवटचा संदेश वाहून नेऊन परिणामकारक करण्यासाठी या असल्या अस्वाभाविक घटनाही उपकारक ठरतात. नाट्यगत पिशाच्चाचा आपल्या अंशाजाला शेवटी आदेश काय ? तर 'शहाणा झाल्यानंतर मला मरण आलं. मरण येण्याआधी तू शहाणा हो.'— आणि शहाणपणाचा मार्ग अशाच असंभव घटनांच्या मैदा-नातून जात असतो ! शहाणपणाचा, आणि शहाणपणा शिकवणाऱ्या नाटकाचा पण !

प्रस्तुत नाटकात नाटककाराने जी एक किमया केली आहे ती मात्र त्याच्या अम्लान प्रतिभेची साक्ष पटवणारी आहे. नाट्यगत भुताटकीची गोष्ट तर मनोरम आहेच, पण पणजाचे भूत ज्या एका निरागस चिमुरड्या मुलीशी प्रथम संपर्क साधते, त्या मुलीची व्यक्तिरेखा नाटककाराने फार गहिरी रंगवली आहे. वास्तविक नाटकाच्या चौकटीला ती आवश्यक होती, असे नव्हे, तिच्याशिवाय नाटक सहज धकू शकले असते. नाही असे नाही. पण मुळात अशा निष्पाप किशोरीची कल्पना सुचणे, हेही नाटककाराच्या प्रतिभेचे द्योतक आहे.

बाळ कोल्हटकरांच्या नाटकाचे एक बलस्थान म्हणजे त्यांच्या नाटकात सर्वत्र विखुरलेले सुभाषितांचे भांडार. कोल्हटकरांच्या इतर नाटकांच्या तुलनेने हे नाटक तसे बन्दिस्त आहे. त्यांच्या इतर नाटकांतल्यापेक्षा या नाटकातील सुभाषितांची संख्याही तशी एकूण कमीच आहे, ही काहीशी नवलाची गोष्ट म्हणावी लागेल. कारण सुभाषितांची पखरण घालू शकेल, अशी एक जीवन्मृत व्यक्ती या नाटकात केंद्रस्थानी आहे. म्हणून सुभाषित-योजनेतील संयमाचा प्रस्तुत निर्देश. ‘ आधी घडतं, मग नाटकात येतं,’ हे सुभाषित काना–मनाला किती गोड वाटते. माणूस गरजा कशा उत्पन्न करतो आणि शेवटी त्या गरजांचाच तो बळी कसा ठरतो, याविषयी तर येथे एक छोटेसे सुभाषितप्रचुर प्रवचनच ऐकायला मिळते. आता हा एक मासला बघा. उपर्युक्त छोट्या मुलीच्या जिव्हाग्री सरस्वती नाचत असते, म्हणून तो तिला ‘ माते ’ म्हणून नमस्कार करतो. त्यावर ती सहजपणाने म्हणते : ‘ एवढीशी मुलगी मी. मला माते काय म्हणता ? ’— तर त्यावर लगेच तो म्हणतो : ‘ सरस्वतीला वय नसतं. अमृताला चव नसते. हिऱ्याला रंग नसतो. यांना फक्त गुण असतो.’ वगैरे.

IRBK-0119927

प्रत्येक साहित्यिकाच्या साहित्याकृत गुणवत्तेत काही एक चढउतार हा असतोच. मध्यन्तरी हा नाटककार ( उगाचच ) संपल्यासारखा वाटत होता. ‘ दूर्वांची जुडी ’नंतर त्याने ‘ ल्हानपण ’चा एक उज्ज्वल अपवाद वगळता— बरी नव्हेत, अशी अनेक नाटके दिली होती. पण आता हे एक चांगले रंगतदार नाटक घेऊन तो प्रेक्षकांसमोर आला आहे. आणि ते नाटकसुद्धा असे की जे बघताक्षणी असे वाटावे की हे नाटक कोल्हटकरी ढंगाचे नव्हे. बोलूनचालून भुताटकीचे नाटक. उत्कंठावर्धक. गंमतीची गोष्ट अशी की, या नाटकाच्या संहितेत नाटककाराने स्वतःच आपल्या पूर्वीच्या ताई-भाऊ-प्रणीत कौटुंबिक नाटकाची मजेशीर टिंगल केली आहे. खलनायिका अशा ‘ जुडी ’ नाटकातील ताईची भूमिका करणारी आहे असे कल्पून.— आणि हे विसरून की हे नाटकसुद्धा तसे निखळ कौटुंबिकच आहे. कोल्हटकरी ढंगाच्या नाटकाचा भर नेहमी सर्व कुटुंबियांनी एकत्र राहण्यावर असतो. या एकत्र कुटुंबात ‘ वेगळं व्हायचंय मला ’ म्हणून जो म्हणेल, तो पापी ठरतो. हे नाटक तर उघड उघड पतिपत्नीधर्माची— म्हणजेच पर्यायाने कुटुंबाची— महती गाणारे नाटक आहे. आणि ते अशा कौशल्याने रचले आहे की त्याचे कौटुंबिकपण लक्षात येऊ नये ! पण शेवटी नाटकाची जात तीच आहे — जी बाळ कोल्हटकरांना अलोट लोकप्रियता मिळवून देऊ शकली. कोल्हटकरी नाटकाचे सर्व विशेष येथे एकत्र आहेत.— प्रमाणात काही कमीअधिकपण असेल तेवढेच. पण बाज तोच. ‘ देणाराचे हात हजार ! ’ असतील. बाळचे हात दोनच आहेत. त्यांपैकी एका हाताने तो नाटक लिहितो. नाटक लिहिणारा हा हात औक्षवन्त असावा, हीच नाट्यरसिकांची इच्छा व प्रार्थना असणार.

—०—